महाराष्ट्राचे शिल्पकार

# कमलाबाई होस्पेट
# परिचारिका ते जगन्माता एक प्रवास

लेखिका
डॉ. छाया नाईक



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# कमलाबाई होस्पेट

## परिचारिका ते जगन्माता
## एक प्रवास

डॉ. छाया विजय नाईक

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

प्रथमावृत्ती : २०१४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ३२

सचिव :
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर, इमारत २ रा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

© प्रकाशकाधीन

मुद्रण :
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हिल लाईन्स, नागपूर.

किंमत : रूपये ६३.००

(या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही).

# निवेदन

कमलाबाई होस्पेट या विदर्भातील एक महत्वाच्या सामाजिक कार्यकर्त्या. लहान वयातच वैधव्य आल्यामुळे एक प्रकारे विरक्तीचे जीवन त्यांच्या वाट्याला आहे. स्वतःला मातृत्व लाभले नसले तरीही समाजातील फसविलेल्या विधवा, कामकरी, परितक्त्या आणि निराधार यांची मुले ही आपलीच मुले समजून त्यांनी आपल्या संस्थेमार्फत त्यांना आधार देण्याचे महत्कार्य पार पाडले. नागपूरातील सिताबर्डी व महाल ही दोन सूतीकागृहे कमलाबाईंच्या पुढाकाराने सुरू झाली. अशा संस्थेचे व्यवस्थापन करणे ही अतिशय कौशल्याची गोष्ट असते. १९२७ च्या सुमारास महात्मा गांधीच्या सेवाग्राम येथील आश्रमात गांधीजींचे सहकारी व अनुयायी जमनालाल बजाज यांच्या पत्नी मीराबेन या आजारी पडल्यामुळे त्यांच्या सुश्रुषेचे काम कमलाबाईंच्या अंगावर पडले. मीराबाईंची सर्वतऱ्हेची सुश्रुषा कमलाबाईंनी आत्मीयतेने केली. या सेवेबद्दल जमनालालजींनी खूश होऊन त्यांना विचारले की, ‘ मी तुम्हाला काय देऊ ?’ त्यावर कमलाबाईंनी उत्तर दिले ते फार महत्वाचे होते. त्या म्हणाल्या “ मी केलेल्या सेवेबद्दल मला काहीही नको. परंतू जनतेसाठी वर्ध्याला सूतीकागृहाची आवश्यकता आहे. ते तुम्ही सुरू केले म्हणजे मला सर्व मिळाले.” ही समाजसेवेची वृत्ती अंतःकरणात खोलवर रुजल्यामुळे कमलाबाईंनी आयुष्यभर समाजसेवेचे व्रत सोडले नाही. ‘ मातृसेवा संघ ’ या संस्थेची स्थापना झाल्यानंतर ही संस्था म्हणजेच आपले घर म्हणून बाईंनी अहोरात्र कष्ट करून संस्थेचे काम पार पाडले. कमलाबाईंचे मातृसेवासंघाचे काम अनेक ठिकाणी चालू झाले. सूतीकागृह, वृद्धाश्रम यासारख्या सेवाभावी संस्था हेच आपले जिवित कार्य आहे, असे समजून कमलाबाई अखेरपर्यंत कार्यरत राहिल्या. त्यांना ८२ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. हा सर्व जीवनप्रवास त्यांनी समाजसेवेसाठी व्यतीत केला. मंडळाच्या ‘महाराष्ट्राचे शिल्पकार ’ या चरित्र मालेमध्ये डॉ. छाया नाईक यांनी कमलाबाई होस्पेट यांचे जीवन चरित्र लिहून मंडळाला उपकृत केले. ‘ परिचारिका ते जगन्माता ’ असा हा अलौकिक प्रवास नव्या पिढीसमोर उपलब्ध होणे महत्वाचे आहे. हे काम मंडळाला पार पाडता आले याबद्दल मला धन्यता वाटते. कमलाबाई होस्पेट यांचे जीवनचरित्र महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

(मधु मंगेश कर्णिक)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

स्थळ : मुंबई
दिनांक : ऑगस्ट २०१३

# आभार

आदरणीय कमलाबाई होस्पेट यांचे चरित्र लिहायला घेतले तेव्हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता चरित्र-साधने जमविण्याचा. कमलाताईंचे भाचे दिवाकरराव मोहनी व सुनंदाताई मोहनी यांनी त्यांच्याजवळ सांभाळून ठेवलेल्या हस्तलिखित आठवणी, जुनी कागदपत्रे, दुर्मिळ पुस्तके हे सर्व उपलब्ध करुन दिले. कमलाताईंवर प्रकाशित झालेली पुस्तके व विविध स्मरणिका मातृसेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, मातृसेवा मासिकाच्या व्यवस्थापिका सुमती पाध्ये, नंदनवनच्या सेवानिवृत्त अधीक्षिका शरयू घाटे, पंचवटीच्या व्यवस्थापक विभा टिकेकर यांनी उपलब्ध करून देण्याच्या कामी मोलाची मदत केली.

चरित्र-साधनांची जुळवाजुळव सुरु असतानाच माझा पाय फ्रॅक्चर झाला. त्यामुळे जवळजवळ तीन महिने मला पूर्णपणे अपंगत्व आले होते. या काळात चंपाताई वऱ्हाडपांडे व गोविंदराव पळशीकर हे स्वतः माझ्या घरी आले; व कमलाताईंच्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. काँग्रेसचे वयोवृद्ध नेते व माजी मंत्री शंकरराव गेडाम यांनी त्यांचे ‘ नागपूर जिल्हा काँग्रेसचा इतिहास ’ हे पुस्तक उपलब्ध करून दिले. स्वातंत्र्य लढ्यात हिरीरीने सहभागी झालेल्या लीलाताई चितळे यांनीही ‘हिंदुस्तानी लालसेना’ हे पुस्तक तर उपलब्ध करुन दिलेच, पण फोनवरुन अनेकदा माझ्याशी संवाद साधून मला आवश्यक ती माहिती विनाविलंब पुरवली.

शारीरिक अपंगत्वामुळे पडणाऱ्या मर्यादा ओलांडण्याच्या कामी माझ्या मैत्रिणी अश्विनी पोफळे, अपर्णा खोलकुटे, सुवर्णा पाटील यांनी खूपच मदत केली. एखादे पुस्तक हवे असल्यास, नागपूरच्या उन्हा-पावसाची पर्वा न करता लगेच मी सांगीन तेथे जाऊन त्या घेऊन यायच्या. वर्धेच्या साधना उमाळकर व मुंबईच्या अरुंधती हुंडेकरी यांनीही अशीच मदत केली.

पुस्तकाची रुपरेषा ठरविण्याच्या कामी श्रीमती विद्या बाळ यांची मोलाची मदत झाली.

माझ्या लिखाणाचे पहिले वाचक विजय नाईक यांच्या मदतीबद्दल काय लिहू? मला थोडे थोडे चालता येऊ लागल्यावर, माझा भार, शब्दशः स्वतःच्या खांद्यावर घेऊन ते मला अनेक ठिकाणी घेऊन गेले. त्यामुळेच डॉ. प्रमिलाताई आसोलकर, डॉ. कुसुमताई वांकर, कुसुमताई वाघमारे, माणिक जोशी, रमेश सब्जीवाले, दिवाकरराव मोहनी, डॉ. वीणा अलासे या कमलाताईंच्या निकटवर्तीयांना मी भेटू शकले. त्यांनी त्यांच्या जवळील कमलाताईंच्या आठवणींचे भांडार माझ्यासमोर खुले केले. कमलाताईंचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्याच्या कामी त्याचा खूपच उपयोग झाला. प्रत्यक्ष लेखन तपासण्याचे व शुद्धलेखन दुरुस्त करण्याचे काम श्री. वसंतराव काणे यांनी केले.

या सर्वांनी ज्या आपुलकीनी व आत्मीयतेनी मदत केली त्याचे मोल आभाराच्या चार शब्दांनी मी कमी करू इच्छित नाही. या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

हे पुस्तक लिहायची जबाबदारी माझ्यावर सोपवून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल त्यांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करते.

महामंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानते.

अनवधानाने कोणाचा उल्लेख राहून गेला असल्यास त्याबद्दल आधीच दिलगिरी व्यक्त करते.

**छाया नाईक**

नागपूर

१-१-२०१४

# अनुक्रमणिका


१. बालपण ............................................................ १

२. स्वावलंबनाच्या दिशेने ............................................ १७

३. जगावेगळा संसार ................................................ ३३

४. मातृसेवा संघ हेच घर ............................................ ५४

५. मातृसेवा संघाचे इतर प्रकल्प ...................................... ७५

६. कमलाबाईंचे व्यक्तिमत्त्व .......................................... ८७

७. अखेरचा श्वास .................................................. १०३

संदर्भ ग्रंथ सूची ................................................... ११३

# बालपण

कृष्णराव व राधाबाई मोहनी या दाम्पत्याला २३ मे १८९६ रोजी कन्यारत्न प्राप्त झाले. दिवस होता नृसिंह जयंतीचा. या मुलीच्या जन्माआधी या दाम्पत्याला वेणू, सीता, गोपाळ, हरी, दत्ता व पुरुषोत्तम अशी सहा अपत्ये होती. त्यामुळे मुलीच्या जन्माचे दुःख किंवा आनंद अशी कोणतीच भावना कोणाच्याही मनात नव्हती. असलीच तर थोडीशी समाधानाची बाब सर्वांच्या मनात असावी की राधाबाई सुखरुप प्रसूत झाल्या व निर्व्यंग मूल जन्माला आले. मुलीचे नाव यमुना ठेवले. शिरपूर नावाच्या छोट्याशा गावात, एका फौजदाराच्या घरी जन्मलेली ही मुलगी भविष्यात खूप मानसन्मान मिळवील असे कोणाच्या स्वप्नातही आले नसेल. त्यामुळे मुलीची पत्रिका करवून भविष्य पाहणे इत्यादी प्रचलित पद्धतींना बहुदा फाटा दिला गेला असावा.

तो काळ म्हणजे इंग्रजी राज्य हे परमेश्वराचे वरदान आहे असे मानण्याचा काळ! नुकतेच लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय दृष्टीकोन निर्मितीचे जनजागरण अभियान सुरु झाले होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवीनच' अशी केसरीची गर्जना महाराष्ट्रात दुमदुमू लागली होती. ह्याच काळात आगरकरांनी समाज सुधारणेची मोहीम हातात घेतली होती. बंगालबरोबरच महाराष्ट्रातही बालविवाहास विरोध सुरु झाला होता. सती प्रथा बंद करणारा, सती जाण्यास प्रोत्साहित करणाऱ्यांना दंडित करणारा कायदा येऊ घातला होता. विधवा स्त्रियांचे केशवपन करून त्यांना विद्रुप करण्याच्या विरोधात जनमानस तयार होऊ लागले होते. विधवांच्या पुनर्विवाहाची चळवळ हळूहळू सुरु झाली होती. एकूण सामाजिक व राजकीय दोन्ही आघाड्यांवर प्रबोधनाला सुरवात झाली होती. परंतु या चळवळींनी म्हणावा तसा जोर अजून तरी धरला नव्हता. टिळक व आगरकर यांचे आधी स्वातंत्र्य की आधी समाजसुधारणा या

विषयावर मतभेद विकोपाला गेले होते. परंतु सामान्य माणसे या आंदोलनाच्या प्रवाहापासून, वैचारिक मंथनापासून अलिप्तच होती. अशावेळी शिरपूरचे फौजदार कृष्णराव मोहनी यांना आणखी एक कन्यारत्न झाले याची दखल कोण आणि कशाला घेईल?

पण भविष्याला ही दखल घ्यावी लागली. कारण यमुना कृष्णराव मोहनी ही मुलगी पुढे कमलाताई होस्पेट या नावाने आपल्या कर्तृत्वाचा ठसा केवळ महाराष्ट्रावरच नव्हे तर भारतावर उमटवून गेली. आपल्या कर्तृत्वाची प्रसन्नमुद्रा तिने तत्कालीन मुंबई प्रांत व सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार (मध्य प्रांत व वऱ्हाड) यांच्या समाजजीवनावर उमटवली व भारत सरकारनेही या आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकाराचा 'पद्‌मश्री' हा श्रेष्ठ पुरस्कार देऊन गौरव केला. ज्या मोहनी घराण्यात कमलाबाईंचा जन्म झाला त्या मोहनी घराण्याचा इतिहासही अतिशय रोचक आहे. कमलाबाईंच्या चरित्राचा मागोवा घेण्यापूर्वी त्यांच्या या 'मूळा' चा शोधही महत्त्वाचा वाटतो.

**मोहनी घराण्याचा इतिहास :**

कमलाताईंचे वडील कृष्णराव यांचे चुलते वासुदेव रामचंद्र मोहनी यांनी आपल्या काही आठवणी लिहून ठेवल्या होत्या. त्या आठवणींप्रमाणे कृष्णरावांच्या वडिलांचा जन्म १८३७ सालचा. ते त्याकाळी पैठणला रहात होते. पैठणच्या बाजारपट्टी चौकात त्यांची दोन दुकाने होती. पैठण हे त्या काळातील मोठे व्यापार केंद्र होते हे लक्षात घेतले तर त्यांचे घराणे अतिशय संपन्न होते हे सहजच लक्षात येईल. त्यांच्या घरातील बायकांच्या अंगावर कंबरपट्ट्यापासून सर्व दागिने होते. परंतु नंतरच्या काळात व्यापारात खोट आली आणि घराची आर्थिक स्थिती पार खालावली. या दारिद्र्याचे वर्णन करताना वासुदेवरावांनी असे लिहिले होते की, ' पुरुषांची उष्टी काढण्यासाठी जावा जावा आपापसात भांडत असत. कारण इतकेच की त्यांच्या चित्राहुती आपणास खायला मिळाव्यात. '

पैठणच्या घरातले देवघर प्रचंड मोठे होते. एक स्वतंत्र ब्राह्मण पूजा करण्यासाठी होता. तरीही सर्व देवांना स्नान घालणे फक्त एकादशीच्या दिवशी शक्य होत असे. त्यांचे आराध्य दैवत प्रभु रामचंद्र तर कुलस्वामी नेवाशाचा मोहनीराज होता. घरी रामनवमीचा उत्सव धडाक्यात साजरा होत असे. (हाच वारसा कमलाताईंनी पुढे चालवला.) या मंडळींना एकच दुःख होते; आणि ते म्हणजे त्यांना आडनाव नव्हते. पैठणला राहणारे म्हणून त्यांना पैठणकर म्हणत. नोकरी देशपांड्याची म्हणून निजबत देशपांडे

म्हणत. त्यांचे एक पुतणे तात्या (कमलाताईंचे आजोबा) अतिशय हळू चालत. म्हणून त्यांना तात्या मुंगी म्हणत. पण ही काही चांगली आडनावे नव्हती. एक दिवस वासुदेवरावांना झोपेत दृष्टांत झाला. कोणी गंध लावलेला, हाती पळी पंचपात्री घेतलेला ब्राह्मण स्वप्नात येऊन त्यांना म्हणाला, ‘ तुला आडनावाची चिंता का? अरे कुलस्वामींचे नाव घे. ’ दुसऱ्या दिवसापासून त्यांनी आपल्या नावापुढे ‘ मोहनी ’ हे आडनाव लिहिले. हेच नाव आपले वंशज पुढे चालवतील. कारण तो ‘ श्री ’ चा प्रसाद आहे; असा त्यांचा विश्वास होता. कमलाताईंचे आजोबा तात्या हे अकाली कालवश झाले. त्यामुळे त्यांच्या वडिलांचे शिक्षण याच वासुदेवरावांजवळ झाले. इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण झाल्यावर मात्र काकांना पुढचे शिक्षण घेणे शक्य झाले नाही. म्हणून कृष्णरावांनी नोकरीचा शोध सुरू केला. पिंपळनेरचे पोलीस इन्स्पेक्टर शिवराम पांडुरंग यांनी त्यांना कॉन्स्टेबलची नोकरी दिली. तेथून स्वकर्तृत्वाने बढती मिळवत ते फौजदार झाले. नंतर काही दुर्दैवी घटनांमुळे त्यांची “जामदार” या पदावर अवनती करण्यात आली.

याच सुमारास मोहनी कुटुंब जळगावला स्थलांतरित झाले. एकमेकांना धरून राहण्याचा तो काळ असल्याने, सर्व सख्ख्या चुलत भावंडांनी चाळीसगावच्या घरी एकत्र रहावे असे कृष्णरावांचे चुलते वासुदेवराव यांना वाटत असे. परंतु कृष्णरावांच्या बदलीच्या नोकरीमुळे ते शक्य होत नव्हते. ‘ कृष्णाची पत्नी राधा ही अतिशय सालस आणि गुणी आहे ’ असे वासुदेवरावांनी आपल्या आठवणींमध्ये नमूद केले आहे.

शिरपूर मुक्कामी कमलाबाईंचा जन्म झाला तेव्हा त्यांचे वडील पुन्हा फौजदार झाले होते. त्या काळच्या रीतीप्रमाणे त्यांच्या दोन मोठ्या मुली, सीता व वेणू यांचे त्यांनी संपन्न घराणी पाहून विवाह करून दिले. वेणू यावलच्या थेरगावकरांकडे तर सीता येवल्याच्या जामखंडीकरांकडे दिली होती. गोपाळचा विवाह कोतवाल या संपन्न घराण्यातील लक्ष्मी नावाच्या मुलीशी झाला.

नंतर हे कुटुंब भडगाव येथे बदली होऊन रहावयास गेले. भडगावचे घर मोठे होते. घरी घोडागाडी असायची. फौजदार कृष्णराव आपल्या मुलांना या घोडागाडीतून फेरफटका मारून आणायचे. घरची परिस्थिती ‘ खाऊन पिऊन सुखी ’ अशी होती, म्हणजे जेवणात मुलांना अक्षरशः तुपाचे गोळे मिळत होते. पण शिस्तीच्या बाबतीत मात्र कडक धोरणच अमलात आणले जाई.

एक दिवस यमू आपल्या मैत्रिणींसह घरी खेळत होती. कृष्णराव दुपारचे भोजन आटोपून वामकुक्षी करत होते. मुलींच्या गोंगाटाने त्यांची झोपमोड झाली. लहानग्या 'यमी ' ला चांगलाच दम मिळाला. पुन्हा वडील घरात असताना खेळायची तिची हिंमत झाली नाही.

एक दिवस यमुनेला वडिलांनी विचारले, " यमे घरात पाट किती आहेत? "

" माहिती नाही " यमूचे सरळ उत्तर.

" माहिती पाहिजे " वडिलांनी बजावले.

यमूने मान डोलावली. घरातल्या कामाचा हा ओनामा होता.

याच काळात यमूला आणखी दोन बहिणी झाल्या. त्यातील एक क्षयाची भावना होऊन लगेचच गेली. दुसऱ्या बहिणीचे नाव ' गंगा ' ठेवले. पण प्रेमाने सगळे तिला ' पिली ' म्हणत. पिली जेमतेम दीड वर्षांची झाली असेल, कृष्णरावांचे प्लेगच्या साथीत निधन झाले. कुटुंबावर हा मोठाच दुर्दैवाचा घाला होता. वर्ष होते १९०२. मोठा गोपाळ जेमतेम पंधरा-सोळा वर्षांचा होता तर यमू सहा वर्षांची. कमलाताईंचे तीन क्रमांकाचे ज्येष्ठ बंधू दत्तात्रय ऊर्फ नाना मोहनी यांनी लिहून ठेवलेल्या आठवणीप्रमाणे त्यांच्या वडिलांचे १९०३ मध्ये जळगावच्या हॉस्पिटलमध्ये निधन झाले. एक मोठे कुटुंब स्थिरावण्याच्या आतच उघड्यावर पडले. राधाबाईंचे केशवपन करून त्यांना 'सोवळ्या' करण्यात आले. दिमाखदार रंगीबेरंगी नऊवारी पातळांच्याऐवजी आता लाल आलवण नशिबी आले. सहा मुलांसह एका निराश्रित ब्राह्मण विधवेने उरलेले आयुष्य कसे काढायचे हा फार मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी राधाबाईंचे बंधू विष्णूपंत नगरसूलकर पुढे आले. नाना व तात्या या दोन मुलांची रवानगी शिक्षणासाठी त्यांच्या विवाहित बहिणी वेणू व सीता यांच्याकडे झाली व दोन मुले आणि दोन मुलींसह राधाबाईंना घेऊन विष्णूपंत नाशिकात आले. त्यांची परिस्थितीही काही फारशी चांगली नव्हती. तरीही जवळ जवळ एक वर्ष त्यांनी बहिणीला मुलांसह सांभाळले. नंतर मात्र गोपाळला शिक्षण सोडून नोकरी शोधावी लागली. वडिलांच्याच खात्यात त्याला मासिक सोळा रुपयांवर नोकरी मिळाली व राधाबाई भावाच्याच वाड्यात एका खोलीत बिऱ्हाड करून स्वतंत्रपणे राहू लागल्या. या काळात गोपाळची पत्नी बहुतांशी आपल्या माहेरीच असे. अकाली आलेल्या पती निधनाच्या संकटातून राधाबाई कधीच सावरू शकल्या

नाहीत. लहानगी पिली जेमतेम दीड वर्षांची असताना तिचे पितृछत्र हरपले. पण ही मुलगी पांढऱ्या पायाची म्हणून राधाबाई तिचा रागराग करू लागल्या. घरात त्यांचे अजिबात लक्ष लागेना. आज हा बुवा, उद्या तो फकीर, कधी कुठले स्वामी, कधी कुठले महाराज, अशी त्यांची वणवण सुरू झाली.

**लहानगी आई :**

आई बरेचदा घरी नसे. त्यामुळे छोट्या पिलीला सांभाळायचे काम यमूवरच आले. शाळेत जायच्या वयात तिच्या हाती घरातले पोळपाट लाटणे आले. भातुकली खेळायच्या वयात तिला खराखुरा स्वैंपाक करावा लागू लागला. भावाच्या अल्प पगारात कोंड्याचा मांडा करून यमू आईचे घर चालवू लागली. आईने एक वाटी तांदूळाचा भात करायला सांगितला तर पाऊणवाटी तांदूळच घेऊ लागली. तांदूळ नसेल तर ज्वारीच्या कण्या रांधू लागली.

कधीमधी मामाच्या कोठारात कापसाच्या ढिगात दाजींबरोबर लपंडाव खेळायला मिळायचा. शेंगांची पोती ठेवलेली असतील तर त्यांच्या सिंहासनावर बसून उड्या मारता यायच्या. दाजीने किंवा इतर कोणी मनावर घेतले तर लिहिणे-वाचणे शिकण्याची 'चंगळ' व्हायची इतकेच. एरवी घरकाम करणे आणि पिलीला सांभाळणे हाच तिचा आयुष्यक्रम झाला होता. तिच्या वडिलांना शिळे खाल्लेले किंवा खाऊ घातलेले आवडत नसे. 'हरोळी किंवा गाकर करून खा. पण शिळे खाऊ नका.' असे ते सांगत. यमू इतकी काटकसरीने स्वयंपाक करी की, शिळे उरतच नसे. त्याकाळी नाशिकला तीन आणे शेर द्राक्षे मिळायची. पण तेवढी चंगळही महिनोन् महिने या कुटुंबाला करता येत नसे.

**बहिणीच्या घरी :**

यमूच्या दोघी बहिणी संपन्न घरी दिलेल्या होत्या. नाना व तात्या दोघेही बहिणींकडे राहून शिकत होते. परंतु तेथील लाचारीने जगणे असह्य झाल्याने नानाने लवकरच आपल्या मित्रांच्या आधारावर पुण्याला प्रस्थान ठेवले. तेथे बोर्डिंगच्या मेसमध्ये वाढप्याचे काम करून तो नादारीवर शिकू लागला.

सुट्ट्या लागल्या की राधाबाई दाजी, यमू व पिलीला आपल्या मुलीकडे पाठवू लागल्या. बहिणी जरी श्रीमंत होत्या तरी त्यांच्याकडे राहण्यात यमूला मिंधेपणा वाटत

असे. तशातच तिच्या हृदयावर कायमची भळभळणारी जखम करणारा एक प्रसंग घडला.

झाले असे की, यमूचे परकर जीर्ण झाले होते. बहिणीकडे घरात दारा खिडक्यांना लावायचे जुने पडदे होते. बहिणीने त्याचेच परकर यमूसाठी शिवले अन् त्याचवेळी स्वतःच्या मुलीला मात्र नवीन कापडाचे परकर शिवले. सात-आठ वर्षांच्या यमूच्या मनावर या प्रसंगाने जबरदस्त मोठा घाव घातला. आपण गरीब आहोत ही चरचरती जाणीव तिच्या मनाला झाली. कालांतराने घाव बुजलाही असेल पण तिचा व्रण मात्र यमूच्या मनावर कायम राहिला. त्यामुळेच नंतरच्या काळात पंचवटी आश्रमातील मुलींना कुणी घरी राहायला बोलावले तर कमलाताई विचारीत, 'तिला सारखेपणाने वागवाल नं ?'

या गरिबीतून सुटायचा एकच मार्ग यमूसमोर होता आणि तो म्हणजे विवाह.

**यमूचा विवाह :**

त्या काळी साधारणपणे सात-आठ वर्षांच्या मुलींचे विवाह सर्रास होत असत. यमूलाही आपले लग्न व्हावे असे वाटे. पण लग्न म्हणजे दागदागिने, नवीन कपडे, मिष्ठान्नाचे जेवण अशी कोणतीही स्वप्ने तिच्या डोळ्यासमोर येत नसत. आपल्या विवाहाने भाऊच्या घरातील खाणारे एक तोंड कमी होईल इतकाच विचार ती करत असे. पण यमूचे बाशिंगबळ जड असावे. मामा प्रयत्न करीत होते पण त्यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. 'तू हसत नाहीस. गंभीर दिसतेस म्हणून तुझे लग्न होत नाही.' भाऊ चिडवायचे. यमू हिरमसून जायची. अधिकच गंभीर व्हायची. खळखळून हसणे तिला माहित नव्हते.

अकाली आलेल्या संकटांनी तिला गंभीर करून टाकले होते.

अखेर मामांच्या खटपटीला यश आले व यमूचे लग्न ठरले. मुलगा होता कर्नाटकातल्या गदग गावाचा. गुरुकृष्ण होस्पेट. त्यांचे मामा गोविंदराव याडरवीकर हे यमूच्या मामांचे मित्र होते. दोघा मित्रांनी मिळून हे लग्न ठरवून टाकले.

लग्नाआधी वधू-वरांनी एकमेकांना पाहिलेले नव्हते. यमू केतकीसारख्या गौर वर्णाची, धारदार नाकाची, तेजस्वी डोळ्यांची ठेंगणी ठुसकी सुंदर तर नवरदेव ताडमाड उंच,

काळाकभिन्न. लग्नाच्यावेळी नवरदेव इंजिनिअर होता. म्हणजे दोघांच्या वयात बरेच अंतर होते. मुलाकडचे लोक घरी कानडी भाषा बोलत. विवाहाच्यावेळी यमूचे वय जेमतेम १२ वर्षे होते.

या विवाहाचा विचार केला तर असे वाटते, मुलाला न पाहता, त्यांच्या घरातल्या कर्नाटकी वातावरणाचा, त्याच्या रूपाचा, त्याच्या वयाचा विचार न करता, त्याची नीट चौकशी न करता यमूच्या घरच्यांनी तिचा विवाह कसा ठरविला? आज या गोष्टी विचित्र वाटल्या तरी त्याकाळी त्या सहज वाटाव्यात अशाच होत्या. म्हणजे मुलाचे रूप न पाहता शिक्षण पाहावे, गुरुराव इंजिनिअर होते, म्हणजे चांगलेच शिकलेले होते. घराणे सधन होते. आर्थिक स्थिती चांगली होती. वयात आठ-दहा वर्षाचे अंतर ही गोष्टही त्याकाळी गौण मानली जायची. यमूला वडील नव्हते. हुंडा-मानपान या बाजू सांभाळणारे कोणी नव्हते. त्यामुळे दोन वेळच्या जेवणाची व अंगभर कपड्यांची ददात नाही हेच प्रामुख्याने पाहिले गेले असावे. व फारसा खर्च करावा न लागता १९०८ साली नाशिक येथे कुलकर्ण्यांच्या वाड्यात हा विवाह समारंभ पार पडला. विवाहानंतर यमूचे नाव कमला ठेवण्यात आले. कमला गुरुकृष्ण होस्पेट. या विवाहासाठी भाऊकाका वाट यांनी १०० रुपये व तूप पाठवले होते असे कमलाताईंच्या बंधूंनी त्यांच्या आठवणीत लिहून ठेवले आहे. या विवाहसमारंभात कमलाच्या अंगावर भरपूर दागिने घालण्यात आले. नवीन साड्याही मिळाल्या. संपूर्ण विवाहसमारंभात किंवा नंतरही गुरुराव कमलेशी एक शब्दही बोलले नाहीत तरीही कमला आनंदात होती. नवीन पातळे किंवा दागिने मिळाल्याचा तो आनंद नव्हता तर आपल्या भावावरचा आपला 'बोजा' कमी झाल्याचा तो आनंद होता.

**विवाहानंतर :**

विवाहानंतर गुरुराव कमलेला घेऊन धारवाडला त्यांच्या मामाकडे गेले. तिथे सर्व वातावरण कर्नाटकी व भाषाही कानडी. पण त्या लोकांना मराठी येत होते. त्यामुळे तिथला मुक्काम कमलेने निमुटपणे निभावला. पंधरा-वीस दिवस धारवाडला राहून नवपरिणीत जोडपे गदगला स्वतःच्या घरी आले.

घरी विकेशा विधवा सासू, दोन दीर व एक जाऊ इतकी माणसे होती. सासू स्वैंपाक करायची. पण विहीरीवरून पाणी आणायची जबाबदारी सुनांची असायची. विहिरी अतिशय खोल होत्या. धुणी धुणे, भांडी घासणे, भाज्या चिरणे इत्यादी कामे जावेबरोबर कमलाही करू लागली. सुनांना पोटभर जेवू घालू नये, त्यांना भरपूर कामे सांगावित,

येताजाता अद्वातद्वा बोलावे, एकूण स्वतःच्या धाकात ठेवून वळण लावावे ही त्या काळची जनरीतच होती. लहानग्या मुलींना असे वागवण्यात काही गैर आहे असे कोणालाच वाटत नसे. कमलेची सासूही याला अपवाद नव्हती. माहेरी काम करायची कमलेला सवय होती. सासूची बोलणी कधी कधी असह्य व्हायची. पण अशा वाक्ताडनामुळे डोळ्यांतून टीपे गळायची मात्र सोय नव्हती. नव्हे मुळुमुळु रडणे कमलेला आवडत नव्हते. त्यामुळे बिकट परिस्थितीतून मार्ग काढायचे शिक्षण तिची तीच अनुभवातून घेऊ लागली. सासूने दिलेल्या अपूऱ्या अन्नामुळे पोटात भूक थैमान घालू लागली की दोघा जावा एकमेकींच्या पहाऱ्यात चोरून खायच्या. म्हणजे एकीने चोरून खायचे अन् दुसरीने कोणी येत तर नाही ना याकडे लक्ष ठेवायचे व कोणी येताना दिसले तर तशी सूचना द्यायची. माहेरी पत्र पाठवायचे तरी ते असेच चोरून पाठवावे लागे. लग्नानंतर लगेचच कमला माहेरी पत्र पाठवावे म्हणून कार्ड घेऊन लिहायला बसली ते तिच्या सासूबाईंनी पाहिले आणि विजेसारख्या कडाडल्या,

" काय चाललंय? "

" इकडे आल्यापासून आईला पत्र लिहिले नाही. खुशाली कळवतेय." खोटे बोलणे माहीत नसलेली कमला सरळपणे म्हणाली.

" हवं तेव्हा पत्र लिहायची इकडे पद्धत नाही. बारशाच्या नाही तर बाराव्याच्या निमित्तानेच पत्र लिहायचे फक्त." ठसक्यात सुनेला बजावून त्या तोऱ्यात निघून गेल्या. गरीब बिचाऱ्या सुनेने सगळे लेखनसाहित्य आपल्या ट्रंकेत टाकले अन् बिचारी कामाला लागली. पण यातूनही तिने मार्ग शोधलाच.

त्यांच्या वाड्यात संडास नव्हते. त्यामुळे त्यासाठी शेजारच्या वाड्यात जावे लागे. कमलेने तेथील मुलांशी संधान जुळवले. तिथेच बसून पत्र लिहायचे व त्या मुलांच्या स्वाधीन करायचे. ती मुले कोणालाही न कळू देता ते पत्र पोस्टात टाकायची.

**असुनी नाथ :**

गुरुराव बाहेरख्याली वृत्तीचे होते. रोजच रात्री बाहेर जात असत. वयाच्या पंधराव्या वर्षी कमलेला नहाण आले. गर्भधान विधी झाल्यावर तिला ' त्या ' खोलीत पाठविण्यात आले. बराच वेळ गेला तरी गुरुराव आलेच नाहीत. कंटाळलेली कमला तेथून उठली व कामाला लागली. सगळी कामे संपली तेव्हा झोपेने पेंगुळली. आडवी झाली अन्

गाढ झोपून गेली. कधीतरी गुरुराव आले. झोपले, अन् पहाटे पुन्हा निघून गेले. कुठे आणि का गेले हे कमलेला कळलेही नाही. आणि तिने कोणाला विचारलेही नाही. मग हा रोजचाच ' रात्रक्रम ' झाला. माहेरून सासरी गेलेली कमला शेवटपर्यंत अनाघ्रातच राहिली.

## सासरी झालेले मृत्यू :

त्याकाळी प्लेगच्या साथीने सर्वत्र धुमाकूळ घातला होता. पहिल्या तडाख्यात कमलाच्या धाकट्या दिराला त्याने उचलले, ही पण हिच्या धाकटी बहिणीसारखी पांढऱ्या पायाची दिसतेय, सासूच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. पण पहिली साथ तेवढ्यावरच निभली. दुसऱ्या खेपेला मोठ्या दिराचा नंबर लागला. तो गेला अन् जावेला प्लेगची लागण झाली. कमलेने तिची मनापासून शुश्रूषा केली. लोक तिला म्हणायचे, ' जाऊ नका तिच्याजवळ ! तुम्हालाही प्लेग होईल. पण तिला भीती कधीही वाटलीच नाही. ती सतत आपल्या जावेजवळ असे. तिचे खाणे-पिणे, औषधपाणी सगळे तिने मनापासून केले. खरेतर नवरा गेलेल्या विकेशा विधवेच्या जीवनात करण्यासारखे किंवा जगण्यासारखे काही नव्हते. नवऱ्यामागे जगणे म्हणजे अर्धपोटी राहून इतरांच्या खस्ता खाणे. त्यामुळे प्लेगने येऊ घातलेल्या मृत्यूचेही तिने मनोमन स्वागतच केले असेल. आपल्यासाठी झिजणारे, कष्टणारे कोणी आहे, या अतीव समाधानातच कमलेच्या जावेने या जगाचा निरोप घेतला आणि पुढचे संकट झेलायला कमला सिद्ध झाली.

## गुरुरावांचा मृत्यू :

गुरुरावांबरोबर विवाह झाल्यावर राहायचे गाव बदलले व कष्टांमध्ये आणि शिव्यांमध्ये वाढ झाली या व्यतिरिक्त कमलेच्या आयुष्यात काहीही बदल झाला नव्हता. त्या आयुष्याला जशी सुखाची गोडी नव्हती तसाच दुःखाचा कडवटपणाही नव्हता. गुरुरावांनी कधी तिची विचारपूस केली नाही आणि तिनेही त्यांच्या बाहेरच्या उद्योगांची कधी चौकशी केली नाही. परंतु एक दिवस अघटित घडले. एक मुसलमान बाई त्यांच्याकडे आली. तिच्या म्हणण्यानुसार गुरुराव तिच्या घरी आले होते व त्यांना प्लेग झाला होता. ती त्यांची ' ठेवलेली ' बाई होती. अशी ही बाई एकच होती की तिच्यासारख्या अनेक होत्या हेही सांगता येत नाही. परंतु गुरुरावांना प्लेग झाला होता आणि त्यामुळे त्यांना घरी आणण्यात आले हे नक्की. कमलेने त्यांची शुश्रुषा मात्र मनापासून केली.

ही घटना १९११-१९१२ च्या प्लेगमधील. धनोत्रयोदशीच्या दिवशी पहाटे साडेतीनच्या सुमारास गुरुरावांची जीवनज्योत मालवली. मृत्यूपूर्वी त्यांनी कमलेकडे मोरावळा मागितला होता. तेव्हापासून ती धनत्रयोदशीला मोरावळ्याचा प्रसाद वाटू लागली. हा प्रसाद कशाचा? बहुदा नसलेल्या बंधातून ती सुटली-मुक्त झाली त्या मुक्तीचा असावा.

**सासरहून सुटका :**

'आपल्याकडे बारशाला आणि बारव्यालाच पत्र लिहायची पद्धत आहे.' असे कमलेला ठणकावून सांगणाऱ्या सासुबाईंनी गुरुरावांच्या निधनाची बातमी मात्र तिच्या माहेरी कळवायची तसदी घेतली नाही. परंतु ही बातमी हस्ते परहस्ते तिच्या माहेरी पोचलीच. त्यावेळी दत्तू ऊर्फ नाना हा कमलेचा भाऊ पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होता. बातमी कळताच तो लगेच गदगला कमलेच्या सासरी पोचला. कमलेच्या सासुबाई केशवपन केल्याशिवाय तिला पाठवायला तयार नव्हत्या. परंतु पोलिसांचा धाक दाखवून नानाने त्या दुर्दैवी प्रसंगातून तिची हिमतीने सुटका केली. (या प्रसंगाचे वर्णन 'कमलगंध' या पुस्तकात कमलाबाईंची भाची प्रा. इंदुमती देशमुख यांनी केले आहे. प्रस्तूत पुस्तक कमलाबाईंचे चरित्र सांगणारे असून कमलाबाईंच्या नंतरच्या काळातील जिवलग मैत्रिणीपैकी सावित्रीबाई मटंगे या कमलाबाईंच्या आठवणी सांगताहेत अशा पद्धतीने लिहिलेले आहे.)

(पृ. ५५ ते ६४)

*"हे वारले, नि माझ्या माहेरी कोणी कळविलं का नाही कोणास ठाऊक. पण तीन दिवस होऊन गेले तरी भावापैकी कोणी आलं नाही. यापुढं आता काय होणार याची मला कल्पना येत नव्हती. पाचवे दिवशी मी आतल्या खोलीत बसले असताना माझ्या भावाचा, नानाचा आवाज आल्याचा भास झाला. थोड्याच वेळात सासूबाईंचा चढलेला आवाजही ऐकला. कितीतरी दिवसात माहेरचं कोणीच भेटलं नव्हतं. त्यातून हा प्रसंग !" कमलाताई.*

*"मगं-खरं म्हणजे सासूबाईंनी आधीच नानांना तरी तुमच्याकडे आणायचं, नाहीतर तुम्हाला तरी नानांकडे न्यायचं, नाही का?" मी सहानुभूतीनं म्हटलं.*

*"अहो मग सासुबाईंना सासू कुणी म्हटलं असतं ? अन् त्या घराला सासर कोण समजलं असतं ? सासरी असंच वागवलं पाहिजे अशी आमच्या घरी कल्पना होती."*

*"बर मग?" वेणूताईंनी मध्ये पडलेला हा खंड सहन न होऊन विचारलं, "मग काय? घरात बसणं अशक्य होऊन मी जवळ जवळ धावतच जाऊन नानाला बिलगले. अन् मग काय विचारता ?"*

*"काय झालं ?" मी.*

*मोठा अनर्थ झाला. सासूबाई एकदम गरजल्या, "शिवलीस का त्याला ? हो दूर."*

*क्षणभर नानाच्या माझ्या पाठीवरच्या हातानं मला अधिकच घट्ट धरलं. मीही नकळत अधिकच जवळ झाले. पण दुसऱ्याच क्षणी आम्ही दूर झालो. मग नाना म्हणाला, "किती दिवसांनी भेट होतेय्. अन् त्यातून हा प्रसंग."*

*"म्हणून काय सारासार विचार सोडायचा की काय?" नानाच्या आर्जवी स्वरानं यत्किंचितही शांत न होता त्या पुन्हा कडाडल्या.*

*या प्रसंगीच्या दुःखाऐवजी राग पाहून नानालाही जरा चीडच आली. तो म्हणाला, "आई, तुम्ही आम्हाला गुरुराव आजारी असल्याचं तर काय, पण गेल्याचंही कळवलं नाही. आम्ही काय कोणीच नव्हतो ?"*

*"येवढा थोरला आमचा माणूस गेला ! कळवायची काय घाई होती येवढी. कळवलं असतं तेरा दिवसांनी." त्याच चढ्या आवाजात त्या बोलत होत्या.*

*"अहो, पण आमची सख्खी बहीण आहे ना इथं ! इथल्या त्या माझ्या मित्रांनं कळवलं म्हणून आज पाचवे दिवशी तरी मी येऊ शकलो इथे." नाना पुन्हा मावळपणानं बोलू लागला.*

*"तुम्ही येण्याचं तरी काय अडलं होतं आत्ताच. आज फक्त पाचवा दिवस. सातवे दिवशी तिचं केशवपन होईल अन् बारावा अन् तेरावा झाला की मगच तिला नेता येईल."*

*"काय." नाना जवळजवळ ओरडलाच. मी तर सुन्न होऊन खालीच बसले. दुःखापेक्षा ही आमची हतबलता मला जाणवली. पण डोळ्यांवाटे थेंबही येत नव्हता.*

*"नाना, जास्त बोलायचं काम नाही. तू नोकरीचा माणूस. जास्त दिवस राहायला तुला फुरसत नसणार. तेव्हा तू आज परत जा अन् चौदावे दिवशी ये. मग घेऊन जा सूनबाईला."*

*त्यांचा हा सारा प्रस्ताव आम्हा दोघांच्याही हृदयाचे तुकडे तुकडे पाडणारा होता. पण त्या जणू आलेल्या पाहुण्याला आपण काही सोयीचं सुचवीत आहो अशा अविर्भावाने शांतपणे बोलल्या.*

*नाना माझ्या सासूबाईंनी केलेल्या त्याच्या स्वागतानं आणि त्यांनी सुचविलेल्या केशवपनाच्या बाबीनं पहिल्यांदा रागावला होता, चिडला होता, पण नंतर माझी जर का या किल्ल्यातून सुटका करायची असेल तर जरा मुत्सदेगिरीनंच डाव टाकला पाहिजे, शिवाय आपण खंबीरपणानं या प्रसंगाला तोंड दिले पाहिजे हे त्यानं ओळखलं. आज त्या प्रसंगाला नानानं धैर्यानं तोंड दिलं, आणि त्यानं ज्या प्रकारानं मला तिथून सोडवून आणलं ते धैर्य ईश्वरानंच त्याला दिलं असं म्हणांव लागेल.*

*आमची उत्सुकता आता शिगेला पोहचली होती. आम्ही आमच्या आसनावर पुनः एकदा चाळवाचाळव करून स्थिर झालो. कमलाताईंचे नेत्र जणू तो प्रसंग स्मृतीच्या रंगभूमीवर अंतर्दृष्टीने पाहात होते पण अलिप्तपणे निर्विकारपणे. त्यांचे डोळे पाहत असूनही काही पाहत नसल्यासारखे होते. त्या स्वप्नातून त्या जाग्या झाल्या. आणि त्यांनी एक उसासा टाकला. नंतर त्यांनी पुन्हा बोलायला सुरुवात केली.*

*"मला राहायला वेळ नाही, खरेच, फक्त आजचीच रजा मिळाली आहे आणि म्हणूनच मी आजच हिला घेऊन जातो. "*

*"अरे वा ! सगळा धार्मिक विधी झाल्याखेरीज कसा नेशील? " सासूबाई.*

*"तुमच्या धार्मिक विधीशी माझा काही संबंध नाही. मी तिला आज घेऊन जाईन. " नाना शक्यतो शांतपणाणं बोलत होता.*

*"हे पाहा जास्त शहाणपणा दाखवू नकोस. ती आमच्या कुळातली आहे आता. सुतकात तिला नेता येणार नाही. शिवाय परवा- "*

*सासूबाईंचे हे वाक्य ऐकणं नानाच्या शक्तीबाहेर होते. तो त्यांचं वाक्य मध्येच तोडून म्हणाला, "परवाचा प्रसंग मी इथं घडू देणार नाही. आम्ही आज जाणार."*

*"जा तू एकटा तुला हवं तर! तुला वाटलं असेल, आपण जाऊन तिच्यासाठी इस्टेट मागू, तिचे दागिने मागू... पण ते काही एक होणार नाही समजलं? "*

*"मला, माझ्या बहिणीला किंवा आम्हा कोणालाच तुमच्या कवडीचाही लोभ नाही आणि तुमच्यासारख्याकडून तिला काही मिळेल अशी आशा तर मुळीच नाही. "*

*"केवढा निर्लोभीपणाचा आव आणतोय अगदी ! अन् येवढा नवरा मेला अन् भाऊ भेटायला आला तर डोळ्याला टिपूस तरी आहे का या तुझ्या बहिणीच्या? अन् भेटायला मोठ्या माणसानं, तुझ्या आईनं, यायचं सोडून तुला काय् पाठवलं? "*

*नाना चिडलेला होता. तरी शांतपणानेच म्हणाला, " मला कोणी नाही पाठवले. कारण तुम्ही कळवलंच कुठे आमच्याकडे. मी आलो तो हिला न्यायला. "*

*" तिला पाठवणं शक्य नाही, सगळे धार्मिक विधी झाल्याशिवाय. तुम्ही सुधारक असाल तर राहू द्या तुमच्याजवळ आमच्याकडे हा अधर्म चालणार नाही. " सासूबाई कडाडल्या.*

*" आईसाहेब, मी माझ्या बहिणीला न्यायला आलो आहे. तिला मी नेणार " नाना.*

*" आला मोठा शहाणा, म्हणे नेणार माझ्या बहिणीला. केशवपन न केल्याने तिचा नवरा अन् त्याचं कुळ नरकात जाईल, त्याचं तुला काय? " संतापून सासूबाई बोलल्या.*

*" मी तिचं केशवपन होऊ देणार नाही. आम्ही आजच जाणार " नाना पुन्हा तेच बोलला.*

*" केशवपन झाल्याशिवाय नेता येणार नाही. इस्टेटीचा वाटा मिळणार नाही " सासूबाई.*

*" हे पहा तुम्ही इस्टेट देणार नाही ना? " नाना.*

*" नाही. "*

*" आज पाचवा दिवस आहे, नवरा गेल्याचा. तोच तिच्या अंगावर तुम्ही फुटका मणी ठेवला नाहीय् त्यावरूनच दिसतेय तुमची वृत्ती ! बरं, पण तुम्ही तिला आपल्या घरीही ठेवणार नाही ना? " नाना.*

*" धुणी-भांडी करून कोपऱ्यात पडून राहिली, तर पोटाला घास मिळेल. पण.... " सासूबाई.*

*" तुमच्या घरात माझी बहीण दिली, ती त्या घराची लक्ष्मी व्हावी, स्वामिनी व्हावी म्हणून दिली. मोलकरीण किंवा गुलाम फुकटात मिळावा म्हणून नव्हे. तुमच्या या अशा वृत्तीमुळे तिला तुमच्याशी पुढं संबंधही ठेवावेसे वाटणार नाहीत. " नानाच्या मुखावर आता निश्चय दिसू लागला होता.*

*" इथं हवाय कुणाला संबंध ? आपला, त्याचा काळानं घास घेतला अन् ..... "*

*आता नानाची सहनशीलता संपत आली होती. सासूबाईंचा उद्देश स्पष्ट झाला होता. अन् बोलायची कुणाचीही प्राज्ञा नव्हती. कर्तबगार मुलेदेखील त्यांच्यापुढे बोलायला भीत. कारण त्या ओरडून, टाकून बोलायच्या आणि कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अपशब्द वापरायच्या. नानाला याचाही अनुभव आलेला होता. आतापर्यंत बहिणीची*

सासू, वयानं वडील म्हणून इतका वेळ ताणून ठेवलेली बंधने सुटली अन् तो म्हणाला, -तरी, आवाज मात्र हलका नि शांतच होता, "आता अखेरचं सांगतो. आता हिचा संबंध तुम्हाला नको असं तुम्ही आता या सर्वांनाच सांगितले. तुमच्या घराचा संबंध जोडणारा माणूस देवाघरी गेला, याचं आम्हाला दुःखही आहे, कारण त्यामुळे माझ्या बहिणीवर केवढातरी दुःखाचा डोंगर कोसळलाय. तुमच्या मुलाचे स्वामित्व दाखविणारे कुंकू, मंगळसूत्र तर तुम्ही कधीच हिरावून घेतलं हिचं. हे करताना आम्हाला विचारलं नाही, सांगितलं नाही. पण आता याहून जास्त तुमचा अधिकार तिच्यावर किंवा आमच्यावर काही नाही."

"अरे शहाण्या, " त्या आपले ओठ संतापाने दाताने चावत म्हणाल्या, " नवराबायकोचे संबंध असे संपत नसतात. साताजन्माचे संबंध असतात ते. तुझ्या शब्दांनी तुटायचे नाहीत ते. " सासूबाई.

"माझ्या शब्दांनी तुटणार नाहीत तसे तुमच्या शब्दांनी जुळणारही नाहीत ते. यमू, चल. "

नाना मला चल म्हणाला, तेवढ्यात त्याचा गोखले नावाचा मित्र आला. त्याला बघून म्हणाला, "अगदी वेळेवर आलास, आम्ही निघतोच आहोत. चल यमुनाताई ".

"खबरदार दाराबाहेर पाऊल टाकशील तर, नाना, जबरदस्तीने अधर्म करायला लावून तिला आमच्या कुळालाही नरकाचं साधन करायला लावायचं असेल तर पोलिसांकडे जावे लागेल आम्हाला. "

"आम्हाला तुमची कवडीही नको. एवढचं काय, आता या घरात पाणीही प्यायची इच्छा नाही आमची. चल यमू. "

सासूबाईंची आज्ञा टाळण्याचं धैर्य मला होणार नाही, असं वाटून नानानं हात धरून मला उठवलंच.

आम्ही एक पाऊल टाकलं, तोच सासूबाई तार स्वरात ओरडल्या, आपल्या दुसऱ्या मुलाच्या नावानं "अरे अशा षंढासारखा बघत काय उभा राहिलास. तो नान्या तिला जबरदस्तीने घेऊन चाललाय. दिसत नाही तुला? बोलाव पोलिसाला. "

"मला वाटलंच होतं तुम्ही ही वेळ आणाल म्हणून !" नानाच्या चेहऱ्यावरचा संताप, चीड कमी होऊन तो शांत झाला होता. एवढंच नाही, तर त्याच्या चेहऱ्यावर किंचीत

*मिष्कील हास्य दिसल्याचा मला भास झाला. पण त्यावेळी हास्यविनोदाच्या मनस्थितीत होत कोण ! नाना पुढे म्हणाला, " पोलिसांची मी आधीच व्यवस्था केलीय. "*

*सासूबाईंच्या तोंडून आता संतापानं आधी शब्दच फुटेना. मग पुन्हा स्वतःला सावरून त्या म्हणाल्या, " आधीच व्यवस्था केलीय म्हणतो अरे कुठे फेडशील हे पाप? " पुन्हा त्यांच्यानं बोलवेना. पण आता नानाही कठोर झाला होता. तो पुढे शांतपणे म्हणाला, "हे माझे मित्र गोखले. यांना तू अगदी वेळेवर आलास म्हटल ते एवढ्यासाठीच. " हे ठाणेदार आहेत. उगीच तमाशा नको, म्हणून साध्या कपड्यातच यायला सांगितलं मी त्यांना. बरे येतो आम्ही. तुम्ही सुतकात असल्याने नमस्कार करायचा प्रश्न येत नाही. चल यमू. "*

*यानंतर कोणी एक अक्षरं बोललं नाही. मी केवळ डोळे उचलून माझ्या प्रेमळ जावेकडे एकवार पाहिले. आम्ही दोघींनी एकमेकींचे रूप डोळा भरून घेतलं. नानानं हात धरून मला पुढं चालवलं. नानाच्या मागे गोखले होते. आम्ही तिघं बाहेर आलो नि टांगा करून गोखल्यांच्या घरी गेलो. लागलीच काही तरी खाऊन पहिल्याच गाडीनं मी आणि नाना माझ्या मोठ्या बहिणीकडे आलो. तिचे सासू-सासरे फार सज्जन होते. माझी आईही तिच्या बाळंतपणासाठी आली होती. माझी आई, माझ्या थोरल्या बहिणीच्या नणंदा या तिघी 'सोवळ्या' म्हणजे केशवपन केलेल्या गंगाभागिरथी होत्या. पण माझ्यावर असा प्रसंग येऊ न देता नानानं मला सोडवून आणल्याबद्दल त्या सर्वांना देखील खूप आनंद झाला. अन् त्यानंतर पुन्हा काही सासरचं तोंड पाहिले नाही. एकंदरीत लग्नानं मला दिलं काय, तर वैधव्य आणि होस्पेट हे आडनाव.*

याच प्रसंगाचे वर्णन कमलाबाईंच्या बंधूनी त्यांच्या ज्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत, त्यात असे आले आहे-

*"मातीचे कमळ-*

*गुरुराव वारले. तेव्हा आई व नाना दोघे सासरी आले होते. वैधव्य आल्यानंतर केशवपन व्हायचे. पण नानांना ते भयंकर वाटले. सासरच्या माणसांना त्यांनी बजावले, मला माझी बहीण हवी, जशीच्या तशी ! दागिने वगैरे सगळे तुम्ही ठेवून घ्या. फक्त नेसत्या कपड्यानिशी तिला घेऊन जातो. हे अब्रह्मण्यम् त्या लोकांना नामंजूर होते. नाना त्यावेळी नुकतेच वयात येत होते. अंगात नवे रक्त सळसळत होते. ते उठले आणि तडक ठाणेदाराकडे गेले. त्याला सर्व परिस्थिती समजावून सांगितली. मी माझ्या*

*बहिणीचे केस काढू देणार नाही आणि तिला आपल्याबरोबर नेणार. सौम्य शब्दातच त्यांनी आपला निर्धार बोलून दाखविला. बहिणीला भोगाव्या लागलेल्या हाल अपेष्टांचा तिच्या बाहेरख्याली नवऱ्याची, खाष्ट सासूची सारी सारी कथा त्यांनी साग्रसंगित ऐकवली व ठाणेदारांचे मन जिंकले. पोलिसांच्या मदतीचे आश्वासन मिळाले.*

*पण त्या मदतीचा प्रत्यक्ष उपयोग करण्याचा प्रसंग आला नाही. दागिने वगैरे मिळाल्यावर सासूला या प्रकरणी फारसे स्वारस्य उरले नाही. तिने उपेक्षा वृत्ती धारण केली आणि आपल्या बहिणीला सहीसलामत घेऊन नाना परतले.*

*" नानांनी हा निर्धार दाखविला नसता तर तर मी तशीच राहिलेली असते. एका न संपणाऱ्या अंधाऱ्या बोगद्यासारखे आयुष्यही जगून दाखविले असते. कारण चारचौघी मुलीपेक्षा आपल्यात काही विशेष आहे, असे वाटते नव्हते. आपण काही विशेष करून दाखवावे अशी सुतराम उर्मी नव्हती. "*

*अनाघ्रात, विकेशा बालविधवा ही काही त्या काळी फारशी दुर्मिळ चीज नव्हती. हरीभाऊ आपट्यांच्या दुर्दैवी यमू तेव्हा घरातघरात होत्या त्यांना लक्षात घेण्याची कुणाला फिकीर नव्हती व फुरसत नव्हती. तिचे सुदैव असे की तिच्याकडे लक्ष पुरविणारे खंबीर व कर्तबगार भाऊ तिला मिळाले.*

एकच प्रसंग. त्याचे दोन व्यक्तीने केलेले वर्णन असे आहे. इंदुमती देखमुख ही कमलाताईची भाची तर दुसरी आठवण खुद्द त्यांच्या बंधूंची आहे. पहिलीत नाट्यमयता भरपूर आहे. त्यामुळे त्या काळातील परिस्थितीचे चित्र साक्षात समोर उभे राहते. परंतु दुसरी आठवण वस्तुस्थितीला अधिक धरून आहे.

गुरुरावांच्या निधनानंतर पाच-सहा दिवसातच सासरचा उंबरठा ओलांडून कमला बाहेर पडली. त्या काळच्या रीतीप्रमाणे ही बंडखोरीच होती. सासरहून बाहेर पडताना तिच्या मनाची पाटी संपूर्ण कोरी होती.

'विवाहाने मला काय दिले ? वैधव्य व होस्पेट हे नाव.'

'मी जर विधवा झाले नसते तर येवढं मोठं काम उभंच करू शकले नसते.' असे कमलाबाई नंतरच्या आयुष्यात म्हणाल्या.

परंतु गुरुरावांच्या घरातून बाहेर पडणे ही एका करारी, मितभाषी पण ठाम, सर्वांवर मातृत्वत् प्रेम करणाऱ्या पण तरीही कमला हे नाव सार्थ करील अशा अलिप्ततेने जगाकडे पाहणाऱ्या नव्या कमलाच्या आयुष्याची सुरुवात होती; याचे सजग भान कोणालाच नव्हते.

* * *

# स्वावलंबनाच्या दिशेने

## मोहनी ब्रदर्स कॉमन वेल्थ :

कृष्णराव व राधाबाई या दाम्पत्याला एकूण ९ अपत्ये झाली. त्यातील एक मुलगी लहानपणीच वारली. उरलेल्या गोपाळ, हरी, दत्तात्रय व पुरुषोत्तम या मुलांना त्यांच्या वडिलांनी वेणू, सीता, यमुना व गंगा या चार मुलींपैकी एक एक बहीण वाटून दिली व तुम्ही आपल्या बहिणीची काळजी घ्या असे सांगितले. यमूच्या वाटल्या आला दत्तात्रय ऊर्फ दत्तू. त्याला सगळे नाना म्हणत. ही गमतीगमतीत झालेली वाटणी असली तरी नानांनी यमूताईंची अखेरपर्यंत पाठराखण केली हेही तितकेच खरे. इतर तीन बहिणी अल्पायुषी ठरल्या. पण नाना व यमू ही जोडी अभंग राहिली. कमलाबाईच्या ' मातृसेवा संघा ' ला तनमनधनाने वाहून घेतलेल्या नानासाहेबांनी कमलाबाईंच्या मृत्यूनंतर अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधीतच या जगाचा निरोप घेतला. कमलाबाईंची मोठी बहीण वेणू व तिचे यजमान यांचे अकाली निधन झाल्यावर त्यांच्या मुलांचे संगोपन कमलाबाईंच्याच भावांच्या एकत्र कुटुंबात झाले; तर त्यांच्या सगळ्यात धाकट्या बहिणीच्या-गंगाच्या मृत्यूनंतर तिच्या मुलांना कमलाबाईंनी स्वतः सांभाळले. पण या नंतरच्या काळातील घटना होत.

बाराव्या वर्षी विवाह होऊन सासरी गेलेली कमला पंधराव्या वर्षी विधवा होऊन माहेरी परत आली. त्यावेळी तिचा वीस वर्ष वयाचा भाऊ दत्तू ऊर्फ नाना पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होता. लोकमान्य टिळकांच्या सहवासात राहायची संधी त्याचा मित्र भैय्या बापट याच्यामुळे त्याला मिळत होती. भैय्या बापट हा बडोद्याच्या

कमिश्नरांचा मुलगा. त्याला अपस्माराचे झटके येत. त्यामुळे त्याच्या सोबत राहण्यासाठी त्याच्या वडिलांनी दत्तू मोहनीची निवड केली होती. भैया व दत्तू हे सतत बरोबर असत. त्याच्याचमुळे दत्तूला टिळकांबरोबर सिंहगडावर राहायची संधी मिळाली. दत्तूची हुशारी पाहून शिक्षण संपल्यावर त्याने ' मराठा ' च्या संपादक मंडळात काम करावे असेही ठरवण्यात आले होते. परंतु भैय्याचा अकस्मात मृत्यू झाला आणि पुढचे सगळेच बेत बारगळले. लहानसहान कामे करून दत्तूने आपले शिक्षण सुरू ठेवले होते. मोठा भाऊ गोपाळ नोकरी करीत होता. इतर दोघेही शिक्षणासाठी धडपडत होते.

तो काळ देशभक्तीच्या वातावरणाने भारलेला होता. आपण देशासाठी संपूर्ण आयुष्याचा होम करावा असे, शिक्षण घेत असलेल्या प्रत्येकाला वाटत असे. वडिलांच्या मृत्यूनंतर मोठ्या गोपाळला मिळेल तशी सरकारी नोकरी पत्करावी लागली. पण आपल्या भावंडांनी भरपूर शिकावे, पैसे मिळवावेत व इंग्रजांविरूद्ध लढावे असे त्याला वाटत असे. देश इंग्रजांच्या गुलामगिरीत व घरी अठराविश्वे दारिद्र्य ! या दोन्ही आघाड्यांवर प्रत्येकाने लढायचे ठरविले असते तर काहीच साध्य झाले नसते. त्यामुळे तिघांनी नोकरी करून कुटुंबाला दारिद्र्यातून बाहेर काढावे व हरिभाऊंनी एकट्याने स्वातंत्र्योद्धात भाग घ्यावा असे ठरले. याला गमतीने ' मोहनी ब्रदर्स कॉमन वेल्थ ' असे म्हणत गोपाळ कृष्ण ऊर्फ भाऊ मोहनीच्या शब्दात या ' मोहनी ब्रदर्स कॉमन वेल्थ ' चे वर्णन असे होते.

*" वडील वारल्यानंतर नानाला शिक्षणासाठी यावलला बहिणीकडे-सीतामाई जामखेडकरांकडे जाऊन राहावे लागले. त्याबद्दल मला सारखे वाईट वाटे. पुढे पुण्याला तो शिकत असता तेथे नानाच्या प्रोफेसरांना डोळ्यात पाणी आणून मी नमस्कार केला आणि म्हटले, ' याच्याकडे लक्ष द्या. ' प्रोफेसरांनी आश्वासन दिल्यामुळे धीर आला. नाना एकेक परीक्षा देऊ लागला, त्यावेळी मीच त्या परीक्षा देतो आहे असे वाटे. माझे शिक्षण कॉलेजात होऊ शकले नाही, पण भाऊ शिकले म्हणजे मीच शिकलो असे वाटून मला आनंद होई. पैसे कसे पुरतील ही विवंचना मला आधीपासूनच असे. मोठे घर चालवायला बरेच पैसे हवे होते. म्हणून नानाला एल्.एल्.बी. चा आग्रह मी केला. नाना वकिलीत खूप पैसे मिळवील आणि दारिद्र्यातून घराला बाहेर खेचील असे मला वाटे. दारिद्र्याचा मला सुरवातीपासून कंटाळा. व्हालंटरी पॉव्हर्टी*

*ही व्रत अथवा धार्मिक भावना म्हणून. त्रास करून घेण्यासाठी म्हणून असू नये. पूर्वीचे ऋषी राजाकडून मिळविलेले जरुर ते द्रव्य ठेवून घेत. बाकीचे टाकून देत. असंग्रही असावे पण आत्मपीडक नसावे असे मला वाटे.*

*आम्हा भावांचे कॉमनवेल्थ पैसे मिळवू लागले. एकाचा कोंडा व एकाचे पोहे असले तरी फुंकून फुंकून सर्व मिळून खात होते. कोणाचा कोंडा व कोणाचे पोहे हा विचार कोणालाही आला नाही. त्यामुळे घरात चांगले वळण लागले व डोळ्यात भरण्याजोगे स्वरूप आले. जास्त पैसे मिळवणारा घराचा नेता व्हावा असे वाटे. त्याला भावांनी बहुतकाळ साथ दिली. स्वतःच्या शुद्धलेखनाच्या पाट्या स्वतःच तपासणे जसे योग्य नाही, त्याप्रमाणेच माझ्या मुलांचे भावांनी व भावांच्या मुलांचे मी कौतुक करावे असे वाटे. सर्व भावांनी यातही साथ दिली. परिस्थितीच्या प्रभावोन माझ्या मुलांचे खरे पालकत्वही त्यांच्याकडे गेले.*

*माझे सर्व आयुष्य 'भू '(To Be) या धातूचे आहे. कृ (To Do) चे नाही. तितक्याला मी पात्र ठरलो नाही व दैवाने तशी संधी दिली नाही. पण आपली धातू (Metal) ओळखून त्याप्रमाणे स्वतःलाच घडविण्याचा प्रयत्न ठेवला. भाऊ पुढे जात होते त्यात आनंद मानू लागलो. 'मी ' चे आकुंचन, व्यक्तिमत्त्वाचे उन्नयन आणि तोच खरा स्वार्थत्याग असे प्रत्ययास आले. त्यामुळे वर्षे आनंदात गेली आणि समाधान वाढत राहिले. 'To become '' होण्याकडे 'भावंडांची प्रवृत्ती राहिली. त्याने घराला मोठेपण आले. त्यात आपलाही भाग आहे असे मी मानले. आपले हात जास्तच समर्थ झाले म्हणजे देहाला वाटणारा आनंद भोगला."*

गोपाळ कृष्ण मोहनीनी लिहिलेल्या (अप्रकाशित) आठवणींचा येवढ्या सविस्तरपणे उल्लेख करण्याचे कारण म्हणजे कमलाबाईंचे पुढील आयुष्य घडविण्यात त्यांच्या भावांचे जे सहकार्य होते, त्या भावांची मानसिकता कशी होती हे लक्षात यावे. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे चार भाऊ चार दिशांना पांगले. पण कालांतराने संधी मिळताच हरिभाऊ सोडून इतर सर्व नागपूरामध्ये एकत्र आले. हरीभाऊ काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यामुळे त्यांचा एक पाय नेहमी तुरुंगात असे. इतर तिघे सरकारी नोकरीत होते. परंतु त्यांच्या चोख कामामुळे हरीभाऊंची देशभक्ती त्यांच्या मार्गावरील अडसर ठरू शकली नाही.

तिन्ही मोहनी बंधू जेव्हा नागपूरला स्थायिक झाले तेव्हा त्यांच्या कुटुंबात, त्यांची बहीण वेणू व तिचे यजमान अकाली कालवश झाल्याने त्यांची चार मुले रहायला आली. त्याशिवाय इतर स्नेह्यांची मुलेही शिकायला त्यांच्या घरी होती. तीन भाऊ, त्यांच्या तिघी अर्धांगिनी, त्यांची मुले व इतर आप्तेष्ट मिळून २५-३० जणांचे हे कुटुंब धरमपेठेतील सोमलवारांच्या बंगल्यात राहत असे. कमलाबाई व हरीभाऊ जाऊन येऊन असत. या कुटुंबातील ७ मुले एकाच वेळी कॉलेजमध्ये शिकत होती. असे हे मोठे कुटुंब त्याकाळी नागपूरमध्ये आदर्श कुटुंब मानले जाई. तिन्ही भावांच्या मुलांचे विवाह होऊन सुना आल्या तरी अनेक वर्षे हे कुटुंब एकत्रच होते. वडिलोपार्जित जमीनजुमला, घर, इस्टेट अशी सर्वांना एकत्र बांधून ठेवू शकेल अशी कोणतीही धनशक्ती नसताना सुमारे ४० वर्षे हे कुटुंब गुण्यागोविंदाने एकत्र राहिले ही निश्चितच आदर्श घटना होती. याच सद्‌गुणांचे विस्तारित रूप कमलाबाईंमध्ये आढळते. त्यांच्या समाजसेवेचा हाच पाया होता असे म्हणणे अधिक योग्य होईल.

## यमीचे पुढे काय ?

मोहनी ब्रदर्स कॉमनवेल्थ समोरील महत्त्वाचा प्रश्न होता, यमीचे आता काय करावे ?

सासरच्या कचाट्यातून कमलेला सोडवून आणल्यानंतर नाना तिला घेऊन त्यांचे एक मित्र गोखले यांच्या घरी पोचले. याच गोखल्यांनी गुरुराव गेल्याचे नानांना कळवले होते. त्यांच्या घरी थोडेसे खाऊन मिळालेल्या पहिल्या गाडीने ते त्यांच्या मोठ्या बहिणीकडे वडगावला गेले. काही दिवसातच कमलाबाईंचे ज्येष्ठ बंधू गोपाळराव यांची धुळ्याला बदली झाल्याचे व त्यांचा पगार बढती मिळून ३५ रुपये झाल्याचे कळले. त्यामुळे सर्व मंडळी धुळ्याला आली.

त्यावेळी त्र्यंबकराव मामा किंवा इतर नातेवाईक व स्नेही मंडळी कमलेच्या समाचाराला यायची. निर्विकार यमूला पाहून हिला नवरा मेल्याचे दुःख कसे होत नाही याचे सर्वांना आश्चर्य वाटायचे. जिथे कुठलेच भावबंध जुळले नव्हते, आपलेपणाची भावनाच अंकुरली नव्हती तिथे दुःख कशाचे होणार ? पण त्याकाळी पंधरा वर्षे वयाच्या मुलीला वैधव्य येणे म्हणजे जगण्याच्या आनंदाला तिलांजलीच होती. यापुढे कुठल्याही आनंद

आपल्याला मिळणार नाही हे कमलेला निश्चित कळले असणार. पण त्याचेही तिला दुःख होत नव्हते. भावाने आपल्याला केशवपनासारख्या दुष्ट रूढीच्या कचाट्यातून सोडवून आणले याची मनाला सांत्वन देणारी जाणीव मात्र तिला निश्चितच होती.

नाना त्यावेळी पुण्याला शिकत होते. त्यामुळे कमलेने महर्षि कर्व्यांच्या संस्थेत राहून शिक्षण घ्यावे व मग स्वतःच्या पायावर उभे राहावे असे सर्वांनी ठरवले. तिला तिथे एकटे वाटू नये म्हणून तिच्या मोठ्या बहिणीच्या मुलीलाही तिथे पाठवण्यात आले. महर्षी कर्व्यांची हिंगण्याची संस्था त्याकाळी ब्राह्मण विधवांचे फार मोठे आशास्थान व आश्रयस्थान होते. बालविधवांना थोडे शिक्षण दिले तर त्या त्यांच्या गावात ' मास्तरणीची ' प्रतिष्ठित नोकरी करून स्वतःचे पोट भरू शकायच्या. त्यांच्या जोडीला तिथे प्रतिष्ठित घराण्यातल्या मुलींनाही शिक्षणासाठी ठेवले जायचे. कमलेने जरी तिथे प्रवेश घेतला असला तरी तिला तिथल्या वातावरणाशी जमवून घेता आले नाही. त्यामुळे तेथून दिवाळीच्या सुट्टीसाठी घरी आल्यावर ती तिकडे परत गेलीच नाही. ' का शिकत नाहीस ? ' या प्रश्नाचे उत्तर ती ' मला आवडत नाही ' असे देत असे. परंतु तिच्या परत येण्यामागे अनेक कारणे असावीत. नाना पुण्याला मेसमध्ये वाढप्याचे काम करून, शिकवण्या करून नादारीवर शिकत होता. हरीभाऊ इंदूरला मित्रांबरोबर राहून शिक्षण घेण्यासाठी धडपडत होते. पुरुषोत्तम व गंगी यांचे शिक्षण सुरू होते. अशा परिस्थितीत आपल्या शिक्षणासाठी भावांना खर्चात पाडावे हे कमलेला पटले नसावे. त्यावेळी मोठ्या भावाकडे म्हणजे गोपाळरावांकडे राधाबाई व पुरुषोत्तम आणि गंगी राहत असत. गोपाळरावांची पत्नी बहुतेक वेळा माहेरीच राहत असे. त्यामुळे आईला घरकामात मदत करणे आवश्यक आहे असेही तिला वाटले असेल. नानाचे अपेंडिसायटीसचे ऑपरेशनही करायचे होते. त्यामुळे त्यांच्या शुश्रूषेचीही गरज होती. आजारी माणसांची शुश्रूषा करायला तिला मनापासून आवडायचे. म्हणूनही ती परत गेली नसावी. सुरवातीपासूनच शाळेची गोडी न लागणे ही कारणेही असू शकतील. पण कमलेने संधी मिळूनही शालेय शिक्षण घेतले नाही हे खरे. तशीही तिला हिंडाफिरायची किंवा मौजमजेची विशेष हौस नव्हती. हाताशी एखादे काम असले की ती खूप असे. हातातल्या कामाव्यतिरिक्त दुसरा कुठलाही विचार करायला तिला आवडत नसे. मूळात अबोल असल्याने तिची कुणाशी विशेष मैत्रीही नव्हती.

## इंदोरला पाठवणी :

त्यावेळी हरीभाऊ इंदूरला त्यांच्या कायंदे, हिरवे, सोनटक्के वगैरे मित्रांबरोबर रहात होते. छोट्या मोठ्या नोकऱ्या करून ही मंडळी शिक्षण घेत होती. त्या बरोबरच देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्याला काहीतरी करायचे आहे, या ध्येयाने ते सर्व प्रेरित झालेले होते. प्रत्यक्ष राजकारणात किंवा समाजकारणात त्यांच्यापैकी कोणी सहभागी झालेले नसले तरी त्याची पूर्वतयारी सुरू होती. ही सर्व मंडळी तेव्हा इंदोरला चितळ्यांच्या वाड्यात राहत होती. साहजिकच कुठलेच पाश नसलेल्या कमलेची इंदूरला रवानगी झाली. तिथे झाडणे, सारवणे, कपडे धुणे, स्वैपाकपाणी अशा कामात तिचा वेळ जाऊ लागला. हरीभाऊंना मात्र तिने अधिक काहीतरी शिकावे असे मनापासून वाटत होते. त्यामुळे तिला काही विषय शिकवायची जबाबदारी त्यांनी आपल्या एकेका मित्रावर सोपवली. १९०३-०४ मधील ही घटना आहे. महाराष्ट्रातील मुंबई-पुण्याला मुलींचे शिक्षण जेमतेम सुरू झाले होते. एरवीही मुलींनी मुलांशी-विशेषतः तरुणींनी तरुणांशी बोलायची पद्धत इतर भागांच्या मानाने सुधारलेल्या/पुढारलेल्या पुण्या-मुंबईतही नव्हती. तिथे इंदोरसारख्या मध्यप्रदेशातल्या रुढीग्रस्त गावात एका तरुण विधवेने तरुण मुलांकडून संस्कृत साहित्यासारखे विषय शिकावेत ही समाजमानसाविरुद्ध केलेली बंडखोरीच होती. सोळा-सतरा वर्षांची तरुण विधवा चार-पाच तरुणांबरोबर एका घरात राहते व लेखन, वाचन, इंग्रजी शिकते ही गोष्ट सामान्य लोकांच्या पचनी पडणे कठीणच होते. आपण काही जगावेगळी गोष्ट करतोय हे कमलेच्या मात्र गावीही नव्हते. मिळणारा एकांत, असणारे स्वातंत्र्य, उपलब्ध असलेल्या संधी यांनी तिच्या मनावर साधा तरंग किंवा ओरखडाही उमटवला नाही. तारुण्यसुलभ भावभावनांनी अस्वस्थ केल्याचे तिला आठवतही नाही असे तिच्या बंधूंनी लिहून ठेवलेल्या आठवणींमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. ‘तुम्ही स्त्रीच नाही असं वाटतं.’ असं तिची मैत्रीण एकदा तिला म्हणाली. ती म्हणजे जन्मजात जितेंद्रिया असावी असेच एकूण तिचे वागणे होते. पण ज्या तरुण मुलांबरोबर ती राहत होती त्यांचे काय ? गोपाळ कृष्ण मोहनींनी लिहिले आहे,

*"हिरवे तिला शिकवता शिकवता कधी अस्वस्थ होत. तिला म्हणत, 'उठून जा.' आणि थोडया वेळाने परत बोलावित. का ? ते तिला कळत नसे. ते तिला म्हणायचे, 'तुम्हाल काहीच कसे कळत नाही ?' एकदा तिने त्यांना विचारले, 'शिमग्याच्या वेळेस ओरडतात त्याचा अर्थ काय?' हिरवे हतबुद्ध होऊन म्हणाले, 'तुम्हाला काहीच कसे कळत नाही?' जांभेकर म्हणायचे, 'माझ्या हातून चूक झाली तर मी तुमच्याशी लग्न करीन.' चूक काय आणि लग्न कशाला करायचे काही कळत नसे. आताही कळतेच असे नाही. ज्याला मोह म्हणता येईल असे या काळात काही झाल्याचे आठवत नाही. अपवाद फक्त चहाचा. सासरी चोरून चहा प्यावासा वाटला तेवढेच. ती एखादा घोट स्वतःसाठी ठेवून देत होती. पण असे करणे वाईट हे मनात सारखे डाचत राहायचे. म्हणून मग चहा सोडला कायमचा..."*

लोकापवादाचे भय न बाळगता कमलेचा जगावेगळा संसार इंदूरपासून सुरू झाला. तिने थोडीशी अनुकूलता दाखविली असती तर तिचा पुनर्विवाह होणे सहज शक्य होते पण विवाह व विवाहोत्तर सहजीवन ही आपली वाट नाही हे तिने स्वतःच ठरवले. त्यामुळे हरिभाऊंच्या तरुण मित्रांना तिच्याबद्दल वाटणारे आकर्षण एकतर्फीच राहिले. यापैकी हिरवे यांची भावंडे, मुले नंतरच्या काळात कमलाताईच्या मातृसेवा संघात त्यांच्या घरीही राहून गेली. सर्वांशीच त्यांचे संबंध स्नेहाचे राहिले.

## आयुष्याला क़लाटणी देणारा क्षण :

याच काळात तिने गांधीजींना प्रथम पाहिले. प्रसंग होता साहित्य संमेलनाचा. डोक्यावर भले मोठे काठेवाडी पागोटे घालून गांधीजी आले होते. ते काय बोलले? त्यांनी काय सांगितले? तिला सांगता आले नसते. पण मंत्रमुग्ध होणे म्हणजे काय? याचा मात्र अनुभव आला. गांधीजीच्या व्यक्तिमत्त्वाने ती अक्षरशः भारावून गेली. आपल्या अंतरंगात कोणते बदल होत आहेत हे तिला शब्दांत सांगताही आले नसते पण एका भव्य दिव्य आयुष्याला अर्थ देणाऱ्या घटनेची ती सुरुवात होती. आजूबाजूच्या सामान्य आणि क्षुद्र जीवनाच्या जाणिवेचा आणि त्याच्यातूनही खूप उंच, मोठे होता येते, या जीवन अर्थपूर्ण करणाऱ्या साक्षात्काराचा तो क्षण होता. कमलेच्या आयुष्याची एका तिलाही न उमगलेल्या मार्गाने वाटचाल सुरू व्हावी म्हणून तिच्या अंतर्मनाला साद घालणारा तो क्षण होता.

प्रत्यक्षात कमलेला येवढेच उमजले होते की झाडणे, सारवणे, धुणी धुणे, रांधणे यांच्यापेक्षा जास्त काहीतरी करणे आवश्यक आहे. आपला आवाका यापेक्षा कितीतरी मोठा आहे. जास्त आहे. तोपर्यंत १९१९ साल उजाडले होते. देशाच्या राजकारणाची सूत्रे टिळकांकडून गांधीजींकडे जात होती. आता स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह करायला हरीभाऊ आणि त्यांचे मित्र सिद्ध झाले होते. तोपर्यंत कमलाबाईंचे ज्येष्ठ बंधू गोपाळराव नागपूरला नोकरीत रुजू झाले होते. त्यांचे सर्वात धाकटे बंधू पुरुषोत्तम ऊर्फ दाजी हेही सेक्रेटरीएटमध्ये नोकरी करू लागले होते. इंदूरचे घर बंद करून मंडळी आपापल्या ठिकाणी पांगली व कमलाबाई नागपूरला आल्या. आता मात्र आपणही काहीतरी वेगळे काम केले पाहिले असे त्यांना वाटू लागले.

घराबाहेर पडून काही काम करायचे तर त्यासाठी शिक्षण घ्यायला हवे. शिक्षण घ्यायचे म्हणजे भावांवर पुन्हा आपले आर्थिक ओझे टाकणे आले. त्यातून मार्ग कसा काढायचा हा कमलाताई पुढील महत्त्वाचा प्रश्न होता. त्या काळात परित्यक्ता किंवा विधवांनी स्वीकारावेत असे दोनच व्यवसाय होते. शिक्षिका किंवा परिचारिका. परिचारिकेच्या व्यवसायाला फारशी प्रतिष्ठा नव्हती. पण परिचारिका होण्यासाठी लागणारे प्रशिक्षण मोफत होते. इतकेच नव्हे तर प्रशिक्षणकाळात विद्यावेतनही मिळत असे. त्यामुळे आपण परिचारिकाच बनायचे हे कमलाताईंनी ठरवून टाकले. कमलाताईंचे बंधू दत्तात्रय ऊर्फ नाना यांचे स्नेही व नागपूरमधील 'ऑल इंडिया रिपोर्टर' या मोठ्या कंपनीचे मालक आप्पासाहेब चितळे यांच्या भगिनी सावित्रीबाई मटंगे यांच्या यजमानांचे नुकतेच निधन झाले होते. व त्या जबलपूरच्या आपल्या सासरहून माहेरी नागपूरला आल्या होत्या. नानांचे दुसरे एक स्नेही हरीभाऊ नेने हे प्रसिद्ध लेखक व संशोधक होते. त्यांची वेणूताई साने ही बहिणही बालविधवा होती. या तिन्ही मित्रांनी एकत्र येऊन विचारविनिमय केला व आपल्या भगिनींना परिचारिकेच्या प्रशिक्षणासाठी पाठवायचे ठरविले. वास्तविक पाहता या तिघींच्या भावांची आर्थिक स्थिती आपल्या विधवा बहिणींना जन्मभर पोसता येण्याइतकी सक्षम होती. परंतु तिघींनाही भावांच्या जीवावर जन्मभर लाचारीने जगणे मानवणारे नव्हते आणि म्हणून त्यांनी नागपूरच्या डफरीन हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षणासाठी एकदमच प्रवेश घेतला.

सध्या नागपूरला जेथे मेयो हॉस्पिटल आहे त्याच्या परिसरातच डफरीन हॉस्पिटल होते. परिचारिकेचा अभ्यासक्रम हा दोन वर्षांचा निवासी अभ्यासक्रम होता. सावित्रीबाईंना

दोन मुले होती. त्यांची मुले त्यांनी आपल्या आईजवळ ठेवली. वेणूताईंचे सासरचे आडनाव साने होते. पण कारकुनाने ते चुकून नेने असे लिहिले. ते बदलायच्या भानगडीत न पडता त्यांनी आपले नेने हे माहेरचे आडनावच कायम ठेवले. म्हणजे कमलाबाईचा निदान नावापुरता तरी सासरशी संबंध होता; वेणूताईंचा तितकाही नव्हता.

हॉस्पिटलच्या परिसरामध्ये एका खोलीत कमला, सावित्री व वेणू या तिघीजणी एकत्र राहू लागल्या. सर्वच कामांच्या बाबतीत स्वावलंबन असल्याने आपल्या ड्युटीच्या वेळा सांभाळून त्या आळीपाळीने सर्व कामे करीत. सोवळे-ओवळे हा प्रकार तेव्हा फारच कडक असायचा. या सकेशा विधवा असल्या तरी बहुधा त्यांचे काम बाळंतिणीच्या वॉर्डातच असायचे. त्यामुळे घरी आल्यावर आंघोळ करून, ओलेत्याने कपडे बदलून मग स्वैपाक व जेवण करता यायचे. अशा वेळी सकाळी जिची ड्यूटी नसेल तिने स्वैपाकाची जबाबदारी सांभाळणे हे ओघाने आले. सुटीच्या दिवशीही क्वचितच घरी जाता येत असे. त्यातून सावित्रीबाईंची मुले घरी असल्याने त्यांना घरी जायची ओढ जास्त असे व कमलाताई आणि वेणूताईही त्यांना जाता यावे म्हणून त्यांची ड्यूटी सांभाळत असत.

## पहिला फटका :

ट्रेनिंग सुरू झाले आणि काही दिवसातच कमलाबाईंच्या आई नगरसूलला आजारी असल्याचे कळले. लहान वयातच पितृछत्र हरपल्याने कमलाबाई स्नेहबंधनाने त्यांच्या आईशी अधिक घट्ट बांधल्या गेल्या होत्या. आईला बरे नाही, ती आजारी आहे असे कळताच त्यांच्या मनाची घालमेल सुरू झाली. घरी जायची परवानगी मागू की नको अशा विचारात दोन दिवस घालवल्यावर अखेर मनाचा धीर करून त्या अभ्यासक्रमाच्या प्रमुख डॉ. द्वारकाबाई कमळाकर यांच्याकडे गेल्या व त्यांनी आई आजारी असल्यामुळे घरी जायची परवानगी मिळावी अशी द्वारकाबाईंना विनंती केली. परवानगी तर मिळाली नाहीच पण 'प्रवेश घेतानाच येत्या दोन वर्षांत आपले कोण-कोण आजारी पडणार आहे व कोणाकोणासाठी आपल्याला जावेसे वाटणार आहे याचा विचार करायला हवा होता' असेही सुनावण्यात आले. काही दिवसांनी आई बरी झाल्याचे कळले व कमलाबाईंची

मनाच्या घालमेलीतून सुटका झाली. परंतु या घटनेने त्यांनी आपल्या वर्तणुकीत कटुता येऊ दिली नाही. पुढच्या काळात करडी शिस्त आणि मानवीय दृष्टिकोनातून प्रत्येकाचा स्वतंत्र विचार याची जी उत्कृष्ट सांगड कमलाबाईंनी घातली त्याचे बीज त्यांच्या मूळ स्वभावाबरोबरच या घटनेतही असावे असे वाटते.

## स्वतंत्र व्यवसायाचे बीजारोपण :

इंग्रजांच्या राज्यात मिळणाऱ्या शिक्षणात फक्त करडी शिस्तच नव्हती तर प्रचंड भेदभावही होता. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणात व सवलतीत काळे आणि निमगोरे (अँग्लो इंडियन्स) यांच्या बाबतीत दुहेरी मानक असायचे. इतकेच काय; पेशंटला देण्यात येणाऱ्या वागणुकीतही हा भेदभाव असायचाच. याचा जबरदस्त चटका कमलाबाईंना काही दिवसातच बसला. प्रसंग होता पेशंटला कमोड देण्याचा. एक दिवस कमलाबाईंना मेट्रनचे बोलावणे आले. त्या काळी अशा अधिकाराच्या जागांवर युरोपियन किंवा अँग्लो इंडियन स्त्रियाच असत. आणि ही अधिकारपदे मिळण्यासाठी त्यांची बुद्धिमत्ता नव्हे तर त्यांचा गोरा रंगच फक्त कारणीभूत ठरत असे. मेट्रन समोर उभ्या राहिलेल्या कमलाबाईंना मेट्रनने विचारले, “त्या हिंदू स्त्रीला कमोड कोणी दिले?”

“मी.” निर्भयपणे कमलाबाई म्हणाल्या. मेट्रनची अपेक्षा होती की कमलाबाई एकतर स्वतःची जबाबदारी टाळतील किंवा खोटे बोलतील व आपल्याला त्यांचे कान उपटायची संधी विनासायास मिळेल. पण इथे तर कमलाबाईंनी सरळसरळ कबुलीच दिली.

“हिंदू पेशंटला कमोड द्यायचा नाही.” मेट्रनने बजावले.

“तिला उठवत नसेल तरी ?” कमलाबाईंनी शांतपणे विचारले.

“हो ! तिला उठवत नसेल तरी हिंदू पेशंटने तिकडे उठूनच गेले पाहिजे.” मेट्रनने अधिकारयुक्त स्वरात बजावले.

यावर कमलाबाई काहीच बोलल्या नाहीत. परंतु जिथे असा भेदभाव नसेल असे हॉस्पिटल काढायचा त्यांनी मनोमन निश्चय केला.

ट्रेनिंगच्या दोन वर्षांच्या काळात कमलाबाईंनी भरपूर कष्ट उपसले. मुळात रुग्णसेवेचे त्यांना वेडच होते. आणि कष्टांचा कंटाळाही नव्हता. कमलाबाई शाळेत गेल्या नसल्या तरी घरच्या घरी त्यांचे बरेच शिक्षण झाले होते. त्यांची बुद्धीमत्ताही तीव्र होती. त्यामुळे

त्या आपल्या इतर मैत्रिणीच्या नोटस्ही लिहून देत असत. सावित्रीबाई मटंगे व वेणूताई नेने तितक्याच बुद्धिमान व कष्टाळू होत्या. त्यामुळे त्या तिघीही चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण होणार याबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती व झालेही तसेच.

## ट्रेनिंग संपले पुढे काय :

परीक्षेचा निकाल लागायच्या आधीच, अभ्यासक्रमाच्या प्रमुख डॉ. द्वारकाताई कमळाकर यांनी कमलाबाई व वेणूताई यांना बोलावून, अभ्यासक्रम संपल्यानंतर त्याच हॉस्पिटलमध्ये नोकरी करणार का, म्हणून विचारले, परंतु दोघींनीही त्यांना स्पष्ट नकार दिला. "मग घरोघरी जाऊन बाळंतपणे करणार का? तसे असेल तर आधीच सांगून ठेवा. म्हणजे मी तुमच्याकडे केसेस पाठवत जाईन." डॉ. कमळाकर म्हणाल्या.

"तसे अजून नक्की काहीच ठरविले नाही. ठरले की तुम्हाला कळवू." कमलाताई म्हणाल्या. वेणूताईंनी त्यांना अनुमोदन दिले.

खरेतर काय करायचे हे त्यांनी मनोमन ठरविले होतेच. त्यावेळी सावित्रीबाईंची मुले जबलपूरला त्यांच्या दिराकडे शिकत होती. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर त्या जबलपूरला गेल्या व तिथे स्वतंत्र प्रॅक्टिस करू लागल्या. त्याकाळी कुलीन स्त्रियांनी परिचारिकेचे किंवा सुईणीचे काम करणे कमी दर्जाचे मानले जाई. त्यामुळे सावित्रीबाईंच्या दिरांनी त्यांना आपल्या घरापासून बरेच दूर, गावात बिऱ्हाड करायला लावले. परंतु तिथे त्यांचा जम बसला नाही म्हणून म्हणा किंवा दिरांशी पटले नाही म्हणून म्हणा पण त्या नागपूरला परत आल्या

कुठेही भेदभावाला थारा नसणारे हॉस्पिटल काढायचे हे कमलाबाईंनी ठरवले तर होते; पण त्याची सुरूवात कुठून व कशी करायची हा त्यांच्यापुढील फार मोठा प्रश्न होता. नागपूरला भगिनी मंडळ नावाची एक स्त्रियांची संस्था होती. कमलाबाईंसाठी असे सूतिकागृह काढायची त्यांनी तयारीही दाखविली. असे झाले असते तर सूतिकागृहाची मालकी भगिनी मंडळाची राहिली असती व कमलाबाई किंवा वेणूताई यांचा दर्जा नोकराचाच राहिला असता. कोणाचीही नोकरी करायची नाही असे त्यांचे ठरलेलेच होते. त्यामुळे त्यांनी या प्रस्तावाला नकार दिला. घरोघरी जाऊन बाळंतपणे करणेही त्यांना मान्य नव्हते.

## सूतिकागृहाची स्थापना :

काय करावे याचा विचार कमलाबाईंच्या मनात सतत सुरू होता. एक दिवस सीताबर्डी या नागपूरातल्या मुख्य भागात काही कामासाठी गेल्या असता, त्यांची मथुताई द्रवीड यांच्याशी गाठ पडली. द्रवीड कुटुंबीय त्या काळातल्या प्रतिष्ठित घराण्यांपैकी एक होते. आपल्याला सूतिकागृह काढायचे आहे ही इच्छा कमलाबाईंनी मथुताईसमोर व्यक्त केली. जवळ साधनसामग्री काहीच नव्हती. जागेचा प्रश्न होता आणि अनुभवही फारसा नव्हता. पण त्याचबरोबर पैशांची हावही नव्हती आणि समाजसेवेसाठी भरपूर कष्ट करण्याची दुर्दम्य इच्छाही होती. मुख्य प्रश्न अर्थातच जागेचा होता. मथुताई त्यांना घेऊन मोदी नंबर दोनमधील सीताबाई गोखले यांच्या घरी गेल्या. सीताबर्डीवर मोदी नं. १, २, ३ असे तीन मुख्य बोळ, त्यानंतर हनुमान गल्ली, असे चार बोळ एकमेकांना समांतर आहेत. त्यांना काटकोनात असणारे तीन मुख्य रस्ते होते. एक नाग नदीला समांतर (हाच रस्ता आता सीताबर्डीच्या मातृसेवा संघाच्या इमारती पुढून जातो. नागनदी बांधून काढल्याने तिचा आता नालाच झाला आहे.). दुसरा सीताबर्डीचा मुख्य रस्ता व तिसरा त्याच्यापुढे, पटवर्धन शाळेसमोरून जाणारा.

सीताबाई गोखले यांनी आपल्या मोदी नं. २ मधील वाड्यातील काही भाग कोणतेही भाडे न आकारता तीन वर्षांसाठी कमलाबाईंना देण्याचे कबूल केले. 'सीताबर्डी सूतिकागृह' हे नाव निश्चित झाले. जवळच राहणाऱ्या सीताबाई गाडगीळ यांनी संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारायचे मान्य केले. जवळचा मुहूर्त होता अक्षय तृतीयेचा. नवीन काम अक्षय्य टिकून रहावे म्हणून अतिशय योग्य मुहूर्त. त्या दिवशी सूतिकागृहाची सुरुवात करण्याचे ठरले. तारीख होती ८ मे १९२१.

सीताबाई गोखल्यांच्या वाड्यात सूतिकागृह सुरू झाले. पहिल्या कार्यकारिणीत सीताबाई गाडगीळ या अध्यक्ष होत्या हे वर आले आहेच. गंगाबाई गोखले यांनी सचिवपदाची जबाबदारी सांभाळली तर मानद डॉक्टर म्हणून इंदिराबाई नियोगी यांनी काम करायचे मान्य केले. लक्ष्मीबाई केळकर, लक्ष्मीबाई गाडगीळ, कमलाबाई होस्पेट व वेणूताई नेने या कार्यकारिणीच्या सदस्य होत्या. डॉ कमळाकर यांनीही गरज पडेल

तेव्हा निःशुल्क सेवा द्यायचे मान्य केले. तीन वर्षेपर्यंत आपल्या लाडक्या विद्यार्थिनींना ही मदत दिलीही. अध्यक्ष-सचिव ही मंडळी कार्यकारिणीवर असली तरी सूतिकागृहाचा खरा भार कमलाबाई व वेणूताई यांच्या खांद्यावरच होता. अगदी सुरुवातीलाच ही गोष्ट स्पष्ट झाली. "येथे 'सूतिकागृह' आहे" अशी पाटी लावू या." कमलाबाईंनी सुचविले. त्यावर एक सदस्य म्हणाल्या, "आधी सूतिकागृह चालू तर लागू द्या. नाही चालले तर पाटीचा खर्च उगाच वाया जाईल."

"सूतिकागृह चालले नाही तर त्याच पाटीवर पाणी तापवून त्याच्या नावाने आंघोळ करून मोकळ्या होऊ." कमलाबाई ताडकन् म्हणाल्या. त्यांच्या ठाम आग्रहावरुन वाड्यावर पाटी लागली. 'सीताबर्डी सूतिकागृह'. वेणूताई व कमलाबाई तिथेच मुक्कामाला आल्या. सोबत म्हणून कमलाबाईंचा धाकटा भाऊ पुरुषोत्तम झोपायला येऊ लागला.

## पहिली कसोटी :

त्या काळी सूतिकागृहेच नव्हती. त्यामुळे तशीच कठीण वेळ आल्याशिवाय दवाखान्यात बाळंतपणासाठी जायची पद्धत नव्हती. काही दिवस वाट पाहिल्यावर पहिला पेशंट आला. ही त्या बाईंची दुसरी खेप होती. पहिले बाळंतपण सुखरुप झाल्याने बाई व त्यांचे यजमान दोघेही निश्चिंत होते. रात्रभर कळा देऊन बाई थकली. वेळ कठीण आहे हे कमलाबाईंनी ओळखले. पण नवराबायको दोघेही शांत होते. पहिल्या अनुभवामुळे सगळे नीटच होणार याची त्यांना खात्री होती. कमलाबाई मनातून हबकल्या होत्या. पहाटे चारच्या सुमारास त्यांनी बाईंच्या यजमानांना 'टांगा घेऊन जा व डॉक्टरांना लगेच घेऊन या.' म्हणून सांगितले. ते जाऊन डॉक्टरांना घेऊन येईपर्यंत दीड-दोन तास सहज लागले असते. बाईंची तब्येत क्षणोक्षणी गंभीर होत होती.

शेवटी कमलाबाई अंगणात गेल्या. तुळशीच्या रोपाच्या मुळाजवळची घमेलेभर माती त्यांनी उकरून काढली. ती ओली करुन बाईच्या पोटावर थापली आणि वरतून हाताने हलके हलके दाब देऊ लागल्या आणि काय आश्चर्य ! मूल अलगद बाहेर आले. डॉक्टर येऊन पोचायच्या आत बाई सुखरुप बाळंतीण झाली. बाळ-बाळंतीण दोघेही तंदुरुस्त ! कमलाबाईंनी मनोमन देवाला हात जोडले. पहिल्याच केसच्या वेळी अपयश आले असते तर तो डाग धुवून काढायला खूप वेळ लागला असता.

## सुरुवातीचा खडतर काळ :

पहिल्या वर्षी संस्थेत एकूण ३७ बाळंतणे झाली त्यातली तीन धर्मार्थ म्हणजे मोफत केली. उरलेली ३४ बाळंतपणे प्रत्येकी ५ रुपये फी घेऊन केली. कमलाबाई व वेणूताई एक पैसाही मानधन म्हणून घेत नव्हत्या. वैद्यकीय मदतीसाठी बोलावलेले डॉक्टरही मोफतच काम करीत. घरभाडेही नव्हते. तरीही गरज पडेल तशी साधनसामग्री विकत घेणे, हॉस्पिटलचा इतर खर्च, बाळंतिणीची औषधे, जेवणे यासाठीही खर्च येतच होता. कार्यकारिणीतल्या सदस्या घरोघर जाऊन वर्गणी गोळा करून आणित. पण जमा-खर्चाची हातमिळवणी होणे कठीणच जात असे. सुरुवातीला घरोघर जाऊन बाळंतपणे करायची नाहीत असे ठरले होते. परंतु नंतर मात्र सावित्रीबाई व वेणूताई एखाद्या घरचे बोलावणे आले तर जाऊ लागल्या.

पहिल्याच वर्षी संस्थेला थोडे आर्थिक स्थैर्य यावे म्हणून बळवंत संगीत मंडळीच्या 'वीर विडंबन' या नाटकाचा प्रयोग घेण्यात आला. स्वतः डॉ. द्वारकाबाई कमळाकर व सीताबाई गाडगीळ यांनी तिकीटे खपवून संस्थेला १२०३ रुपये मिळवून दिले. त्यापैकी एक हजार रुपये कायमस्वरुपी निधी म्हणून बाजूला ठेवण्यात आले. इतर देणग्या मिळून संस्थेला १२३७ रुपये ४ आणे मिळाले आणि खर्च झाला १५६० रुपये. जमा आणि खर्चाचे हे प्रमाण सतत कायम राहिले. देणग्या मिळवत आणि विविध प्रकल्प सुरू करत संस्था वाढत राहिली. उत्पन्न वाढत राहिले आणि खर्च वाढल्याने कर्जही वाढत राहिले.

सीताबाईंचा वाडा संस्थेच्या कामाला अपुरा पडू लागला. त्यामुळे इकडचे सामान तिकडे, तिकडचे आणखी कुठे अशी हलवा-हलव करत सूतिकागृहात येणाऱ्या बाळंतिणींची सोय करावी लागे. इंडियन विमेन्स मेडिकल सर्व्हिसेसमधील एक वरिष्ठ अधिकारी डॉ. मिस बालफोर यांनी संस्थेला भेट दिली व संस्थेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून दिल्ली येथील लेडी चेम्सफर्ड ऑल इंडिया मॅटरनिटी व चाइल्ड वेल्फेअर लीगच्या वार्षिक सभेत नागपूरची अनुकरणीय संस्था म्हणून सूतिकागृहाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

बाळंतिणींची संख्या जशी दिवसेंदिवस वाढत होती तशी संस्थेची प्रसिद्धिही दिवसेंदिवस होत होती. त्यामुळे आपणहून मदत करायला अनेक हात पुढे सरसावू लागले. आजूबाजूच्या खेड्यांमधून बाळंतिणी येऊ लागल्या. संस्थेचे एक सभासद बाबूराव पातूरकर यांनी बाळंतिणींना घरी पोचवून देण्यासाठी आपली गाडी दिली. बाळंतीण बाळाला घेऊन मोटारीतून घरी जाते, हे त्याकाळी अप्रूप होते.

## दुसरे माहेर :

बाळंतपण झाले की दुसऱ्या दिवशी डिसचार्ज ही आजची पद्धत त्याकाळी नव्हती. दहा दिवस अशौच्य म्हणजे सोवळे-ओवळे पाळले जायचे. वाहतुकीची साधनेही नव्हती; त्यामुळे घरून बाळंतिणीचे जेवण आणणे शक्य नसायचे. बाळंतपणासाठी एकदा दवाखान्यात प्रवेश घेतला की दहा दिवसांनी 'शुद्ध' होऊन घरी जाईपर्यंत बाळंतिणीचा सांभाळ सूतिकागृहच करीत असे. रोज साजुक तुपातल्या शिऱ्याचा नाश्ता, दोन्ही वेळेला ताजे गरम गरम जेवण, मधल्या वेळी फोडणीच्या लाह्या, आळिवाची खीर, बाळंतपणातील शेक-शेगडी, सगळे निगुतीने सांभाळले जाई. तेलाने अंग चोळून बाळ, बाळंतिणीला आंघोळ घालणे, त्यांचे कपडे धुणे ही कामेही सूतिकागृहच करीत असे. इतकेच नव्हे तर घरच्यांनी इच्छा प्रदर्शित केली तर भटजी बोलावून पाचवीची पूजाही सूतिकागृहात केली जायची.

त्यामुळे, सडासारवणासाठी कांजी हाऊसमधून शेण आणण्यापासून किराणा भाजीपाला आणण्यापर्यंत खरेदीची कामे व संडास (त्या काळी पाटीचे संडास असत) साफ करणे, सडासारवण करणे, धुणं भांडी उरकणे, स्वैपाक करणे, वाढणे ही कामेही सुरुवातीच्या काळात कमलाबाई व वेणूताई करत होत्या. कारण नोकर माणसांवर खर्च करणे परवडत नव्हते.

दहाव्या दिवशी शिकेकाईने न्हायला घालून उदाने केस वाळवून, शेक-शेगडी करुन, पोटभर खायला प्यायला घालून बाळंतिणीची तिच्या घरी रवानगी होई. एरवी सासरच्या उन्हाळ्यात करपून जाणाऱ्या बाळंतिणीला सूतिकागृहातले वातावरण म्हणजे पर्वणी वाटायची व माहेरी गेल्याचे सुखही मिळायचे. त्यामुळे सूतिकागृह हे स्त्रियांना दुसरे माहेरच वाटत असे.

हे सर्व करण्यासाठी लागणाऱ्या शारीरिक कष्टांचा विचार केला की सूतिकागृहाच्या उभारणीसाठी कमलाबाई व वेणूताईंनी खालेल्या खस्तांची कल्पना येऊ शकते. समाधान मात्र खूप मोठे होते. नोकरीतला मिंधेपणा न येता समाजसेवा घडत होती. आपल्या मनाप्रमाणे काम करता येत होते; व त्या कामाला प्रतिष्ठित सन्माननीय व्यक्तींनी दिलेल्या देणग्यांच्या रूपाने पावतीही मिळत होती.

पहिल्याच वर्षी उत्कृष्ट संस्था म्हणून संस्थेचा नावलौकिक दिल्लीपर्यंत पसरला. नागपूरच्या म्युनिसिपालटीकडून आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न कमलाबाईंनी केला व तो यशस्वी झाला. नागपूर नगरपालिकेकडून संस्थेला आर्थिक मदत मिळू लागली. नियमित देणग्या देणारे वर्गणीदारही मिळाले. त्याकाळी बाळंतपण कठीण असले तर सरकारी इस्पितळात जावे लागे. तेथे अनास्था, भेदभाव व निष्काळजीपणाचा अनुभव पेशंटच्या सतत वाट्याला येई. त्यामुळे कुठल्याही डामडौलाशिवाय अत्यंत साधेपणाने व आपुलकीने वागणारे ‘सीताबर्डी सूतिकागृह’ लोकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. अत्यल्प पैशांत बाळबाळंतिणीचा निगुतीने सांभाळ होत असल्याने सूतिकागृहाची प्रसिद्धी सर्वदूर होऊ लागली. दोघी मैत्रिणींच्या आयुष्याला अर्थ आला व निश्चित दिशाही लाभली.

*

# जगावेगळा संसार

दक्षिण-उत्तर जाणाऱ्या रेल्वे लाईनमुळे नागपूरचे दोन भाग झाले आहेत. पूर्व नागपूरात त्या काळी प्रामुख्याने महाल हा भाग होता. तर पश्चिम नागपूरात सीताबर्डी. सीताबर्डी सूतिकागृह ते महाल अंतर अंदाजे ३ ते ४ किलोमीटर होते. त्याकाळी टांग्यांशिवाय दुसरे वाहतुकीचे साधनही नव्हते. आणि टांगा ही गरिबांच्या दृष्टीने चैनच होती. सीताबर्डी सूतिकागृहात प्रसूतीसाठी जाणे महालातील लोकांना सहज शक्य नव्हते. त्यामुळे महाल विभागातही सूतिकागृह असावे अशी मागणी जोर धरू लागली. अनेक स्नेह्यांनी व परिचितांनी तसा आग्रह धरला. एव्हाना सीताबर्डी सूतिकागृहाचा चांगला जम बसला होता. वेणूताई नेने ते सूतिकागृह नीट सांभाळतील याचा कमलाबाईंना विश्वास होता आणि म्हणून त्यांनी महालात जागेचा शोध सुरु केला. तशी एक सोयीस्कर जागा हिंदू मुलींच्या शाळेसमोरील गल्लीत मिळाली. १ ऑगस्ट १९२७ ला सीताबर्डी सूतिकागृह वेणूताईवर सोपवून कमलाबाई बक्षींच्या वाड्यात राहायला आल्या. जागा भरपूर मोठी होती. भाडे होते १० रुपये महिना. कमलाबाईंनी जागेचे दोन भाग केले. मोठ्या भागात सूतिकागृह थाटले व लहान भागात त्यांनी आपला संसार थाटला.

**आगळावेगळा संसार :**

लहान वयात वैधव्य आल्याने असेल, नवरा बाहेरख्याली असल्याने असेल, पण कमलाबाईंच्या मनात तारुण्यसुलभ भावनांचा फुलोरा कधी फुललाच नाही. कमलाबाईंनी थोडीशीही अनुकूलता दाखविली असती तरी त्यांचा पुनर्विवाह होणे अशक्य नव्हते. पण त्यांच्या मनात अशा तारुण्य सुलभ भावना निर्माणच झाल्या नाहीत. त्याची परिपूर्ती विशाल मातृत्व भावनेने केली. अनेक पोरक्या बालकांचा सांभाळ करून मनातील मातृत्व भावनेला त्यांनी याच काळात प्रकट रूप दिले.

केवळ अनाथ किंवा पोरकी मुले त्यांनी सांभाळली असेही म्हणता येणार नाही. आई अचानक वारल्यामुळे पण वडिलांना सांभाळणे जमणार नाही अशी मुलेही त्या सांभाळत. फसलेल्या विधवा किंवा कुमारिकांची मुलेही त्या सांभाळू लागल्या. परित्यक्ता स्त्रियांना किंवा निराश्रित विधवांना त्यांच्या मुलासकट आश्रय देऊ लागल्या. आणि हे सर्व साध्य करण्यासाठी खांद्याला झोळी अडकवून दारोदारी वर्गणी मागत फिरुही लागल्या. खादीची जाडीभरडी पातळे त्या वापरत. स्वतःला मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या गरजाही फारशा नव्हत्या. स्वतःची स्वतंत्र खोली, अंथरुण-पांघरूण, पलंग या गोष्टीही नसायच्या. त्या वर्गणी मागत ती इतरांसाठी. त्यामुळे मागताना त्यांना संकोचही वाटत नसे. लाचारीचा तर लवलेशही नव्हता. त्यांची निर्लेप, अनासक्त वृत्ती परिचयाची असल्याने देणाराही यथाशक्ती देणगी देत असे. खर्चाच्या बाबतीत त्या काटकसरी होत्या; पण हिशोबी नव्हत्या. नंतरच्या काळात संस्थेचे रजिस्ट्रेशन होऊन ऑडिट सुरु झाले तेव्हा मात्र संचालक मंडळाची हिशोब जुळविता-जुळविता तारांबळ उडू लागली. पण हा फार पुढचा भाग झाला.

महाल शाखा सुरु झाली आणि काही दिवसातच तिथे एक पहिलटकरीण बाळंतपणासाठी आली. कमलाबाईंनी दिलेल्या आपुलकीच्या वागणुकीमुळे ती खूपच भारावून गेली. त्यामुळे प्रसूतीनंतर घरी गेल्यावरही तिचे सूतिकागृहात जाणे-येणे सुरू राहिले. एखादा नव्हाळीचा खाद्यपदार्थ केला की ती कमलाबाईंसाठी आवर्जून आणत असे. तिच्या मुलाचाही कमलाबाईंना लळा लागला होता. ५-६ महिनेच झाले असतील. ती तरुणी अचानक मृत्यू पावली. त्या आईविना पोरक्या बाळाचे संगोपन कसे करायचे हा त्याच्या पित्यापुढील प्रश्न होता. परंतु त्यांनी काही म्हणायच्या आतच कमलाबाई त्यांना म्हणाल्या, "या किशोरला आता इथेच ठेवा व तुम्ही दुसरे लग्न करा." खरे तर त्या गृहस्थांना हेच म्हणायचे होते. आपल्या मनातला विचार कमलाबाईंनी अचूक ओळखल्यामुळे ते खजील झाले. पण मुलाला कमलाबाईंच्या स्वाधीन करुन निघूनही गेले. पुढे त्यांनी लगेचच दुसरा विवाह केला हे सांगायला नकोच. किशोर मग कमलाबाईंचाच मुलगा होऊन गेला.

कमलाबाईंचे वडील बंधु गोपाळराव यांचे जळगावला पळशीकर आडनावाचे एक स्नेही होते. नुकतीच त्यांची तिसरी पत्नी निवर्तली होती; म्हणून गोपाळराव भेटायला गेले होते. त्यांचा गोविंद नावाचा तान्हा मुलगा अतिशय रडका व किरकिरा होता.

घरात बाईमाणूस नसल्याने गोविंदाची आबाळ होत होती. 'याला इथे ठेवण्यापेक्षा यमूताईंकडे ठेव.' गोपाळरावांनी सुचविले व पळशीकरही लगेच नागपूरला येऊन गोविंदाला यमूताईंच्या स्वाधीन करुन निघून गेले.

जन्मत:च आई गेल्याने गोविंदांची खूपच आबाळ झाली होती. तो सतत रडत असे. त्याला क्षयाची बाधा झाली असावी असे अनेकांचे म्हणणे पडले. त्याच्या काही दिवसच आधी कमलाबाईंकडे आलेला किशोरही सुकू लागला होता. या दोन्ही मुलांना थंड हवेच्या ठिकाणी नेल्यास त्यांना बरे वाटेल असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला. नागपूरपासून १२० किलोमीटर अंतरावर छिंदवाडा नावाचे गाव आहे. तिथे जायचे कमलाबाईंनी ठरविले छिंदवाड्यात कुठे राहायचे? हा प्रश्न कमलाबाईंच्या भावाच्या मित्राने स्वत:चे घर, नोकर माणसांसह त्यांच्या स्वाधीन करुन सोडवला. बरोबर डॉक्टरांना घेऊन कमलाबाई निघाल्या. अंतर फार नसले तरी रस्ता मात्र घाटातून जाणारा होता. छिंदवाडा येईपर्यंत तरी गोविंदा जगतो का, जातो ही काळजी त्यांचं अंत:करण पोखरत होती.

एकदाचे सगळेजण छिंदवाड्याला पोहोचले. सोबत नेलेल्या डॉक्टरांचे खाण्यापिण्याचे अनेक नखरे होते. त्यांची मर्जी सांभाळत कमलाबाई दोन्ही मुलांच्या शुश्रूषेत व्यस्त झाल्या. गोविंदाची तब्येत हळूहळू सुधारू लागली. त्याचे रडणे कमी झाले. किशोर मात्र हळूहळू सुकत होता. कमलाबाई अतिशय निगुतीने त्याला सांभाळत होत्या. पण कशालाही दाद न देता एक दिवस त्याची प्राणज्योत मालवली.

गोविंदाची तब्येत मात्र दुरुस्त झाली. त्याला पूर्ण बरं वाटल्यावर त्याला घेऊन कमलाबाई नागपुरला परत आल्या. गोविंदा त्यांना आई म्हणू लागला. त्याचे ऐकूण इतर मुलेही आई म्हणू लागली.

**पिलीचा मृत्यू :**

कमलाबाईंची धाकटी बहीण गंगा ऊर्फ पिली ही मेहकरच्या राजदेरकरांकडे दिली होती. तिच्या तिसऱ्या बाळंतपणात तिला ताप येऊ लागला. मेहकर हे विदर्भातीलच गाव. राजदेरकर नागपूरलाच सीताबर्डीवर राहत होते. बहिणीची शुश्रूषा करायला कमलाबाई तिला महाल सूतिकागृहातील आपल्या घरी घेऊन आल्या. पण ताप हटत नव्हता. अतिशय निगुतीने शुश्रूषा करुनही पिलुताईंना गुण येत नव्हता. एक दिवस

रात्री पिलुताईंची नाडी तपासण्यासाठी कमलाबाईंनी त्यांचा हात हातात घेतला आणि त्या चरकल्या. नाडी लागत नव्हती. पण कमलाबाई धीराच्या होत्या. आपल्या भावांना त्यांनी बोलावून घेतले.

पिलुताईंचे यजमान नागपूरमध्ये नव्हते. त्यांना निरोप पाठवला आणि शांतपणाने त्या आपल्या बहिणीला म्हणाल्या, " बाई पिले, तू काही आता वाचत नाहीस तर तुला काही सांगायचे असेल तर सांग."

" आईला वाईट वाटेल," पिलुताई म्हणाल्या.

" तुझ्या यजमानांना तार केली आहे, पण ..."

" तुझी आणि त्यांची भेट होईल की नाही ते सांगता येत नाही .." हे पुढील शब्द कमलाबाईंच्या तोंडून काही बाहेर पडले नाहीत.

दुसरा दिवस उजाडला. पिलुताईंनी तोंड धुवायला पाणी मागितले.

" हे बघ, प्रभाकरला (त्यांचा एक वर्षाचा मुलगा) काल शौचाला झाले नाही तेव्हा त्याला एनिमा दे." त्यांनी कमलाबाईंना सांगितले.

ही इतकी व्यवस्थित बोलतेय आणि यमू कशी म्हणते, की ही आता मरणार; असा सर्वांनाच प्रश्न पडला होता. त्यांनी एकीकडे नेऊन कमलाबाईंना हे बोलून दाखविले.

" तिच्या नाड्या कालच सुटल्या आहेत. तेव्हाच खरे तर ती गेली. आता देवाची जितकी इच्छा असेल तितका वेळ आपल्याला तिचे बोलणे ऐकू येईल." कमलाबाई म्हणाल्या.

थोड्याच वेळाने पिलुताईंनी सर्वांना बोलावले. शांत आवाजात त्या कमलाबाईंना म्हणाल्या, " यांना दुसरे लग्न करायला सांग. पण माझी मुलं मात्र तूच सांभाळ. आई नसली की बाप मुलांना परका होतो." मुलांच्या काळजीने पिलुताईंना हुंदका फुटला. तोच त्यांचा अखेरचा श्वास ठरला.

पुढे पिलुताईंच्या यजमानांनी दुसरा विवाह केला व त्यांच्या तिन्ही मुलांना कमलाबाईंनी सांभाळायला आणले. पण त्यांच्या कुटुंबाशी शेवटपर्यंत कमलाबाईंचे स्नेहाचे बंध टिकून राहिले. त्यांनी आपल्या भाच्यांचे जसे केले तसेच त्यांच्या सावत्र भावंडाचेही प्रेमाने केले. तिथे आपला-परका असा भेद नव्हता.

या घटना घडल्या तेव्हा मोहनी कुटुंब धरमपेठेतील सोमलवारांच्या बंगल्यात राहत होते. २५-३० जणांच्या कुटुंबात ही मुले सहजच सामावून गेली असती. परंतु कमलाबाईंनी पिलुताईंना दिलेले वचन शेवटपर्यंत पाळले व माय मरो पण मावशी जगो या म्हणीचा सार्थ प्रत्यय सर्वांना दिला.

**टांगेवाली :**

महाल सूतिकागृहाची स्थापना झाली आणि संस्थेच्या सचिव गंगाबाई गोखले यांनी इतर कामे वाढल्याने सचिवपदाची जबाबदारी आता सांभाळता येणार नाही असे सांगून राजीनामा दिला. त्यामुळे सचिवपदाचे कामही कमलाबाई सांभाळू लागल्या. त्यासाठी सीताबर्डी ते महाल व महाल ते सीताबर्डी अशा फेऱ्या करणे आवश्यक होते. त्याकाळात सार्वजनिक वाहतुक व्यवस्थाच नव्हती. त्यामुळे रोज महाल ते बर्डी कसे जायचे हा मोठाच प्रश्न निर्माण झाला. तो प्रश्न संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई गाडगीळ यांनी सोडवला.

लक्ष्मीबाईंकडे दोन टांगे होते. एका टांगेवाल्याचे नाव होते सिद्ध टांगेवाला व दुसऱ्याचे नाव बुद्दू टांगेवाला. त्यातील एक टांगा त्यांनी सूतिकागृहाला देऊन टाकला. त्या टांग्याच्या घोडीचे नाव होते लक्ष्मी. लक्ष्मी घोडीसह टांग्यातून बुद्दू टांगेवालाही कमलाबाईंकडे कामावर रूजू झाला. पण अनेकदा कमलाबाईंना स्वतःच टांगा हाकायची लहर यायची व त्या बुद्दू टांगेवाल्याला बाजूला सारून स्वतः टांगा चालवायच्या. टांगा हाकणारी बाई हे १९२७-२८ च्या सुमारास नागपूरमध्ये एक अप्रूप होते. कदाचित टांगा चालविणारी ही त्या काळातील एकमेव बाई असावी.

**धैर्य आणि निर्भयता :**

सूतिकागृहाचे काम हे त्याकाळी धैर्याची कसोटी पाहणारे असे. १३-१४ वर्षांच्या कोवळ्या पहिलटकरणीपासून चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या चौदाव्या-पंधराव्या बाळंतपणासाठी येणाऱ्या प्रौढांपर्यंत सर्व वयाच्या बायका प्रसूतीसाठी येत. बाळंतपण म्हणजे बाईचा पुनर्जन्मच असे. तशात अल्पवयीन मुली किंवा कुपोषित मातांची प्रसूती खरोखरच कठीण असे. काळजी घेऊनही माता किंवा बालक दगावत असे. अशा प्रसंगी धैर्याची कसोटी लागे. त्यामुळे शांत राहून योग्य निर्णय घेण्याची कमलाबाईंची

क्षमता वाढत गेली. त्यांचे वैद्यकीय ज्ञानही उत्कृष्ट होते. त्यामुळे त्यांच्या हाती बाळंतपण सोपवले की सर्व निर्धास्त असत. वेणूताई नेनेही अतिशय समर्थपणे बाळंतपण करत असत. फरक इतकाच की कमलाबाई किती वेळ लागेल याचा अचूक अंदाज घेऊन इतर कामे करायला निघून जात व योग्य वेळी हजर होत.

त्या काळात गर्भपाताला कायद्याने बंदी होती. त्यामुळे फसविल्या गेलेल्या कुमारिका व विधवा गर्भवतींचे पुनर्वसन हा खूप संवेदनशील मुद्दा होता. गर्भवती कुमारिका किंवा विधवांना त्यांचे आईवडील, सासूसासरे किंवा इतर जवळचे नातेवाईकही, लोक लज्जेमुळे घरी ठेवून घ्यायला तयार नसत. अशा परिस्थितीत सापडलेल्या स्त्रियांना आत्महत्त्या करण्याशिवाय गत्यंतर नसे. तेवढी हिंमत नसलेल्यांना वेश्यावस्तीशिवाय इतरत्र आश्रयही मिळत नसे. अशा शेकडो नव्हे तर हजारो स्त्रियांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम कमलाबाईंनी केले. हे काम त्यांनी इतकी गुप्तता पाळून केले की किती आणि कोणत्या स्त्रियांची त्यांनी सुटका केली ह्याची कुठे नोंदही नाही. परंतु कमलाबाईंच्याच काही सहकाऱ्यांनी सांगितलेल्या आठवणी अशा-

**शांता :**

एक दिवस एक गृहस्थ एका १५-१६ वर्षाच्या मुलीला घेऊन आले. तिचे नाव शांता. काही लोकांच्या म्हणण्यानुसार तिच्यावर बलात्कार झाला होता. काही लोकांच्या म्हणण्यानुसार ती फसवणूकीतून गर्भवती झाली होती. कमलाबाईंनी तिला ठेवून घेतले. यथावकाश ती प्रसूत झाली. तिचे मूल त्यांनी योग्य घर पाहून दत्तक दिले. शांता मुळात कुशाग्र बुध्दीची होती. त्यांनी तिला मेडीकल कॉलेजमध्ये घातले. लवकरच ती डॉक्टर झाली. तिच्या शिक्षणाचा खर्च संस्थेने केलेला असल्याने तिने संस्थेतच आजन्म सेविका म्हणून काम करावे अशी सर्वांची अपेक्षा होती. तिला कमलाबाईंनी वर्धेच्या सूतिकागृहात पाठविले. तिने काही दिवस तिथे कामही केले. परंतु, नंतर स्वतःची स्वतंत्र प्रॅक्टीस सूरू केली. नंतरच्या काळातही तिचे व कमलाबाईंचे संबंध चांगले राहिले. गरज असेल तेव्हा ती शक्य तितकी आर्थिक मदत संस्थेला देत असे.

**'तुम्ही तुमची इज्जत सांभाळा : मी मुलगी सांभाळते'**– एकदा दिल्लीहून एक गृहस्थ आपल्या मुलीला घेऊन आले. मुलगी फसलेली गर्भवती, तिची सुटका होईपर्यंत तिला सांभाळायचे होते. 'कुठे फसली?' 'कशी फसली?' 'कोणी

फसवले?' असे कुठलेही प्रश्न त्यांनी विचारले नाहीत. इतकेच काय मुलीचे नाव-गावही विचारले नाही. कमलाबाईंनी तिला ठेवून घेतले. मुलगी यथावकाश प्रसूत झाली. तिचे मूल कमलाबाईंनी ठेवून घेतले. मुलीला वडिलांकडे पाठवून दिले. 'तुम्ही तुमची इज्जत सांभाळा, मी मुलगी सांभाळते.' इतकेच त्या मुलीच्या वडिलांना म्हणाल्या होत्या.

**आर्वीची घटना :**

आर्वी सूतिकागृहात काम करणाऱ्या डॉ. टी. एन. देशपांडे यांच्याकडे त्यांचा एक मित्र बहिणीला घेऊन आला. त्याची अविवाहित बहीण गर्भार होती. डॉ. देशपांडे त्याला व त्याच्या बहिणीला घेऊन कमलाबाईंकडे आले. आधी कमलाबाईंनी तिघांना भरपूर जेवायला घातले व मग त्यांची अडचण विचारली. 'या मुलीला येथे ठेवा व तुम्ही निघून जा.' कमलाबाईंनी क्षणाचाही विलंब न लावता सांगितले. तिच्या भावाने पैशाचे विचारले तेव्हा त्या काहीच बोलल्या नाहीत. कमलाबाईंनी तिच्या गळ्यात मंगळसूत्र घातले व आईच्या ममतेने तिचे बाळंतपण केले. तिला मुलगा झाला की मुलगी व ते अपत्य कोठे आहे, कोणालाच कळले नाही. मात्र एका वर्षानंतर त्या मुलीचा विवाह होऊन ती मार्गालाही लागली.

अशा एक-दोन नव्हे शेकडो मुलींना त्यांनी सांभाळले. त्यांचे पुनर्वसन केले. अवैध संबंधातून जन्मलेल्या त्यांच्या मुलांचा मातेच्या ममतेने प्रतिपाळ केला. योग्य घरे पाहून त्यांना दत्तक दिले. अनेक मातांना नर्सिंगचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी केले. ज्यांना पुरेसे शिक्षण नव्हते त्यांना इतर कामे दिली.

या सर्व घटनाप्रसंगांमध्ये त्यांची दृष्टी स्वच्छ होती. फसवणूकीतून किंवा अज्ञानातून गर्भवती झालेल्या मुलींबाबत समाजाची डोळ्यांवर कातडे ओढलेली, त्या मुलींना जीव नकोसा करणारी जी ढोंगी नैतिकतावादी भूमिका असते तिचा कमलाबाईंनी कधी जाहीर निषेध केला नाही. सेक्सबाबतीत त्यांची भूमिका कधीही नकारात्मक किंवा निषेधात्मक नव्हती. तसेच आपण करीत असलेल्या कार्यांचा जाहीर गवगवा करून आपण विचाराने पुरोगामी आहोत असा डंकाही त्यांनी कधी पिटला नाही. फसलेल्या मुलीचे जीवन सुसह्य करणे एवढीच त्यांची मानवतावादी भूमिका होती. कुठल्याही घटनेला तत्त्वज्ञानाचा मुलामा देण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. जी गोष्ट

मनापासून वाटते, मनाला पटते, ती करून मोकळे व्हायचे असा त्यांचा स्वभाव होता. इतरांचे सल्ले घेणे, चर्चा करणे, मतभेद दूर करण्यासाठी प्रयत्न करणे असे काहीही त्या करीत नसत. मुळात बोलणे कमी व काम जास्ती अशी प्रवृत्ती. त्यांच्या करारी स्वभावामुळे व धारदार नजरेमुळे त्यांचा सर्वत्र दरारा होता. अर्थात वरून नारळासारख्या कठोर व्यक्तिमत्त्वाच्या अंतःकरणात नारळाच्या पाण्याचा गोडवा व खोबऱ्याच्या स्नेहाचे ओलसर अधिष्ठान होते; हे त्या अंतःकरणाची ओळख पटल्यावरच जाणवत असे. सूतिकागृहातील वातावरण पूर्णपणे घरगुती राहिले पाहिजे यावर कमलाबाईंचा कटाक्ष असे. पेशंटची देखभाल व खाणेपिणे करताना त्यात थोडीशीही कुचराई त्यांना खपत नसे.

एक दिवस सूतिकागृहातील सर्व खाटा बाळंतिणींनी भरलेल्या होत्या. इतक्यात एक आसन्नप्रसवा महिला तेथे आली. तेव्हा ड्यूटीवरच्या नर्सने, जिला त्याच दिवशी डिस्चार्ज मिळणार होता, अशा पेशंटची आंघोळ, शेक-शेगडी उरकून तिला खाली गादी टाकून त्यावर झोपवले आणि तिच्या खाटेवर नवीन पेशंटला झोपवले. इतक्यात कमलाबाई आल्या व ते पाहून त्यांनी सर्वांना एकत्र बोलवले आणि कडक शब्दात समज दिली, ' खाट नव्हती तर माझी खाट न्यायची होती. कमलाबाई काही आजच मेल्या नाहीत.'

पेशंटला सढळ हाताने साजूक तुपातला शिरा, फोडणीच्या लाह्या व गरमागरम जेवण देणाऱ्या कमलाबाई, स्वयंपाक घरातील काटकसरीकडे मात्र काटेकोरपणे लक्ष ठेवीत.

एकदा एका सेविकेकडे शिरा व फोडणीच्या लाह्या करायची जबाबदारी होती. तिने आधी कोळसे पेटवले व मग सामानाची शोधाशोध सुरू केली. त्या वेळात शेगडी पेटून कोळसे वाया जाऊ लागले. कमलाबाई ते पाहत होत्या. त्यांनी सरळ शेगडी विझवून टाकली. सामान घेऊन ती मुलगी व शेगडी विझवलेली पाहून तिने आरडाओरड सुरु केला. ' शेगडी कुणी विझवली? कुणी खेडसाळपणा केला? आता शेगडी पेटवून सगळं करायचं म्हणजे किती उशीर होईल? कमलाबाई रागावल्या म्हणजे?' हे ऐकूण कमलाबाई आल्या व म्हणाल्या ' मीच विझवली शेगडी.' किती कोळसे वाया जातात? प्रत्येक ठिकाणी काटकसर हवी. आधी सर्व तयारी करुन घ्यायची व मग शेगडी पेटवायची, तरच फायदा दिसतो.' गोष्ट खरं तर क्षुलुक होती. पण संस्थेच्या योग्य वाढीसाठी काटकसर कशी करावी याचा पाठ देऊन गेली.

एकदा सूतिकागृहात सगळ्यांसाठी शेवयांची खीर केली होती. नेमकी ती खीर नासली. कमलाबाईंनी ती खीर आटवून तिच्या खव्याच्या बर्फीसारख्या वड्या केल्या व सगळ्यांना वाटल्या. ट्रेनिंगसाठी वसतीगृहात राहिलेल्या मुलींनाही सणावारी घरच्यासारखे वाटावे म्हणून कमलाबाई चिरोटे, पुरणपोळी, गुळाची पोळी अशी पक्वान्ने स्वतः करीत.

सांभाळायला आणलेल्या मुलांना वळण लावण्याच्या बाबतीत त्या अतिशय काटेकोर होत्या. महाल सूतिकागृहात राहायला आल्यानंतर त्यांच्याकडे गंगा या त्यांच्या बहिणीची मुले, गोविन्द, गोविन्दची बहीण, विमल हिरवे, तिचा भाऊ, अशी सात-आठ मुले होती. त्यात 'सुटका' झालेल्या मातांच्या मुलांची अधूनमधून भर पडे. काही मुले शाळेत जाणारी तर काही अगदी तान्ही असत. त्या काळी सर्वच मध्यमवर्गीय घरांमध्ये मुलांना घरातील कामे करावी लागत. झाडणे, सारवणे, सडा, रांगोळी, भाजी चिरणे, कपडे धुणे, लहानसहान भांडी घासणे, लहान मुलांना सांभाळणे इत्यादी कामे कमलाबाईंच्या मुलांनाही करावी लागत. ही कामे नीटनेटकी व्यवस्थित झाली पाहिजेत यावर कमलाबाईंचा कटाक्ष असे. मुलांना शिळेपाके खायला देणे त्यांना आवडत नसे. नाटक, सिनेमा, गाणी यांच्यापासून त्या मुलांना दूर ठेवत. साधा सकस आहार, साधे कपडे, योग्य ते शालेय शिक्षण व घरकाम या सर्व गोष्टींना करड्या शिस्तीचे अस्तरही असे. गंगाताईंची मुलगी कुसुम (आता कुसुम वाघमारे वय ऐंशीच्या जवळ) आपल्या बालपणच्या हकीकती सांगताना म्हणाल्या—

*'त्यावेळी माझे वय आठ-नऊ वर्षांचे असेल. भात शिजवताना त्याचा कढ मी मोरीत ओतला आणि मोरी स्वच्छ न करताच शाळेत निघून गेले. मावशीने मला तिथून बोलावून आणले व मोरी धुवायला लावली. प्रत्येक काम स्वच्छ व नीटनेटके करण्यावर तिचा भर असे.*

*एक दिवस मी केर नीट काढला नाही तर त्यासाठी तिने मला शिक्षा केली. एकदा एक चमचा सापडेना. तिने सर्वांना तो चमचा शोधायला लावला. चमचा सापडेपर्यंत त्या दिवशी कोणालाही जेवण मिळाले नाही.*

*तिला नाटक सिनेमे पाहिलेले आवडत नसे. एक दिवस मी विमल हिरवेच्या आईबरोबर नाटक बघायला गेले. 'आपल्या जवळ पैसे नसताना तू गेलीच कशी?' म्हणून ती मला खूप रागावली. मी शाळेत असताना एका नाटकात काम केले.*

*कौतुकाने मावशीला नाटक पाहायला बोलावले. पण मावशी कसली खट, कौतुक तर दूर राहिलं, नाटक संपल्याबरोबर लगेच मला घरी घेऊन गेली. आणि 'या नंतर पुन्हा कधीही नाटकात काम करायचे नाही.' म्हणून मला दम भरला.*

*एकदा नर्सेसच्या पंक्तीला वाढायचे काम तिने मला सांगितले. त्यावेळी स्वैपाक करणाऱ्या पंडितशी माझे भांडण झाले. तेव्हा मला रागावून ती म्हणाली, 'येवढं वाटतं तर उद्यापासून तुझा स्वैपाक तूच करत जा. इतका राग येतोय तर उद्यापासून त्याच्या हातचं जेवू नकोस.'*

लहानपणापासून त्यांनी सांभाळलेला गोविन्द म्हणजे गोविन्दराव पळशीकर (वय ८० च्या पुढे) ह्यांच्याही आठवणी अशाच आहेत.

'त्या बोलायच्या नाहीत. पण त्यांच्या डोळ्यामध्ये राग दिसायचा. त्याची फार भीती वाटायची.' ते म्हणाले, कधीकधी आपली मुले घेऊन कमलाबाई कामासाठी निघत. कामे आटोपली की एखाद्या घरोब्यातील परिचिताकडे जात व सगळ्यांना जेवायचे आहे म्हणून सांगत. अशावेळी यजमानांच्या स्वैपाकघराचा त्या ताबा घेऊन स्वैपाकही करत. शिवाय अमुकच जेवण हवे असाही त्यांचा आग्रह नसायचा. साध्या पिठंल-भातानेही काम भागायचे. त्यांना जेव्हा दौऱ्यावर बाहेरगावी जायचे असे तेव्हा त्या मुलींची नहाणी उरकून मगच जात.

करंज्या, मोदक असले पदार्थ करायचे असले की, त्या आपल्या परिचयातल्या लक्ष्मीबाई गाडगीळ, मथुबाई द्रवीड अशा महिलांनाही मदतीसाठी बोलावून घ्यायच्या. वास्तविक त्या श्रीमंत होत्या. त्यांच्याकडे अशा कामांसाठी स्वैपाकिणी असत. परंतु कमलाबाईंनी बोलावलं की त्या आवर्जून जात. इतका मोठा प्रपंच चालवायचा म्हणजे कमलाबाईना पैशांचीही अधूनमधून गरज लागे. प्रसंगी पाचशे हजार रुपयांपर्यंत रकमा त्या आपल्या विशिष्ट मैत्रिणींकडे मागत व त्यांच्या या मैत्रिणी कुठलीही चौकशी न करता त्यांना पैसे देत. कारण कमलाबाई योग्य कामासाठीच पैसे मागतात हे त्यांना माहीत होते. आठवणीने शक्य तितक्या लवकर त्या घेतलेले पैसे परतही करत असत.

एकदा मात्र याच्या उलट झाले. महालातील एका धनाढ्य गृहस्थांना पैशांची गरज पडली आणि कमलाबाईंनी कुठलीही लिखापढी न करता त्यांना वीस हजार रूपये देऊन टाकले. कार्यकारिणीत जेव्हा हा विषय निघाला तेव्हा काहींनी यावर आक्षेप घेतला.

'त्यांची परिस्थिती चांगली होती तेव्हा त्यांनी हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या. आज त्यांना गरज असताना मदत केली तर कुठे बिघडले?' इतकेच कमलाबाई म्हणाल्या. अशा दानशूरांना मदत केली नाही तर जगाच्या चांगुलपणावरचा त्यांचा विश्वास उडेल, असे कमलाबाईंना वाटत होते. पण सूतिकागृहाचे पैसे ही आपली व्यक्तिगत मालमत्ता नाही. इतरांनी ते संस्थेसाठी दिलेले आहेत व आपण फक्त विश्वस्त म्हणजे ट्रस्टी आहोत याचे भान त्यांना नव्हते. कालांतराने त्या गृहस्थांनी हे पैसे परत केले. या प्रसंगातून कमलाबाईंना मानवी स्वभावाचे अचूक ज्ञान होते, त्या माणसे ओळखण्यात चुकत नव्हत्या हे सिद्ध होते असे म्हणायचे की त्या अव्यवहारी होत्या, संस्थेच्या पैशांबाबत निष्काहजी होत्या असे म्हणायचे?

आपण या सूतिकागृहाच्या संचालक आहोत, मालक आहोत असा कुठलाही गंड कमलाबाईंना नव्हता. त्यामुळे सर्वांशीच त्यांचे वागणे सहज असे. एकदा मध्यप्रांताचे त्या वेळेचे एक मंत्री कमलाबाईंना भेटायला आले. त्यावेळी कमलाबाई विहिरीवर भांडी घासत होत्या. मंत्री आले म्हणून झटकन उठून हात धुवून काही त्या त्यांना भेटायला गेल्या नाहीत. त्यांनी जवळून जाणाऱ्या एका नर्सला त्यांच्यासाठी खुर्ची आणायला सांगितली व मंत्रिमहोदयांनी विहिराच्या काठावर बसूनच त्यांच्याशी बातचीत केली. त्यांच्याशी बोलता बोलता कमलाबाई आपले भांडी घासायचे काम करतच होत्या.

लोकांना कामाला लावायचे असेल तर आपण स्वतः काम केले पाहिजे यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे कुठे कचरा पडलेला दिसला की हातात झाडणी घेऊन त्या झाडू लागायच्या. बर्डी सूतिकागृहात एक उंबराचे झाड होते. त्याची फळे व पाने गळून पडायची व त्याचा कचरा सभोवताली पसरायचा. कमलाबाईंनी हे पाहिले व हातात खराटा घेऊन झाडायला सुरुवात केली. आधी बाहेरच्या लोकांच्या त्या कोण, हे लक्षातच आले नाही. जेव्हा लक्षात आले तेव्हा कोणीतरी त्यांच्या हातातला खराटा घ्यायला धावले, त्यांच्याकडे तीव्र कटाक्ष टाकूण कमलाबाईंनी झाडण्याचे काम सुरुच ठेवले. हे पाहिल्यावर कामात टाळाटाळ करण्याचे धाडस कोण करेल?

प्रत्येकजण आपले कर्तव्य नीट पार पाडत आहे की नाही याकडे कमलाबाईंचे सूक्ष्म लक्ष असे. सूतिकागृहात येणाऱ्या प्रत्येक मातेची त्या सतत स्वतः चौकशी करीत असत. एक दिवस बाहेरची कामे करून आल्यावर १२ च्या सुमाराला त्यांनी

सूतिकागृहात फेरी मारली. तेव्हा त्यांना कळले की, एका मातेला जेवण मिळाले नाही. सूतिकागृहाची जेवण्याची वेळ सकाळी साडेदहा ते अकरावी असे. कमलाबाईंनी ड्युटीवरील सर्व कर्मचाऱ्यांना बोलावून सांगितले की, 'आज एक पेशंट उपाशी राहिल्याने मी सुद्धा उपोषण करते.' ज्या नर्सच्या हातून ही चूक झाली तिने वारंवार क्षमा मागूनही कमलाबाईंनी आपला निश्चय बदलला नाही. त्यामुळे नंतरच्या काळात कोणतीही माता सूतिकागृहात उपाशी राहिली नाही हे सांगायला नकोच !

**परिचारिका आणि सेविका :**

सीताबर्डी व महाल ही दोन सूतिकागृहे कमलाबाईंनी आपल्या पुढाकाराने सुरू केली. त्यांचे व्यवस्थापन कौशल्यही वादातील होते. पण त्यांचा मूळ पिंड मात्र परिचारिकेचाच होता. लहानपणापासूनच त्यांना आजारी माणसांची शुश्रूषा करणे हे आपले कर्तव्यच आहे असे वाटत असे. लग्न झाल्यावर वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी प्लेगसारख्या सांसर्गिक रोगाने ग्रस्त झालेल्या दोन दीर, जाऊ व नवरा यांची त्यांनी अतिशय निर्भयपणे व ममतेने शुश्रुषा केली होती.

त्यांचे बंधू नानासाहेब यांनी त्यांना सासरच्या कचाट्यातून सोडवून आणल्यावर लगेचच त्यांचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले. त्यांच्या शुश्रुषेचा संपूर्ण भार कमलाबाईंनीच उचलला. प्रसूतिशास्त्राचे शिक्षण घेतल्यावर घरातल्या भावजया, भाच्या, भाचेसुना यांची बाळंतपणे ही कमलाबाईंचीच जबाबदारी ठरली. सांभाळायला ठेवून घेतलेल्या मुलांच्या आजारपणात कमलाबाई त्यांची शुश्रूषा स्वतः जातीने करत. त्यांच्या धाकट्या बहिणीचे देहावसान कमलाबाईंच्याच घरी झाले.

स्वतःच्या नातेवाईकांची शुश्रूषा करणारे अनेकजण असतात. परंतु आपपरभाव जाणत नसणाऱ्या कमलाबाईंनी इतर अनेकांची शुश्रूषा सहृदयतेने व आत्मीयतेने शेवटपर्यंत केली. त्या आठवणी आजही अनेकजण कृतज्ञतेने सांगतात.

**मीराबेनची शुश्रूषा :**

म. गांधीचा सेवाग्राम येथील आश्रम आकार घेऊ लागला होता. जमनालालजी बजाज यांचा त्या कामी फार मोठा सहभाग होता. १९२७ च्या सुमारास म. गांधींबरोबर मीराबेनही होत्या. वर्ध्याला मीराबेन मलेरियाने आजारी पडल्या. त्यांच्या शुश्रूषेची

जबाबदारी कोणावर सोपवावी हा जमनालालजींसमोरील मोठाच प्रश्न होता. कमलाबाईंचे ज्येष्ठ बंधू दत्तोपंत पूर्वी वर्धेच्या कृष्णराव जाजू यांच्या हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक होते. त्यामुळे कृष्णराव कमलाबाईंना ओळखत होते. त्यांनी जमनालालजींना कमलाबाईंचे नाव सुचवले व कमलाबाई सूतिकागृह वेणूताई नेने व सावित्रीबाई मटंगे यांच्यावर सोपवून लगेच वर्धेला गेल्या.

तेथे त्यांचे स्नेही अण्णा दास्ताने यांच्याकडे उतरल्या. पहाटे लवकर उठून थंड पाण्याने स्नान करून आसने, सूर्यनमस्कार घालून, रामरक्षा म्हणून त्या आश्रमात जात. आश्रमात जाण्यापूर्वी थोडे दूध फक्त घेत. अकरा-साडेअकरा वाजता त्या जेवायला येत. दास्ताने कुटुंबियांची राहणी आश्रमीय होती. संडास सफाईपासून (त्या काळात पाटीचे संडास होते.) सर्व कामे घरीच करायची पद्धत होती. परंतु कमलाबाईंना याचा कधीच काही त्रास झाला नाही, असे अण्णा दास्ताने यांची कन्या शरयू धोत्रे यांनी नमूद केले आहे.

आश्रमात मीराबाईंचे पथ्यपाणी, कपडे धुणे, स्पंजिंग, कमोड साफ करणे अशी सर्वच शुश्रूषा त्यांनी अतिशय आत्मियतेने केली. त्यामुळे जमनालालजी तर खूष झालेच पण मीराबेनही अतिशय भारावून गेल्या. मीराबेनना बरे वाटल्यावर कमलाबाई नागपूरला जायला निघाल्या तेव्हा जमनालालजींनी त्यांना विचारले, 'मी तुम्हाला काय देऊ ?' त्यावर कमलाबाई म्हणाल्या, 'तुम्ही मला ही सेवेची संधी दिलीत तीच फार मोठी देणगी आहे. मीच तुम्हाला त्याबद्दल धन्यवाद देते. पुन्हा जर अशी गरज पडली तर मला हक्काने बोलवा व पुढेमागे वर्ध्याला सूतिकागृह काढा म्हणजे कार्यकर्त्यांची सोय होईल.' त्यांच्या या स्वाभीमानी व बाणेदार उद्‌गारांनी जमनालालजी खूपच प्रभावित झाले. या एका घटनेमुळे कमलाबाईंचे बजाज घराण्याशी आत्मियतेचे जे स्नेहबंध जुळले ते शेवटपर्यंत कायम राहिले.

**मामा क्षीरसागर यांचे आजारपण :**

दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाचे संस्थापक पू. मामा क्षिरसागर एकदा खूप आजारी पडले. आजन्म देशसेवेचे व्रत घेऊन अविवाहित राहिलेल्या या माणसाला कुठे ठेवायचे हा प्रश्न निर्माण झाला तेव्हा कमलाबाईंनी त्यांना सीताबर्डी सूतिकागृहात ठेवायला सांगितले. समाजाचे ऋण फेडायचा त्यांच्या मते हा एक चांगला मार्ग होता.

'अशा समाजसेवकांना आपल्या संस्थेचा उपयोग झाला नाही तर मग खरे कार्य ते काय ?' असे कमलाबाई म्हणाल्या. तब्बल तीन महिने त्यांनी स्वतः मामांची शुश्रुषा व देखभाल केली.

### ग्रँट ट्रंक थांबवून धरली :

डॉ. जी. बी. ओक यांची या संबंधातील आठवण अतिशय हृदयस्पर्शी आहे. रेटिना डिटॅचमेंटमुळे डॉ. ओकांना अंधत्व आले होते व ते नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये भरती होते. तीन महिनेपर्यंत त्यांचा फक्त पाठीवर झोपून राहायचे होते. त्यांनतर शस्त्रक्रिया शक्य होती. कमलाबाई त्यांना भेटायला गेल्या व ममतेने त्यांच्या पाठीवरुन हात फिरवून म्हणाल्या, 'सर्व काही ठीक होईल.' आलेल्या अंधत्वाने डॉ. ओक अतिशय निराश झाले होते व संतापलेही होते.

'म्हणणे सोपे आहे. माझ्यासमोर काळोख पसरला आहे. माझ्या आयुष्यालाच आता काही अर्थ नाही.' ते म्हणाले.

"पन्नास वर्षांपूर्वी एका मुलीला असे वाटले होते. ती ब्राह्मण बाल विधवा होती. परंतु तिच्या बंधूंनी प्रोत्साहन दिले. मुलगी नर्सिंग शिकली. सारे जग तिने स्वतःचे मानले. हळूहळू तिला तिच्या विचारांच्या इतर स्त्रिया मिळाल्या. मातृसेवा संघ स्थापन झाला. ती मुलगी म्हणजे मी. जेव्हा आपल्याला परिस्थिती सर्व बाजूंनी घेरून घेते. तेव्हा ईश्वर हळूच एक चोर दरवाजा उघडून देतो. हा माझा अनुभव आहे." कमलाबाई म्हणाल्या डॉ. पावा नावाचे नेत्रतज्ञ मद्रासला एका कॉन्फरन्ससाठी गेले होते. नागपूरच्या त्यांच्या विद्यार्थ्यांने त्यांनीच हे ऑपरेशन करावे असे सुचविले होते. मद्रासहून सीतापूरला जाण्यापूर्वी ते मधे नागपूरला उतरून ही शस्त्रक्रिया करणार होते. परंतु त्यांना दिल्लीला अचानक महत्वाचे काम निघाले म्हणून ते विमानानेच दिल्लीला जाणार होते. इतक्यात तारेने बातमी कळली की, त्यांचे विमान कॅन्सल झाल्याने ते आता नागपूरमार्गे दिल्लीला जाणार आहेत. त्यांनी डॉ. ओक यांना तपासणीसाठी नागपूर स्टेशनवर बोलावले होते. तेव्हा जी. टी. एक्सप्रेस नागपूरला जेमतेम वीस मिनिटे थांबायची. त्या वीस मिनिटांमध्ये डॉक्टरांना शोधून तपासणी कशी करायची हा मोठा प्रश्नच होता. परंतु, हा प्रश्नही कमलाबाईंनी सहज सोडवला.

लाल बहादूर शास्त्री जेव्हा मातृसेवा संघाला भेट द्यायला आले होते, तेव्हा कमलाबाईंचे काम पाहून अतिशय खूष झाले होते व त्यांनी कमलाबाईंना कोणत्याही दोन गोष्टी मागण्यासाठी सांगितले होते. मातृसेवा संघाच्या कामासाठी त्यांना सतत प्रवास करावा लागे. त्यामुळे त्यांनी त्यावेळी स्वतःसाठी रेल्वे पास मागितला होता व शास्त्रीजींनी त्यांना फर्स्टक्लासचा पास दिलाही होता. दुसरी गोष्ट त्यांनी तेव्हा मागितली नव्हती. ती आता मागायचे ठरविले. त्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सगळी कल्पना देऊन थोडा जास्त वेळ गाडी थांबवायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी जी. टी. एक्सप्रेस नागपूरला आली. डॉ. पावांनी डॉ. ओकांची पूर्ण तपासणी केली आणि त्यांनतर गाडी नागपूरहून सुटली. डॉ. पावांनी डॉ. ओकांना शस्त्रक्रियेसाठी सीतापूरला बोलावले होते. कमलाबाई स्वतः त्यांच्याबरोबर सीतापूरला गेल्या. ऑपरेशन यशस्वी झाले. काही दिवसानंतर सर्व ठीक आहे याची खात्री पटल्यावरच त्यांची पुढील शुश्रुषा त्यांच्या पत्नीवर सोपवून कमलाबाई नागपूरला परत आल्या.

**तुमची मुलगी ती माझी मुलगीच आहे :**

मातृसेवा संघाच्या वरोडा शाखेच्या व्यवस्थापिका इंदिराबाई काथवटे यांची एकुलती एक मुलगी क्षयाने आजारी पडली. तिच्या शुश्रुषेसाठी कमलाबाई धावून गेल्या. परंतु या आजारातून ती मुलगी वाचू शकली नाही. इंदिराबाईंवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला होता. त्यांना इतर कोणी नातेवाईकही नव्हते. म्हणून मग कमलाबाईंनीच त्या मुलीचे सर्व क्रियाकर्म आपल्या देखरेखीखाली करवून घेतले. त्यांचा स्वतःचा अशा क्रियाकर्मावर विश्वास नव्हता. परंतु आपल्या सहकाऱ्यांना काय हवे आहे, याचे अचूक ज्ञान त्यांना होते व सहकाऱ्यांच्या समाधानासाठी सर्व काही करायची त्यांची तयारीही असायची.

**जयप्रकाशजींची भेट :**

शेवटच्या आजारपणात जयप्रकाश नारायण मुंबईला हॉस्पिटलमध्ये होते. त्यांना भेटायला कमलाबाई मुंबईला गेल्या. तत्पूर्वी पाय फ्रॅक्चर झाल्याने त्या कुबड्यांच्या सहाय्याने कशाबशा चालू शकत होत्या. शरयू धोत्रे या त्यांच्या स्नेही तेव्हा बोरिवलीला राहत होत्या. त्यांनी बरोबर असलेल्या डॉक्टरांना शरयूताईंना घेऊन यायला सांगितले. शरयूताई दादरला येऊन पोचेपर्यंत दुपारचे चार-साडेचार वाजून गेले.

ही वेळ लोकलच्या गर्दीची! इतक्या गर्दीतून लोकलने कमलाबाईंना चर्चगेटला कसे न्यायचे हा प्रश्न पडला. परंतु कमलाबाई ठामपणे म्हणाल्या की, मी, लोकलनेच चलते. दादरला तर लोकलच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात त्या चढू शकल्या, परंतु चर्चगेटला परत जाणाऱ्यांची प्रचंड गर्दी. कमलाबाईंना खाली उतरणे जमेना. शेवटी शरयूताईंनी आणखी एक जणाच्या मदतीने कमलाबाईभोवती कडे केले व चढणारी सर्व माणसे आत बसल्यावर त्यांना खाली उतरवण्यात शरयूताईंना यश आले. चर्चगेटहून टॅक्सीने सर्वजण जयप्रकाशजींना भोटायला गेले. त्यांना पाहून जयप्रकाशजींनाही गहिवरून आले. ' आप क्यू इतनी तकलिफ उठाकर मिलने आयी? ' जयप्रकाशजींनी विचारले. त्या जयप्रकाशजींच्या पलंगावर टेकल्या व आपला ममतेने ओथंबलेला हात त्यांच्या चेहऱ्यावरून फिरवू लागल्या. १९७५ मधील ही घटना आहे. म्हणजे त्यावेळी कमलाबाई ७९ वर्षांच्या होत्या. या वयात कुबड्यांच्या आधाराने जेमतेम चालता येत असताना नागपूरहून मुंबईला जाऊन एका आजारी माणसाला दिलासा देणे, हे काम एखादी कर्मयोगिनीच करू शकते.

**स्वातंत्र्यलढ्यातील अनामिक सैनिक :**

कमलाबाईंच्या चार भावांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे तात्या मोहनी यांनी देशसेवेचे व्रत घेऊन आजन्म अविवाहित राहण्याचे ठरविले होते. उरलेले तीन बंधू जरी सरकारी नोकरीत होते तरी घरातील वातावरण काँग्रेसवरील प्रेमाने भारलेले होते. कमलाबाईंनी मिळत असलेली सरकारी नोकरी नाकारून आणि स्वतःचे सूतिकागृह सूरू करून देशभक्तीचा ओनामा केला होताच. १९२० च्या काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी स्वयंसेविका म्हणून कामही केले होते. आपण खादी वापरावी असे त्यांना मनापासून वाटत असे. परंतु, खादी महाग असायची. आपल्यामुळे आपल्या भावांवरील खर्चाचा बोजा वाढू नये म्हणून सुरुवातीला त्यांनी खादी वापरली नाही. नंतरच्या काळात जेव्हा शक्य झाले तेव्हा त्यांनी खादीची जाडीभरडी पातळे वापरणे सुरू केले. सुरुवातीला खादीची पूर्ण पन्ह्याची पातळे उपलब्ध नव्हती. तेव्हा कापडाची दोन ठाणे मधून शिवून त्या पातळे तयार करीत, अशी आठवण त्यांच्या बंधूनी लिहून ठेवली आहे. पुढे बाजारात खादीची तलम वस्त्रे मिळू लागली. परंतु कमलाबाईंनी शेवटपर्यंत जाडी भरडी खादीची पांढरी पातळेच वापरली.

बर्डी सूतिकागृह नागपूरच्या रेल्वे स्टेशनजवळ होते. अनेकदा आंदोलकांना काही सामान एका गावाहून दुसऱ्या गावाला पाठवायचे असे. अशा वेळी कोणीतरी कार्यकर्ता एखादी पिशवी घेऊन येई. 'संध्याकाळी एकजण येईल. पिशवी ठेवली आहे का विचारील. त्याला ही पिशवी द्या.' कोठी घराच्या एका कोपऱ्यात ती पिशवी पडलेली असे. संध्याकाळी बरोबर एक कार्यकर्ता येई आणि पिशवी घेऊन जाई. पिशवी कोणी आणली, क़ोणी नेली, त्यात काय होते. कोणालाही कळत नव्हते. अशा अनेक 'पिशव्या' इंग्रज सरकारची नजर चुकवून वितरित होत होत्या.

कधी कधी रात्री अकरा वाजता निरोप यायचा-वीस-पंचवीस लोक जेवायला येतील. तासभरात पिठलं भात तयार ठेवा. शंकराच्या देवळात त्यांची बैठक आहे. कमलाबाई स्वयंपाकाला लागायच्या. आतल्या खोलीत कार्यकर्त्यांची पंगत बसायची.. बाहेरच्या खोलीत कृष्णाताई भावे आणि वेणूताई नेने पहारा द्यायच्या. चुकून पोलिसांची धाड पडली तर कशी सूचना द्यायची, सर्वांनी कुठून पलायन करायचे याची योजना कमलाबाईंनी तयार केलेली असायची.

काँग्रेसचे मुख्यालय रांका भवन, महाल सूतिकागृहाच्या जवळ होते. त्यामुळे हरीभाऊंचे सूतिकागृहात बरेच जाणेयेणे असायचे. त्यांच्यामुळे काँग्रेसचे इतर कार्यकर्तेही तेथे येत. कमलाबाई त्यावेळी ऐन तिशीत होत्या. तरूण विधवेकडे अशा तरुणांची ये-जा हा त्याकाळी टीकेचा विषय झाला होता. परंतु स्वतःच्या शुध्द मनाची खात्री असलेल्या कमलाबाईंनी किंवा त्यांच्या कुटूंबियांनी अशा टीकेला भीक घातली नाही.

एकदा एका भूमिगत कार्यकर्त्याला लपवून ठेवायचे होते. जवळ जवळ पंधरा दिवस तो कार्यकर्ता सूतिकागृहात राहिला. नंतर पुढे पकडला गेला. तेव्हा सहाजिकच कमलाबाईंना कोर्टापुढे उभे करण्यात आले. 'माझे सूतिकागृह फक्त बायकांसाठीच आहे. तेथे पुरुष राहीलच कसा?' या एकाच विधानावर कमलाबाई ठाम होत्या. दुसरा कुठलाही पुरावा नसल्यामुळे कोर्टाला त्यांना सोडून द्यावे लागले.

एकदा भर दुपारी एक कार्यकर्ता घामाघमू होऊन आला. पोलीस त्यांच्या मागावर होते. कमलाबाईंनी आधी समोरील दार लावायला सांगितले. त्या कार्यकर्त्याला एका खाटेवर झोपवून डोक्याभोवती एका साडीचा पदर लपेटला. अंगावर पांघरून

टाकून पाय जवळ घ्यायला सुचवले, म्हणजे उंची कमी दिसेल व पोट दुखतेय असे वाटेल, कमलाबाईंनी सांगितले. तितक्यात एक पोलीस इन्स्पेक्टर कॉन्स्टेबलसह येऊन पोहचलाच. या प्रसंगाचे इंदुमती देशमुख यांनी आपल्या ' कमलगंध ' नावाच्या पुस्तकात फार छान वर्णन केल आहे. त्या लिहितात,

*(कमलगंध, पृ. ७१-७२)*

*पोलिस सब-इन्स्पेक्टर नि एक कॉन्स्टेबल आत आले.*

*'काय हवंय? केस आणलीय का? '*

*'केस? ' कॉन्स्टेबलनी सूतिकागृह कधी पाहिलेच नव्हते. तो खेड्यातला माणूस. नागपूरच त्याला नवीन होते. त्यामुळे इथे ' केस आणणे ' हा प्रकार काय तेच त्याला माहीत नव्हते. पण सब-इन्स्पेक्टर जाणकार, मुरलेले.*

*कमलाबाई, तुम्ही आता काही लपवू नका. आम्ही ज्यांच्या मागावर आहोत त्यांना दूर त्या चौकावरून तुमच्या दरवाज्यातून आत शिरताना पाहिले. कुठे आहेत ते? '*

*इथे तर कोणी आले नाही. आमचा पंडित आला आत्ताच. तो दिसला असेलं तुम्हाला. तो बघा लागतोच आहे स्वयंपाकाला, हातपाय धुवून. ' कमलाबाई म्हणाल्या.*

*'तो नाही हो. हे गृहस्थ आताच्या गाडीने स्टेशनवरून आले. आल्याबरोबर स्टेशनवर दोन गृहस्थांना भेटले. अन् आमच्या लक्षात येऊन आम्ही जवळ येतोय तोच ते गृहस्थ तर कुठेतरी गेलेच, पण हेही आम्हाला चुकवीत होते. त्या चौकापर्यंत ध्यान राहिले अन् दुरून इथेच शिरताना पाहिले, तेव्हा म्हटले आता कुठे जातात? सांगा कुठे आहेत ते? ' सब-इन्स्पेक्टर.*

*'अहो, तुम्ही हवं तर सारं सूतिकागृह धुंडाळा. माझी ना नाही, हवं तर या पलंगावरच्या बायका पाहा. पण त्यांचे चेहरे निरखण्यापूर्वी त्यांच्या नवऱ्यांची परवानगी मात्र घ्या, ' इतके बोलून कमलाताई जणू एकेकीच्या पलंगाजवळ जायला तयार होऊन म्हणाल्या, 'चला तर. '*

*क्षणभर सारे थक्क होऊन स्तब्ध उभे राहिले, प्रत्येकाच्या मनात निरनिराळे विचार आले, सूतिकागृहातल्या स्त्रियांना वाटले, खरंच याने प्रत्येक जवळ येऊन पाहिले तर? तो लपलेला कार्यकर्ता मनाची तयारी करू लागला. कार्यवाहीच्या कल्पनेने त्याचे मुख विवर्ण झाले असेल. कान्स्टेबल स्वतःच्या डोक्याला त्रास न देता, हुकूमाची वाट पाहू लागला. अन् कमलाबाई? त्या श्रीरामावर भरवसा ठेऊन निश्चल मनाने ठामपणाने उभ्या होत्या. नि ते सब-इन्स्पेक्टर? त्याचे पाऊल पुढे उचलेना. प्रत्येक पलंगाजवळ जाऊन चेहरे पाहिले तर होणाऱ्या अनर्थाचे चित्र त्याच्या डोळ्यापुढे उभं राहिले, अन् ते पाहून त्यांच्या पापण्या एकदाच मिटल्या नि ते म्हणाले,*

'ठीक आहे. आम्ही जातो. पण असा माणूस आला तर वर्दी द्या आम्हाला.' प्रसंग असाच घडला असेल किंवा थोडा वेगळाही असेल. परंतु कमलाबाईमधील बिनधास्त कार्यकर्तीचे दर्शन घडविणारा आहे येवढे नक्की.

असे धोके पत्करण्याची त्यांना कधीच भीती वाटत नसे. १९४२ च्या आंदोलनात मगनलाल बागडी या समाजवादी कार्यकर्त्यावर मुंबई-कोलकाता रेल्वेलाईन उद्ध्वस्त करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मगनलाल बागडी हा हिंदूस्थानी लाल सेनेचा कार्यकर्ता होता. दिलेली कामगिरी पार पाडण्यासाठी तो वर्ध्याला आला. वर्धा ते सिंदी या दरम्यान रेल्वेचे रूळ उद्ध्वस्त करून सिंदी पोलीस स्टेशनवर हल्ला करायची व तेथील शस्त्रास्त्रे लुटायची त्यांची योजना होती. स्थानिक कॉंग्रेस कार्यकर्त्यांची त्यांना मदत मिळाली नाही व सगळी योजनाच बारगळली. मगनलाल भूमिगत होऊन नागपूर बाहेरील एका बंगल्यात महादेव गुरव नावाच्या त्यांच्या सहकाऱ्याबरोबर लपून बसला होता. त्याने मुंबईला जावे असे त्याला सांगण्यात आले. पण तो मुंबईला जायला तयार नव्हता. दिलेली कामगिरी अयशस्वी झाली म्हणून असेल किंवा पकडले जाण्याच्या भीतीने असेल, पण तो मुंबईला जायला तयार नव्हता हे खरे. शेवटी अच्युतराव पटवर्धनांनी ही जबाबदारी कमलाबाईवर सोपविली. कमलाबाई स्वतः मगनलालना भेटल्या व मुंबईला जाण्यासंबंधी त्यांनी त्यांचे मत वळविले.

पुढचा प्रश्न जास्त कठीण होता. त्या दोघांना मुंबईला कसे पाठवायचे? त्यावेळी अच्युतराव पटवर्धनांचे भाचे पुलगांवला सैन्यात कॅप्टनच्या हुद्यावर काम करत होते. त्यांच्या मदतीने कमलाबाईंनी सैन्याची अर्ध्या टनाची गाडी मिळविली व दोघांना घेऊन कमलाबाई नाशिकला गेल्या. नाशिकला अण्णाजी सहस्त्रबुध्दे यांना भेटल्या. अण्णाजींनी एक ॲम्ब्युलन्स, एक डॉक्टर व एक नर्स सोबत देऊन त्या दोघांना पेशंट म्हणून ॲम्ब्युन्समध्ये झोपवले व हा सगळा लवाजमा घेऊन कमलाबाई मुंबईला गेल्या. मुंबईला त्या दोघांना एका हास्पीटलमध्ये ॲडमीट करण्यात आले. तिथे ते सुखरूप आहेत याची खात्री पटल्यावर कमलाबाई नागपूरला परतल्या.

*(हिंदूस्थानी लालसेना पृ. १११)*

एकदा एका कार्यकर्त्याला भुसावळला पोचवायचे होते. कमलाबाईंनी त्याला एका चादरीत गुंडाळले व या पेशंटला रात्री अकराच्या गाडीने घेऊन त्या निघाल्या. भुसावळला पोचल्यानंतर तो कार्यकर्ता त्याच्या इच्छित स्थळी निघून गेला व कमलाबाई नंतरच्या गाडीने लगेचच नागपूरला परतल्या.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात अनेक कार्यकर्ते भूमिगत होत. राष्ट्रीय युवक संघातील साथी शिवाजी गिरीधर पाटील, पुण्याचे पटवर्धन वकील, प्रो. फडणीस आदी भूमिगत कार्यकर्त्यांना मातृसेवा संघातून जेवणाचे डबे जात; अशी नोंद शंकरराव गेडाम यांनी करून ठेवली आहे.

**आणीबाणी :**

१९७५-७६ मध्ये स्वतः स्व. इंदिरा गांधीनी संपूर्ण देशात आणीबाणी जाहीर केली. त्यांचा निषेध म्हणून अनेकांनी पद्मश्रीसारख्या पदव्या सरकारला परत केल्या. कमलाबाईंशी जवळीक असणाऱ्या अनेक समाजवादी नेत्यांनी कमलाबाईंनीही पद्मश्री परत करावी असे सूचवून पाहिले. परंतु कमलाबाईंनी पद्मश्री परत केली नाही. स्वतःच्या भूमिकेचे शाब्दिक समर्थन कमलाबाई कधीच करत नसत. त्यामुळे त्यांनी आणीबाणीला पाठिंबा दिला असा त्यांच्याबद्दल गैरसमज झाला होता.

त्यावेळी नागपूरमधील अनेक संघ कार्यकर्ते मिसा या कायद्याखाली तुरूंगात होते. जनसंघाच्या नेत्या सुमतीबाई सुकळीकर यांनी त्यांच्यावर काही मिसाबंदीच्या कुटूंबाची जबाबदारी सोपविली होती व त्यांनी ती बिनबोभाट पारही पाडली हे फारच थोड्या लोकांना माहीत आहे.

त्यावेळी पू. विनोबा भावे मौन पाळून होते. ज्यादिवशी विनोबांचे मौन सुटणार होते, त्यादिवशी पवनारला जमणाऱ्या श्रोतृवृंदात आणीबाणीविरुध्द पत्रके वाटावीत असे समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांनी ठरविले होते. ते त्यावेळी भूमिगत होते. त्यांना पवनारपर्यंत सुखरूप कसे न्यायचे हा प्रश्न होता. 'मी त्यांना घेऊन जाते.' कमलबाईंनी सुचविले. त्यावेळी त्यांच्या पायाचे हाड मोडल्याने त्यांना नीट चालता येत नव्हते. परंतु शरीराच्या अशा अपंग अवस्थेतही एक अत्यंत महत्त्वाचे काम करायची त्यांनी तयारी दाखविली होती, हे विशेष. अर्थात त्यावेळची कमलाबाईंची शारीरिक स्थिती व देशातील दडपशाही लक्षात घेऊन त्यांच्यावर ती जबाबदारी न सोपवता लीलाताई चितळे यांनी ते काम केले.

अशा अनेक गोष्टींची नोंद करता येणे शक्य नसते व त्यामुळे त्या इतिहासाला अज्ञातच राहतात.

* * *

# मातृसेवा संघ हेच घर

**मातृसेवा संघाची स्थापना व शाखा विस्तार :**

सीताबर्डी सूतिकागृह सुरू केल्यापासून अल्पावधीतच त्याचा चांगला जम बसला. त्यामुळे सरकारी दरबारी त्याची नोंदणी होणे गरजेचे झाले. अशा नोंदणीमुळे संस्थेला स्थायित्वही आले असते. त्यामुळे १३ मे १९२५ रोजी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टच्या अंतर्गत परोपकारी संस्था (चॅरिटेबल ट्रस्ट) म्हणून संस्थेची नोंदणी करण्यात आली. तिच्या अनुसार महिना तीस रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या स्त्रियांची बाळंतपणे मोफत होणार होती. मासिक ३० ते १५० रुपये उत्पन्न गटातील स्त्रियांकडून सात रुपये तर १५० रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न गटातील स्त्रियांकडून दहा रुपये शुल्क आकारायचे ठरले. संस्थेत मोफत बाळंतपणे खूप होत असत. त्यामुळे संस्थेचा खर्च भागविण्यासाठी देणगीदारांचा सतत शोध घ्यावा लागे.

महाल सूतिकागृह चांगले चालू लागल्यावर कमलाबाईंचा आत्मविश्वास वाढला व गावोगावी सूतिकागृहे उघडावीत असे त्यांना वाटू लागले. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम वर्ध्याची निवड केली. त्यांचे तृतीय बंधू दत्तोपंत उर्फ नानासाहेब हे पूर्वी वर्ध्याच्या मारवाडी हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक होते. त्यांच्यामुळे कलमाबाईंच्याही वर्ध्यात अनेक ओळखी होत्या. मीराबेनची शुश्रूषा त्यांनी केली तेव्हा बजाज कुटुंबियांशी त्यांचे स्नेहबंध निर्माण झाले होते. याचा फायदा घेऊन त्यांनी १६ रुपये मासिक भाड्याने एक घर मिळविले. जानकीदेवी बजाज यांनी १० गाद्या व १० उशा दिल्या. अनेक परिचित भगिनींनी भेटून कमलाबाईंनी सूतिकागृहासाठी लागणारी भांडी-कुंडी, वजनाचा काटा व इतर सामग्री जमवली. डॉ. कावळे, डॉ. कलमाताई नारुळकर, डॉ. शेरलेकर यांच्यासारख्या

नामांकित डॉक्टरांकडून वैद्यकीय मदतीचे आश्वासन घेतले व १५ फेब्रुवारी १९३७ ला थोर समाजसेवक काकासाहेब परांजपे यांच्या हस्ते सूतिकागृहाचे उद्‌घाटन केले. सूतिकागृहात बाळंतपणे होत होती. परंतु तरीही जमाखर्चाचा मेळ बसत नव्हता. दरवर्षी नागपूरहून काही रक्कम उसनी मागावी लागत होती. शेवटी कमलाबाईंनी कृष्णाताई भावे यांना १९४० च्या सुमारास वर्ध्याला पाठविले. कृष्णाताई भावे या सूतिकागृहाच्या नर्सिंग कोर्सच्या पहिल्या विद्यार्थिनीपैकी एक होत्या. नागपूरला कमलाबाईंच्याच मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या होत्या. त्यांनी अक्षरशः चार महिन्यात सूतिकागृहाचा जम व्यवस्थित बसवला.

वर्धा शाखेची स्थापना झाल्याबरोबर कमलाबाईंचे लक्ष भंडाऱ्याकडे गेले. २३ मार्च १९३८ रोजी नागपूरला सूतिकागृहाच्या कार्यकारी मंडळापुढे त्यांनी भंडाऱ्याला शाखा उघडायचा प्रस्ताव ठेवला व आठ दिवसात सर्व जमवाजमव करून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सौ. कलमाबाई रेगे यांच्या अध्यक्षतेखाली हळदी-कुंकवाचा समारंभ करून शाखा सुरू करण्यात आली. भंडाऱ्याचे श्री. बापुसाहेब वाठोडकर यांनी ३५ रुपये महिना मदत देऊ केली. इतर सामानसुमान कमलाबाईंनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने लोकांकडूनच जमवले. सुरुवातीला नागपूरहून गोदूताई कोठीवाले यांना व्यवस्थापिका म्हणून पाठविण्यात आले. नंतर अंबूताई सोमपूरकर यांच्यावर ती जबाबदारी सोपविण्यात आली.

भंडाऱ्याला सूतिकागृह सुरू केल्यानंतर चारच महिन्यांनी कमलाबाईंनी आर्वीला सूतिकागृह सुरू केले. तत्पूर्वीही त्यांनी आर्वीला सूतिकागृह सुरू करता येईल का? याची चाचपणी केली होती. परंतु सूतिकागृह सुरू करायचे म्हणजे सर्वप्रथम उत्कृष्ट डॉक्टर हवेत आणि तेही शक्य तोवर मोफत किंवा अत्यल्प मोबदल्यावर काम करणारे असावेत असे कमलाबाईंचे सुरुवातीपासूनचे धोरण होते. आर्वीला डॉ. आपटे, डॉ. नगरकर आणि डॉ. देशपांडे यांनी अशी वैद्यकीय मदत द्यायचे मान्य केले. तपोधन श्रीकृष्णदासजी जाजू यांनी (हे वर्धेला राहत असत) आपले आर्वीचे घर संस्थेला सूतिकागृह काढण्यासाठी दोन वर्षांसाठी भाड्याने दिले. नथमल ट्रस्ट फंडातूनही २४०० रुपयांची देणगी मिळाली. आणि १ जुलै १९३८ ला आर्वीचे सूतिकागृह सुरू झाले. गंमत म्हणजे उद्‌घाटनाच्या कार्यक्रमापूर्वीच एका सूतिकेची प्रसूति सूतिकागृहातच होऊन खऱ्या अर्थाने संस्थेचे उद्‌घाटन झाले. औपचारिक समारंभ तात्यासाहेब थत्ते यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

डॉ. देशपांडे यांचे त्यावेळी सूतिकागृहाची आवश्यकता या विषयावर भाषण झाले. पार्वतीबाई जोशी या व्यवस्थापिका म्हणून काम करत होत्या. कृष्णदासजी जाजू यांच्या मदतीमुळे १९४२ मध्ये अवघ्या चार वर्षांत आर्वीचे सूतिकागृह स्वतःच्या इमारतीत स्थानांतरित झाले.

**जबलपूर शाखा :**

जबलपूर हे त्या काळात मध्यप्रांतातील दोन नंबरचे शहर होते. तिथे सूतिकागृह असायला हवे या विचाराने कमलाबाई जबलपूरला गेल्या. सूतिकागृह उघडल्यास दोन स्त्रिया बाळंतपणासाठी यायला तयार होत्या. म्हणून कमलाबाईंनी ३० रुपये महिना भाड्याची जागा घेऊन व जरुरीचे सामान देऊन नागपूरहून विमलाबाई बर्वे यांना पाठविले. त्यानंतर नागपूरला सूतिकागृहाच्या ९ फेब्रुवारी १९४१ च्या सभेत जबलपूर शाखेचा ठराव आला व रीतसर उद्‌घाटन रा. ब. छत्तरसिंग यांच्या हस्ते झाले. डॉ. सरवटे यांचे याप्रसंगी सूतिकागृहाची आवश्यकता या विषयावर भाषण झाले. या नंतर सूतिकागृहाच्या शाखा विविध ठिकाणी उघडायचा धडाकाच कमलाबाईंनी सुरू केला. ६ फेब्रुवारी १९४४ ला हिंगणघाट, १४ एप्रिल १९४५ ला बिलासपूर, २४ मार्च १९४५ ला आरमोरी, २५ मार्च १९४५ ला ब्रह्मपूरी, २० मे १९४५ ला वरोडा अशा ५ शाखा अवघ्या सव्वा वर्षांत सुरू झाल्या. १९४७ मध्ये सागर येथे संस्थेचे सूतिकागृह सुरू झाले.

हिंगणघाट शाखेसाठी पुखराजजी कोचर यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ मोठी देणगी दिली. बिलासपूरचे प्रख्यात डॉक्टर रामचंद्र गोपाळ दिक्षित यांनी त्यांच्या मुलाच्या स्मरणार्थ सूतिकागृह काढण्याची कमलाबाईंना विनंती केली व जागेपासून वैद्यकीय सेवेपर्यंत सर्वच मदत देऊ केली. आरमोरी व ब्रह्मपूरी शाखा सुरू करण्यासाठी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी अटल यांनी मदत केली तर वरोडा शाखा सुरू करण्यासाठी आमटे वकील यांनी मदत केली असा उल्लेख मातृसेवा संघाच्या काही स्मरणिकांमध्ये आहे. हे आमटे वकील म्हणजे सुप्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे असावेत.

१९४६ मध्ये सिताबर्डी सूतिकागृह सुरू होऊन २५ वर्षे पूर्ण झाली. सूतिकागृहाचा रजत महोत्सव मोठ्या प्रमाणात करावा असे कमलाबाईंना वाटू लागले. त्याचवेळी त्यांचे

बंधू नानासाहेब सरकारी नोकरीतून निवृत्त झाले व कमलाबाईंच्या कार्यात उत्साहाने सहभागी होऊ लागले. तोपर्यंत १२ ठिकाणी सूतिकागृहाच्या शाखा सुरू झाल्या होत्या. तेथील सर्व कार्यकर्त्यांना व कर्मचाऱ्यांना रजत महोत्सवाच्या निमित्त एकत्र बोलवावे, सीताबर्डी शाखेच्या इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभही करावा असे कमलाबाईंनी ठरविले व ठरविल्याप्रमाणे १७ मार्च १९४८ ला हा रजतमहोत्सवाचा कार्यक्रम धडाक्यात पार पडला.

यानंतर मात्र शाखा विस्ताराच्या कामाची गती थोडी मंदावली. १९५१ मध्ये कुऱ्हा व चांदूर रेल्वे, १९५७ मध्ये अकोला, १९५८ मध्ये करेली, १९६४ मध्ये नरसिंगपूर व १९६८ मध्ये पवनी येथील सुतिकागृहे सुरू करण्यात आली. १९५२ मध्ये अमरावतीतील मोटे सूतिकागृह व १९५४ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख गावचे मातृमंदिर हे सूतिकागृह आपल्या संस्थेशी संलग्न करुन कमलाबाईंनी पूर्व दिशेला बिलासपूरपासून पश्चिमेला कोकणापर्यंत व उत्तरेला करेलीपासून दक्षिणेला चांद्यापर्यंत (चंद्रपूरपर्यंत) आपल्या सूतिकागृहांचे एक जाळेच तयार केले. या व्यतिरिक्त सौंसर येथे घर सेवा केंद्र व राजस्थानातील शिवदासपुरा येथे मातृ एवं शिशू विकास केंद्र त्यांनी सुरू केले.

या सर्व २० शाखा व २ केंद्रांना कमलाबाई वारंवार भेटी देत. त्यातील एखाद दुसऱ्या शाखेचा अपवाद वगळता सर्वच शाखांची कामगिरी उत्कृष्ट होती. १९७४ पर्यंत १८ शाखा स्वतःच्या वास्तुत स्थानांतरित झाल्या. उरलेल्या दोन शाखा स्थानिक नगरपालिकांच्या इमारतीत काम करत होत्या. दोन अपवाद वगळता आजही सर्व शाखा मातृसेवा संघाशी संलग्न आहेत व त्यांना अधिकृत सरकारी इस्पितळे म्हणून मान्यताही आहे.

**उत्कृष्ट व्यवस्थापिका :**

कमलाबाईंनी कुठल्याही व्यवस्थापन शाखेचा अभ्यास केला नव्हता, परंतु इतक्या शाखा सुरू करणे व त्या व्यवस्थित चालतील इकडे लक्ष देणे हे काम त्यांनी इतक्या समर्थपणे केले की आजच्या प्रथेला अनुसरुन अनेक मॅनेजमेंट संस्थांनी त्यांना व्यवस्थापनाची मानद डॉक्टरेट दिली असती.

शाखा सुरू करायची त्यांची पद्धत त्यांच्याच अनुभवातून सिद्ध झाली होती. प्रथम भाड्याची जागा पाहायची, त्या गावातील सुप्रसिद्ध डॉक्टरांना भेटून त्यांच्याकडून वैद्यकीय

मदत मिळवायची. गावातील ओळखीच्या किंवा प्रतिष्ठीत लोकांना भेटून त्यांच्याकडून सूतिकागृहासाठी आवश्यक ते सामान मिळवायचे. काही धनिक लोकांकडून दर महिन्यांच्या वर्गणीचे आश्वासन घ्यायचे व नागपूरहून एक कर्तृत्ववान व प्रशिक्षित सहकारी व्यवस्थापिका म्हणून पाठवायची.

गावातील प्रतिष्ठीत नागरिकांना उद्‌घाटनासाठी त्या बोलवत. तेथे स्त्री-पुरूष असा भेद नव्हता. उलट त्या त्या गावातील सन्माननीय पुरुष संस्थेशी जोडले गेले की सूतिकागृहाला एक प्रकारची सामाजिक सुरक्षितता लाभत असे. कमलाबाई ज्यांना व्यवस्थापिका म्हणून पाठवत त्या बहुदा विधवा, परित्यक्ता किंवा नवऱ्याचे घर सोडून आल्यामुळे एकट्या किंवा लहान मुलांबरोबर राहणाऱ्या तरूण स्त्रिया असत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही अशा लोकांच्या मदतीमुळे सुटत असे.

गावातील लोकांशी स्नेहाचे धागे घट्ट करण्याची त्यांची स्वतःची एक विशेष पद्धत होती. कोणत्याही घरी गेल्या की त्या बैठकीच्या खोलीत न बसता थेट स्वैपाक घरात जात. स्वैपाक घरातील कंटाळवणे काम म्हणजे ताक करणे किंवा पोळ्या करणे. कमलाबाई गेल्या गेल्या ताक करायला घेत किंवा पोळ्या लाटायला घेत. कोणी जेवायचा आग्रह केला तर स्वतःच सगळा स्वैपाक करीत व आधी सगळ्यांना जेवायला लावून मग स्वतः जेवीत. श्रीखंड, बासुंदी असे गोड पदार्थ वाटीत घेऊन व्यवस्थित खात नसत. पातेल्यातील श्रीखंड संपल्यावर उरलेले बोटांनी चाटून खात किंवा बासूंदी दुसऱ्या पातेल्यात ओतून ठेवून पातेल्याची खरवड स्वतः खात. पुन्हा लगेच भांडे घासून पूसून पालथे घालून ठेवत. कोणाच्या घरी फळीवर वापरात नसलेली जुनी भांडी दिसली की सूतिकागृहासाठी मागून घेत. कुणाच्या घरी एखादा जास्तीचा पलंग दिसला तर तो मागून घेत. यातली कुठलीही वस्तू त्यांना स्वतःसाठी नको असल्याने त्यांना मागण्यात संकोच वाटत नसे. कुठल्याही हलक्या कामाची त्यांना लाज नसे किंवा कंटाळाही येत नसे. त्यामुळे जिथे तिथे त्या लगेच कामाला लागत. अंगण झाडणे, मोऱ्या धुणे, भांडी घासणे असले कुठलेही काम त्या सहजपणे करत. इतक्या धडाडीने त्यांनी शाखा विस्तार केला. अनेकदा त्याचा ताण नागपूरच्या सूतिकागृहावर पडे. त्यामुळे नागपूरची मंडळी त्यांना विरोधही करत. परंतु त्यांच्या मनाने एकदा घेतले की घेतले. मग त्या कोणाचे ऐकत नसत. काही शाखांच्या बाबतीत आधी शाखा सुरू झाली आणि

नंतर कार्यकारिणीत ठराव आला असेही घडले. परंतु कमलाबाईंनी एकदा ठरवले की झाले. ती गोष्ट करूनच त्या मोकळ्या होत.

व्यवस्थापनावर त्यांची पकड व्यवस्थित असे. त्या स्वतः कष्टाळू असल्याने इतरांना नेमून दिलेले काम झाले नाही की त्यांची भीती वाटे. सर्वांना खायला प्यायला घालायच्या बाबतीत त्यांचा हात सढळ असला तरी कामाच्या बाबतीत हयगय झालेली त्यांना खपत नसे. उत्कृष्ट काम करणाऱ्या शाखा व्यवस्थापकांना त्यांचा आधार वाटे. सर्वच शाखांचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून त्या बदल्या करत. बदली करण्यामागे एखाद्याला धडा शिकवणे हा उद्देश नसे तर ती शाखा व्यस्थित चालावी हाच हेतू असे. पण कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या तरी त्यांच्या कुटुंबाचे हाल होऊ नयेत याचीही त्या काळजी करत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व नंतर नोकरीचीही काळजी करीत.

**संस्थेचे नामकरण :**

सीताबर्डी सूतिकागृहाच्याच अनेक गावी अनेक शाखा निघाल्या. कार्य विस्तार सुरू झाला. सूतिकागृह सुरू केले तेव्हा केलेली घटना अगदी जुजुबी होती. त्यामुळे नव्या घटनेची आवश्यकता भासू लागली होती. सूतिकागृह सुरू करताना स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय करणे एवढाच दृष्टीकोन कमलाबाईंच्या समोर होता. नंतर त्याला पुरक म्हणून नर्सेस ट्रेनिंग कोर्सही सुरू झाला. कमलाबाईंच्या कनवाळू स्वभावामुळे अनेक विधवा, परित्यक्ता सूतिकागृहाच्या आश्रयाला येत. अनेक लहान मुलेही त्या सांभाळायला आणत. त्यामुळे त्यांची संस्था केवळ बाळंतपणापुरती सीमित राहिलीच नव्हती. म्हणून वर्धा येथील ॲडव्होकेट कृष्णराव जाजू यांच्यावर नवीन घटना तयार करायची जबाबदारी सोपविण्यात आली. व १९५४ मध्ये संस्थेचे नामकरण झाले 'मातृसेवा संघ'. नवीन घटना त्याच वर्षी लागू झाली व सीताबर्डी सूतिकागृह 'मातृसेवा संघाचे सूतिकागृह' म्हणून काम करू लागले.

**स्वतःच्या इमारतीत :**

सीताबर्डी सूतिकागृह सुरू करताना गंगाबाई गोखले यांनी आपल्या वाड्यातील जागा तीन वर्षांसाठी मोफत वापरण्यासाठी दिली होती. तीन वर्षांनंतर त्या जागेचे भाडे आकारू लागल्या. त्यामुळे सूतिकागृहाला स्वतःची इमारत असावी असे कलमाबाईंना वाटू लागले. त्या दृष्टीने त्यांनी सीताबर्डीवरच दहा हजार चौरस फुटांचा एक प्लॉट

खरेदीही केला. परंतु पुढे १९२६ मध्ये सरकारकडून सूतिकागृहासाठी जमीन मिळाली तेव्हा नागजीभाई चौहान यांच्याकडून ३७५० रुपयात घेतलेला प्लॉट त्यांनी परत केला. सीताबर्डीवरील श्री टॉकीजच्या बाजूला सरकारकडून जमीन मिळाली. ती कमी पडेल असे सल्लागार इंजिनिअरचे मत पडले. त्यामुळे त्या जमिनीला लागून आणखी १८३६ चौ. फूट जमीनही कमलाबाईंनी विकत घेतली. इमारत निधीचे खाते सूतिकागृहाच्या खात्यापासून वेगळे करून त्यांनी इमारतीसाठी निधी गोळा करायला धडाक्याने सुरूवात केली.

ज्यावेळी प्रत्यक्ष बांधकामाला सुरूवात करावी असे कमलाबाईंना वाटले, त्यावेळी नागपूर नगरपालिकेने सूतिकागृहाच्या जागेला लागून बाजार भरत असल्याने तेथे बांधकाम करू नये, त्याचा सूतिकागृहाला त्रास होईल असे सांगून दुसरी जागा द्यायचे कबूल केले. त्यामुळे पर्यायी जागा मिळायची वाट पाहण्याशिवाय कमलाबाईंच्या हाती काहीच राहिले नाही. तशात ५ मे १९३१ ला नगरपालिकेच्या अध्यक्षांनी संस्थेला लेखी कळवले की, महाराज बागेच्या कोपऱ्यावरील जागेची किंमत आल्यासच तुम्हाला जागा देता येईल व या कामाला किती वेळ लागेल हे सांगता येत नाही. तोपर्यंत संस्थेजवळ १४,१९४ रुपये ९ आणे ३ पै इतका इमारत निधी जमला होता. पण इमारतीचे बांधकाम थंड्या बस्त्यात पडले.

याचवेळी महालात ज्या ठिकाणी आज सूतिकागृह आहे, तो वाडा विकायला निघाला. निहाजुद्दीन जमीनदार यांच्या त्या वाड्याची किंमत १३,७५० रुपये होती. संस्थेने तो वाडा महाल शाखेसाठी विकत घ्यायचा ठरविले. सीताबर्डी सूतिकागृहाकडून ११,५०० रुपये काही अटींवर घेऊन व बाकीचे पैसे महाल सूतिकागृहाच्या शिलकीतून घेऊन १९३१ मध्ये महाल सूतिकागृहासाठी वाड्याची खरेदी झाली. इतक्या अल्पावधीत संस्थेचा जम बसवून स्वतःची वास्तू खरेदी करणे हे निश्चितच कौतुकास्पद होते.

महाल सूतिकागृहासाठी घेतलेली जागा भरपूर मोठी होती. त्यामुळे प्रसूतीशाखेचे प्रशिक्षण घेण्यासाठी जास्त मुलींना प्रवेश देणे शक्य झाले व सूतिकागृहाची भरभराट होऊ लागली. अवघ्या ५ वर्षात सीताबर्डी सूतिकागृहाकडून घेतलेले कर्ज फेडण्यात कमलाबाईंना यश आले.

हळूहळू सूतिकागृहाच्या शाखांचा विस्तार वऱ्हाड व मध्यप्रांतात होऊ लागला तेव्हा भाड्याने घर घेऊन सुरू केलेली सूतिकागृहे स्वतःच्या वास्तूत स्थानांतरित करण्यासाठी कमलाबाईंचे प्रयत्न सुरू झाले. त्याला यश येऊन आर्वी येथील शाखा १९४२ मध्ये स्वतःच्या वास्तूत काम करू लागली.

सरकारकडून सीताबर्डी सूतिकागृहासाठी पर्यायी जागा मिळविण्याच्या प्रयत्नांना यश आले ते भारत स्वतंत्र झाल्यावर. १९४८ मध्ये सीताबर्डीवरील झाशीराणी चौकातील हिंदी मोर भवनला लागून असलेली जागा, जिथे सध्याचे मातृसेवा संघाचे सूतिकागृह व कार्यालय आहे; संस्थेला मिळाली.

१९४६ मध्ये सीताबर्डी सूतिकागृहाच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झाली. पण स्वातंत्र्य मिळाल्यावर करू, म्हणून लांबलेला रजत जयंती समारोह, स्वतःच्या जागेचा ताबा मिळाल्यावर तिथेच करू म्हणून अधिकच लांबला. परंतु १९४८ मध्ये जागेचा ताबा मिळाल्यावर रजत जयंती सोहळ्याच्या अध्यक्षा, हंसाबेन मेहता व नामदार मंगलदासजी पक्वासा यांच्या हस्ते कोनशिला बसवून बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. लवकरच सूतिकागृहाची इमारत बांधून पूर्ण झाली व सूतिकागृह सीताबर्डीवरील वझलवारांच्या वाड्यातून स्वतःच्या इमारतीत स्थानांतरित झाले.

नंतरच्या कालात सूतिकागृहाला स्वतःच्या मालकीची इमारत हवी या बाबतीत कमलाबाई जास्त आग्रही झाल्या व १९७३-७४ पर्यंत दोन सूतिकागृहांचा अपवाद वगळता सर्व सुतिकागृहे स्वतःच्या वास्तूतून काम करू लागली.

केवळ सूतिकागृह नव्हे तर मातृसेवा संघाचे जे इतर प्रकल्प होते; नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, समाजसेवा महाविद्यालय, पंचवटी वृद्धाश्रम यांच्याही स्वतःच्या इमारती झाल्या.

१६ व्या वर्षी वैधव्य आल्यानंतर निष्कांचन अवस्थेत सासर सोडलेल्या अल्पशिक्षित मुलीने आयुष्याच्या साठीपर्यंत गाठलेला हा टप्पा निश्चितच आश्चर्यचकित करणारा आहे. कार्याचा हा गोवर्धन उचलण्यासाठी अनेक सहकाऱ्यांच्या व आजन्म सेविकांच्या आयुष्याच्या काठ्या लागल्या असल्या तरी श्रीकृष्णाच्या करंगळीचे काम मात्र कमलबाईंनीच केले हे निर्विवाद. सीताबर्डी सूतिकागृहाच्या स्थापनेला १९४६ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाली.

तेव्हापासूनच संस्थेचा रजत महोत्सव साजरा करायचा विचार कमलाबाईच्या मनात येत होता. तोपर्यंत गावोगावी संस्थेच्या १२ शाखा स्वतःच्या वास्तूत स्थानांतरित झाल्या होत्या. परंतु सीताबर्डी शाखेच्या जागेचा प्रश्न सोडवला जात नव्हता. शासनाने जागा देऊ केली होती. परंतु अद्याप ती जागा ताब्यात आली नव्हती. जागा ताब्यात मिळविण्याची चिन्हे दिसू लागताच कमलाबाईंनी २३ एप्रिल १९४७ ला अक्षय तृतीयेच्या दिवशी महाल शाखेत काही चाहत्यांची व हितचिंतकाची एक अनौपचारिक सभा घेतली. उत्सव करायचा तो मोठ्या प्रमाणावर व नागपूरकरांना अभिमान वाटेल असा यावर सर्वांचेच एकमत झाले व त्यासाठी एक वेगळी समिती नेमावी असा ठरावही झाला.

हळूहळू सर्वजण कामाला लागले. भारत स्वतंत्र झाला. तो आनंदाचा सोहळा पार पडला.

आता स्वराज्यात संस्थेचा रजत जयंती समारोह धडाक्यात नोव्हेंबरमध्ये करायला हरकत नाही असे सर्वांना वाटू लागले व त्या दृष्टीने कार्यक्रमाची आखणी सुरू झाली. तोपर्यंत सर्वांचा उत्साह वाढविणारी आणखी एक घटना घडली. इतके दिवस सरकार दरबारी जागेचे घोंगडे भिजत पडलेले होते. ती जागा (सीताबर्डीवरील झाशीराणी चौकातील हिंदी मोर भवनला लागून) संस्थेला मिळाल्याची बातमी आली. आता थोडा उशीर झाली तरी हरकत नाही. परंतु कार्यक्रम स्वतःच्या जागेत करू असे कमलाबाईंनी ठरविले.

सुरुवातीला कार्यक्रम आठ दिवस करायचा घाट कमलाबाईंनी घातला होता. परंतु ३० जानेवारी १९४८ ला म. गांधींच्या मृत्यूची बातमी आल्याने सर्वांच्याच उत्साहावर विरजण पडले. शेवटी १७ मार्चला हंसाबेन मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समारंभाचे उद्घाटन व सूतिकागृहाचा कोनशीला समारंभ करायचे ठरले. तेव्हाच्या मध्यप्रांत व वऱ्हाडाचे (C.P. & Berar) मुख्यमंत्री मंगलदासजी पक्वासा यांनी समारंभाला उपस्थित रहायचे मान्य केले व कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला.

सरकारकडून मिळालेल्या जागेला समतल करून त्यात मुख्य समारंभासाठी भव्य मांडव टाकण्यात आला होता. प्रदर्शनासाठी आणखी एक बंदिस्त मांडव व भोजनालयासाठी महाराज बागेतील चिकूची बाग होती. समितीचे कार्यालय त्याच ठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या कोठीतील शामियान्यात सुरू करण्यात आले. नानासाहेब मोहनी चोवीस तास तिथेच राहू लागले.

१७ मार्च १९४८ ला सायंकाळी ५ वाजता हंसाबेन मेहता यांच्या हस्ते रजत जयंती समारोहाच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. भारतातील आरोग्य सेवेच्या कमतरतेवर त्यांनी नेमके बोट ठेवले. कमलाबाई करीत असलेल्या कार्याचा गौरव करून कमलाबाईंना त्यांच्या कामासाठी सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कमलाबाईंनी आपल्या भाषणात संस्थेच्या २५ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. सूतिकागृह हे स्त्रियांची बाळंतपणे करण्याचे मर्यादित काम करीत नाही तर कुठल्याही स्त्रीला अडचणीच्या प्रसंगी मदतीचा हात देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत हे आवर्जून सांगितले. संस्थेच्या या जागेवर सुसज्ज इमारत बांधण्यासाठी सर्वांनी सहकार्य द्यावे असे आवाहन त्यांनी उपस्थित मान्यवरांना केले.

रजत जयंती समारोह इतक्या मोठ्या प्रमाणात करण्यामागे इमारतीसाठी निधी गोळा करणे हेही एक मोठे लक्ष्य होतेच व ते बऱ्याच प्रमाणात गाठले गेले.

उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सेविका दिन, तिसऱ्या दिवशी मातृदिन व चौथ्या दिवशी बालक दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने नागपूरमधील विविध मोहल्यांमध्ये सुदृढ बालक स्पर्धा (त्यावेळी त्याला शिशुप्रदर्शन म्हटले जाई) घेण्यात आल्या. एक हजार बालकांच्या आरोग्याची निःशुल्क तपासणी करण्यात आली.

उद्‌घाटनाच्या दिवशीच वे. शा. स. दामले गुरुजींच्या पौरोहित्याखाली संस्थेच्या इमारतीचा कोनशीला समारंभ पार पाडण्यात आला. या रजत जयंती समारोहाच्या निमित्ताने नामदार दुर्गाशंकर मेहता, प्रेमा कंटक, जानकीदेवी बजाज, नामदार बाबासाहेब देशमुख, आचार्य भागवत यांची व्याख्याने झाली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आशीर्वाद द्यायला आले होते. त्यांचे खंजिरी भजन झाले. सूतिकागृहातील सेविकांनी एक नाटक बसवले होते. सूतिकागृहात प्रसूत झालेल्या मातांनी काही नाट्यप्रवेश सादर केले तर सूतिकागृहात जन्मलेल्या मुलांनी दोन एकांकिका सादर केल्या. भरपूर कार्यक्रमाची रेलचेल झाल्याने अनेक वर्ष नागपूरकरांच्या स्मृतिपटलावर कार्यक्रमाची नोंद राहील असा महोत्सव साजरा करून कमलाबाई कृतकृत्य झाल्या व नवीन इमारतींचे बांधकाम, असलेल्या शाखांची व्यवस्था व नवीन शाखा उभारण्यात व्यस्त झाल्या.

संस्थेचा कार्यविस्तार होऊ लागला तेव्हा त्यांनी कार्यकारिणी तयार करण्याची पद्धतही ठरविली. प्रत्येक गावाच्या शाखेतील अध्यक्ष या नागपूरच्या अध्यक्ष असत. सचिव

स्वतः कमलाबाई असत. परंतु उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, सहसचिव व कार्यकारणीतील इतर सदस्य स्थानिक असत. कार्यकारी मंडळावर काही अपवाद वगळता फक्त स्त्रियांनाच घेतले जाई. परंतु सल्लागार समितीत मात्र पुरुषांचा समावेश होता. सचिव या नात्याने कमलाबाई प्रत्येक शाखेला सतत भेट देत. प्रत्येक गोष्टीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. या भेटींसाठी त्यांनी रेल्वेचा पासही मिळवला होता.

एकदा लाल बहादूर शास्त्री सूतिकागृहाला भेट द्यायला आले होते. तेव्हा ते रेल्वेमंत्री होते. कमलाबाईंना त्यांनी काय हवे म्हणून विचारले. तेव्हा कमलाबाईंनी त्यांना पाच जणांचा रेल्वेचा पास मागितला. 'कुठल्याही गावी बाई अडली असेल तर तिला शहरात न्यायला मी स्वतः, एक डॉक्टर, एक नर्स, ती बाई व तिच्या घरची एक व्यक्ती इतके लोक तरी जाणारच. म्हणून पाच जणांचा पास हवा,' हा त्यांचा हिशोब.

त्यांना फर्स्टक्लासचा तीन जणांना पास होता व त्या पासवर त्या अख्खा भारत सतत पालथा घालायच्या. गमतीने त्यांचे परिचित म्हणतही, 'कमलाबाईंचा पत्ता मु. पो. इंडियन रेल्वे, भारत' हा आहे. १९३७ मध्ये सुरू झालेली ही त्यांची भटकंती १९७८-७९ पर्यंत सुरू होती. १९७२ मध्ये घसरून पडल्याने त्यांच्या पायाचे हाड मोडले व त्यांना काही दिवस सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. पण वर्षाच्या आतच हाती काठी घेऊन त्यांचा प्रवास सुरू झाला.

**मातृसेवा संघाचा सुवर्ण महोत्सव :**

१९७१ मध्ये सीताबर्डी सूतिकागृहाची स्थापना होऊन ५० वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे मातृसेवा संघाचा सुवर्णमहोत्सव धडाक्यात साजरा करण्याचा विचार कमलाबाईंसह सर्व कार्यकर्त्यांच्या मनात येणे साहजिकच होते. त्याच वर्षी पाकिस्तान विरुद्ध युद्ध जिंकून आणि बांगलादेशाची निर्मिती करून भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जनमानसात आदराचे स्थान मिळविले होते. त्यामुळे संघाच्या सुवर्ण महोत्सवाला त्यांनाच पाचारण करायचे कार्यकारिणीत ठरले.

पन्नास वर्षाच्या कालखंडात संस्थेने केलेली प्रगती लक्षणीय होती. १८ ठिकाणी सुरू असलेली सूतिकागृहे, नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, समाजसेवा महिला महाविद्यालय, पंचवटी वृद्धाश्रम आदी इतर प्रकल्प, त्यात काम करणारे हजारो कर्मचारी व कार्यकर्ते असा सगळा पसारा कमलबाईंसह आता कार्यकर्त्यांची नवी पिढी उत्साहाने सांभाळत

होती. त्यामुळे सुवर्ण अक्षरांनी लिहिता येईल असा महोत्सव करायचा म्हणजे तो पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालीच व्हायला हवा होता. त्यामुळे जेमतेम दीड महिन्यांची पूर्वसूचना देत पंतप्रधान १४ ऑक्टोबर १९७२ ला सायंकाळी ४ वाजता उद्‌घाटनासाठी येतील असा निरोप आला तेव्हा सर्वच कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उधाण आले.

अनेक लोकांना कार्यक्रमात सहभागी होता यावे म्हणून कार्यक्रम सीताबर्डीवरील धीरन कन्या शाळेच्या भव्य प्रांगणात घ्यायचे ठरविण्यात आले. स्वागतसमितीचे सदस्य व देणगीदार यांना तर कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होतेच. पण सामान्य नागरिकांनाही कार्यक्रमास येता यावे म्हणून एक रुपया घेवून प्रवेशपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली. पण अल्पावधीतच ही प्रवेशपत्रेही संपली.

पंतप्रधानाचा कार्यक्रम असल्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक व त्यांच्या पत्नी वत्सलाताई नाईक हे जातीने मातृसेवा संघाला भेटी देऊन व्यवस्था पाहू लागले. राजशिष्टाचाराला अनुसरून महाराष्ट्राचे राज्यपाल अली यावर जंग हेही कार्यक्रमाला सपत्निक उपस्थित राहणार होते.

१४ ऑक्टोबरला पंतप्रधान इंदिरा गांधीचे सकाळी ९ च्या सुमारास नागपूर विमानतळावर आगमन झाले. कमलाबाईंनी पुष्पहारांनी केलेल्या स्वागताचा स्वीकार करून त्या वर्धेला रवाना झाल्या.

सकाळी स्वागत समितीच्या सदस्यांसाठी तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते.

दुपारी दोन वाजल्यापासूनच धीरन कन्या शाळेचे प्रांगण नागरिकांनी फुलून गेले होते. ठीक ४ वाजता पंतप्रधान मातृसेवा संघाच्या प्रवेश द्वारावर पोचल्या. तेथे कमलाबाई व वेणूताई नेने यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. कुसुमताई वाकरांनी पंतप्रधानांना सूतिकागृहातील सर्व विभाग दाखविले. त्यांच्या हस्ते दुर्बल मनस्क मुलांच्या छात्रालयाचे उद्‌घाटन झाले. वृद्धाश्रमातील वृद्धांना व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थिनींना पंतप्रधान भेटल्या. मातृसेवा मासिकाचे व्यवस्थापक व प्रकाशक श्री बापूराव ठाकरे हे दोन्ही पायांनी अपंग होते. मातृसेवा संघाच्या कार्यालयात पंतप्रधानांशी त्यांची ओळख करून देण्यात आली. ब्लड बँकेचे डॉ. घनश्याम मुंदडा, ऑपरेशन थिएटरमधील डॉ. रामदास परांजपे यांच्या कार्याची माहिती त्यांनी करून घेतली व त्यानंतर उघड्या जीपमधून त्या समारंभस्थानी गेल्या.

उद्‌घाटन समारंभ खरोखरच नेत्रदीपक झाला. पंतप्रधानांनी खुल्या मनाने संस्थेची तारीफ केली. भौतिक व आर्थिक प्रगतीचे शिखर गाठले म्हणजेच आपल्याला सर्व काही मिळाले असे समजू नये. भौतिकवादाची कास धरल्याने पाश्र्चात्य समाजात ज्या विकृती शिरल्या त्या आपल्याकडे येणार नाहीत, याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे, असे सांगून मातृसेवा संघासारख्या संस्था या कामी पुढाकार घेतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्री निधीतून संस्थेला एक लाख रुपयांचे अनुदान घोषित केले.

शेवटी कमलाबाई आभारप्रदर्शनासाठी उभ्या राहिल्या. पंडित नेहरू मातृसेवा संघाला भेट द्यायला आले होते ही आठवण सांगून त्या म्हणाल्या की, 'तेव्हाचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मार्फत प्रयत्न करून आम्ही नेहरूजींना बोलावले. यावेळी मी स्वतः पंतप्रधानांना भेटून निमंत्रण द्यावे असे मला सांगण्यात आले. परंतु आता या समाजकार्याची धुरा इतरांनी वाहावी म्हणून पंतप्रधानांना मी समक्ष भेटले नाही.' यशवंतरावांप्रमाणेच तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पंतप्रधानांना आणण्यात सहकार्य केले याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.

मातृसेवा संघाच्या विशाल कार्याचा व विस्ताराचा उल्लेख करून कमलाबाई म्हणाल्या की, 'याचे सारे श्रेय नागपूरकरांना आहे. त्यांनी सहकार्य दिले नसते, या संस्थेवर प्रेम केले नसते तर एकट्या कमलाबाई व वेणूताई काहीही करू शकल्या नसत्या.'

इंदिराजींना कार्यबाहुल्यामुळे कमलाबाईच्या आग्रहाप्रमाणे संघात जेवण किंवा फराळ घेणे शक्य झाले नाही याचा उल्लेख करून कमलाबाई म्हणाल्या, 'या मुलीचे (इंदिराजींचे) वडील कै. नेहरू संस्थेत आले तेव्हा जेवून गेले होते. परंतु त्यांची ही मुलगी मात्र आमच्या घरून जेवण न करता जात आहे. याचे मला वाईट वाटते व मनाला सारखे खटकते. संघात जेवण्यासाठी वेळ नसला तरी प्रवासात त्यांनी चार घास खावे म्हणून मी इंदिराजींना सोबत जेवणाचा डबा देत आहे.' आणि इंदिराजींनीही या मातेच्या शिदोरीचा सहर्ष स्वीकार केला. इंदिराजींना असे सुनावण्याचे धैर्य कमलाबाईंसारख्या जगन्मातेतच फक्त असू शकते.

असा एखादाच कार्यक्रम आयोजित करून कमलाबाईंचे कधीच समाधान होत नसे. एकाला जोडून दुसरा असे तीनचार कार्यक्रम केल्याशिवाय त्यांचे समाधान होत नसे. सुवर्ण महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी नववे माहेर संमेलन त्यांनी आयोजित केले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला केंद्रीय पर्यटन राज्यमंत्री डॉ. सरोजिनी महिषी यांना बोलावण्यात आले होते. संमेलनाच्या अध्यक्ष होत्या सुप्रसिद्ध बंडखोर लेखिका मालतीबाई बेडेकर.

तिसऱ्या दिवशी परिचारिका संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनाला माधानच्या ताराबेन मश्रुवाला यांना बोलावण्यात आले होते. अध्यक्ष होत्या नगरच्या ॲड. ज्योत्स्ना त्रिभुवन.

या संमेलनात कमलाबाईंना पूर्वसूचना न देता एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तो कार्याक्रम म्हणजे कमलाबाई व वेणूताईंना मानपत्र देण्याचा ! संस्थेच्या आद्य डॉक्टर म्हणजे इंदिराबाई नियोगी यांच्या हस्ते कमलाबाई व वेणूताई यांचा त्यांच्या विरोधाला न जुमानता हृद्य स्त्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. इंदिराबाई नियोगी यांचे फार उद्बोधक भाषण झाले. ज्यावेळी मानपत्राचे वाचन झाले त्यावेळी श्रोतृवर्ग भारावून गेला. ते मानपत्र असे-

*'महा माननीय श्रीमती कमलाताई होस्पेट व श्रीमती वेणूताई नेने यांस*

***आज मातृसेवा संघाचा सुवर्ण महोत्सव चालू असता आपणा दोघींचा संयुक्तरीतीने गौरव करण्यात आम्हास अतिशय आनंद होत आहे. कारण मातृसेवा संघाचा सुवर्णमहोत्सव म्हणजे आपणा दोघींच्या कर्तव्यपरायण आणि प्रयत्नपूर्ण पराक्रमी कर्तबगारीचाच सुवर्ण महोत्सव होय. आपण १९२१ साली ज्यावेळी तत्कालीन गतधवांना विहित ठरलेल्या चाकोरीचा मार्ग सोडून सीताबर्डीवर सूतिकागृह उघडून साविका व्यवसाय स्वीकारलात त्यावेळी त्या प्रयत्नांचा विकास होऊन मातृसेवा संघाची निर्मिती होईल आणि या संस्थेचा एखाद्या वटवृक्षाप्रमाणे विस्तार होईल अशी कोणाला कल्पनाही आली नसती. अनेक कारणांनी दूषिलेल्या स्त्री जातीकडून एवढे भव्य कार्य पार पाडावे हा आम्हा सर्व स्त्रीयांचाच गौरव आहे. मातृसेवा संघाच्या विस्ताराचा उगम आपणा दोघींच्या कर्तृत्वशीलतेत आहे ह्याची जाणीव या प्रवाहाचा लाभ मिळालेल्या आम्हा सर्वांना मोठ्या कृतज्ञतेने भूषवित आहे. कालांतराने सूतिकागृहाची महाल विभागात शाखा स्थापन झाली आणि पाठोपाठ आपण साविका आणि परिचारिका***

*प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. ज्याकाळी असले शिक्षण पतित समजले जात होते त्या काळी हे मोठे धाडसच होते. पण समाजाला डगमगणे हा आपल्या मनाचा मुळापासून पिंड नाही. ज्याच्या इष्टतेबद्दल मनाची ग्वाही आहे त्याचा स्वीकार आणि आचार हाच आपला मनोधर्म समाजाला उपकारक ठरला आहे. आणि म्हणूनच दुबळिकेपायी करुणास्पद ठरलेली गतधवास्थिती आपल्या बाबतीत मोठी समाजोपकारक आणि शेकडो असहायांना सुभग ठरलेली आहे. १९२८ साली आपण स्थापन केलेल्या या केंद्राला १९५४ साली ऑक्झीलियरी नर्सिंग कोर्ससाठी शासकीय मान्यता मिळाली. यावेळेपर्यंत रुग्णपरिचर्येला कितीतरी प्रतिष्ठित स्वरूप आलेले होते.*

*मातृसेवा संघाचे प्रधान कार्य प्रसूतीसाठी सेवा सादर करून मातृत्वाचा सत्कार करणे हे होय. यासाठी वर्ध्याला आपण एक शाखा काढलीत. पाठोपाठ भंडारा, आर्वी अशा शाखा निघत गेल्या. आज सूतिकागृहाच्या शाखा १८ ठिकाणी पसरलेल्या आहेत. आणि या सगळ्या शाखांच्या व्यवस्थापिका मातृसेवा संघातच प्रशिक्षित झालेल्या आहेत. मातृसेवा संघाच्या कार्याचा व्याप इतर क्षेत्रातही विस्तारायला आपलेच कर्तृत्व कारणीभूत झालेले आहे. मातृत्व सफल असायला अपत्य संगोपन हवे, कुटुंब नियोजन हवे. आणखी कितीतरी हवे. म्हणूनच आज मातृसेवा संघाचा दवाखाना, स्त्रियांचे वसतीगृह, वृद्धांच्या निवासासाठी पंचवटी, रक्तपेढी, लस टोचण्याची केंद्रे असा कितीतरी अफाट पसारा आहे.*

*हा सारा पसारा टापटिपीने सांभाळायला आपणास कर्तबगार माणसे जोडता आली, सांभाळता आली आणि प्रसंगी घडवताही आली. आपल्या ह्या गुणांना तोड सापडणार नाही. आपली ही कर्तबगारी पाहून कमलाताई आपणाला १९६१ साली पद्मश्री हा बहुमान आणि त्याच्यासाठी रेडक्रॉसकडून नलवा पदकाचा गौरव प्राप्त झाला, पण ही पदवी किंवा पदके आपला खरा बहुमान नव्हेत. मातृसेवा संघाचा विस्तार हाच आपणा उभयतांचा साक्षात बहुमान आहे.*

*आपला गौरव व्हावा म्हणून आमच्या समाधानासाठी आम्ही हे सन्मानपत्र आपणास सादर करीत आहोत. यात मातृसेवा संघाचा इतिहास उमटल्यासारखा आहे हे आम्ही जाणून आहोत. पण मातृसेवा संघ, कमलाताई होस्पेट किंवा वेणूताई नेने यांच्यात अभेदच असल्यावर हे व्हायचेच.*

*आपल्या विनित,*
*माजी विद्यार्थिनी*
*मातृसेवा संघ, नागपूर.*

*नागपूर :*
*दि. १६ ऑक्टोबर १९७२.*

सीताबर्डी सूतिकागृहाच्या स्थापनेच्या वेळी कमलाबाई पंचवीस वर्षांच्या होत्या. मातृसेवा संघाच्या सुवर्णमहोत्सवाचे वर्ष हे त्यांच्या अमृत महोत्सवाचे वर्ष होते.

संस्थेत आजीव सेवक म्हणून काम करणाऱ्या वेणूताई नेने यांचा अमृत महोत्सव कमलाबाईंनी उत्साहाने साजरा केला. सावित्रीबाई मटंगे यांच्या अमृतमहोत्सवाला त्या वेणूताईंना घेऊन दिल्लीला गेल्या व तिथे त्यांनी स्वतःच्या हाताने सावित्रीबाईंच्या आवडीचे पदार्थ करून त्यांना खाऊ घातले व छानशी भेट दिली. १४ फेब्रुवारी १९६६ ला नानासाहेबांची पंचाहत्तरावीही त्यांच्या विरोधाला न जुमानता कमलाबाईंनी धडाक्यात साजरी केली. संस्थेची घटना लिहिणारे तपोधन जाजूजी व संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई गाडगीळ यांचेही अमृत महोत्सव कमलाबाईंनी संस्थेत साजरे केले. शांताबाई गोखले यांची एकसष्टी मंत्रजागर करून साजरी केली. नंतरच्या काळातही संस्थेत कार्यकर्त्यांची एकसष्टी किंवा अमृत महोत्सव होतच राहिले. परंतु हे सर्व करण्यात पुढाकार घेणाऱ्या कलमाबाईंचा एकसष्टावा किंवा पंच्याहत्तरावा वाढदिवस मात्र साजरा झाल्याची कुठेही नोंद सापडली नाही. त्यांच्या नातेवाईकांना किंवा परिचितांना याबाबत विचारले असता कोणालाही काही सांगता आले नाही. बहुदा कमलाबाईंनी त्यांचे असले बेत हाणून पाडले असावेत असे वाटते.

## मातृसेवा संघ व मोहनी कुटुंबीय :

मातृसेवा संघाचे 'सीताबर्डी सूतिकागृह' नावाने १९२१ साली कमलाबाईंनी लावलेले रोपटे चांगलेच रुजले-वाढले आणि फोफावलेही. २५-३० आजन्म सेविकांबरोबरच संपूर्ण मोहनी कुटुंबही त्याच्या वाढीसाठी झटत होते.

'सीताबर्डी सूतिकागृह' सुरू झाले त्यावेळी कमलाबाई जेमतेम पंचवीस वर्षांच्या होत्या. त्यांच्या दोघी सहकारी वेणूताई नेने व सावित्रीबाई मटंगे त्यांच्यापेक्षा थोड्या मोठ्या तरी तरुणच होत्या. सावित्रीबाई मटंगे त्यांच्या मुलांसह आईच्या आधाराने घरीच राहत होत्या. पण वेणुताई व कमलाबाई सूतिकागृहातच राहायच्या व त्यांच्या सोबत म्हणून कमलाबाईंचे धाकटे बंधू पुरुषोत्तम ऊर्फ दाजी तिथेच झोपायला असायचे. या क्षणापासून मोहनी कुटुंबाचा मातृसेवा संघाशी जो संबंध जोडला गेला तो कमलाबाईंच्या मृत्यूनंतरही कायम राहिला. मातृसेवा संघाच्या समोरच विदर्भ साहित्य संघाची इमारत होती. विदर्भ साहित्य संघातील मंडळी गंमतीने मातृसेवा संघाचा शॉर्ट फॉर्म म्हणजे **M. S. S.** म्हणजे मोहनी सेवा संघ आहे असे म्हणत. एका अर्थाने मोहनी सेवा संघ म्हणजे मोहनींनी समाज सेवा करायसाठी चालवलेला संघ असाही त्याचा अर्थ होतो आणि तो शब्दशः खरा होता.

कमलाबाईंचे तीन क्रमांकाचे ज्येष्ठ बंधू नानासाहेब हे तत्कालीन मध्यप्रांताच्या शिक्षण खात्यात डेप्यूटी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्स या पदावर होते. त्यांना राव बहाद्दुर ही इंग्रज शासनाची उच्च पदवीही होती. त्यामुळे शासनाच्या उच्च वर्तुळात त्यांची उठबस होती. सूतिकागृहासाठी सरकारी अनुदान मिळविताना या ओळखीचा निश्चितच उपयोग व्हायचा. १९४६ ला नानासाहेब सेवानिवृत्त झाले. १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले. तेव्हा सूतिकागृहासाठी जागा मिळवायची खटपट सुरू होती. तेव्हाचे अन्न मंत्री दादासाहेब पाटील कमलाबाईंना म्हणाले, 'तुमची कामे करण्यात आम्हाला निश्चितच आनंद आहे. परंतु घरी गेल्यावर आम्हाला तुमच्या कामाचा विसर पडतो, तेव्हा आम्हाला अंकुश लावायला तुम्ही एखादा माणूस नेमा'. नुकत्याच सेवानिवृत्त झालेल्या नानासाहेबांना हे काम करण्याची कमलाबाईंनी गळ घातली आणि नानासाहेबांनी हे काम केले. त्यानंतर एकामागून एक अशी सरकार दरबारची कामे निघत गेली व नानासाहेब ती कामे करू लागले. जोपर्यंत विदर्भ महाराष्ट्रात सामील नव्हता तोपर्यंत नागपूर ही मध्यप्रांताची **(C. P. & Berar)** राजधानी होती. त्यामुळे सचिवालयात जाऊन कामे करणे सोपे होते. नानासाहेब उच्च पदावरून निवृत्त झालेले असल्याने त्यांच्या ओळखीही होत्या. त्यामुळे कामे सहज होत असत.

पुढे नागपूर महाराष्ट्रात गेले आणि संस्थेच्या कामासाठी मुंबईला जाणे भाग पडू लागले. कमलाबाईंजवळ रेल्वेचा पास होता. त्या पासवर अटेंडंट म्हणून त्यांच्याबरोबर नानासाहेब जात असत. सेवानिवृत्त होईपर्यंत आपल्या लवाजम्यासह फर्स्टक्लासने प्रवास करणारे नानासाहेब बहिणीसाठी अनरक्षित थर्डक्लासच्या डब्यातून प्रवास करू लागले. मुंबईच्या सचिवालयात तासन्तास कारकुनांपुढे उभे राहू लागले व त्यांनी केलेली उपेक्षाही सहन करू लागले. परंतु हळूहळू कमलाबाईंनी आपल्या नेहमीच्या शिरस्त्याने कोणाला तिळगूळ देऊन, कोणाला लाडू देऊन, कोणाच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करून सर्वांना आपलेसे केले व तिथेही कामे लवकर होऊ लागली. नानासाहेब मातृसेवा संघाच्या सल्लागार समितीवर होते. मातृसेवा संघाची घटना त्यांचे स्नेही ॲड. कृष्णराव जाजू यांनीच तयार केली होती.

नंतरच्या काळात मातृसेवा संघाने सूतिकागृहाव्यतिरिक्त जे प्रकल्प सुरू केले त्यामागे नानासाहेबांचीच जास्त धडपड दिसून येते.

कलमाबाईंचे द्वितीय क्रमांकाचे ज्येष्ठ बंधू हरीपंत ऊर्फ तात्या हे भारताच्या स्वातंत्रलढ्यात सहभागी होण्यासाठी आजन्म अविवाहित राहिले होते. काँग्रेसचे कार्यकर्ते असल्याने त्यांचा अनेक मोठ्या लोकांशी संबंध होता. संपूर्ण भारतात ते प्रवासही करीत. सुरुवातीला स्वातंत्रलढ्याच्या अनुषंगाने त्यांनी कमलाबाईंना मदत मागितली आणि आपल्या निधड्या स्वभावधर्माला जागून कमलाबाईंनी ती केलीही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मातृसेवा संघाचे काम हे आपलेच काम मानून ते कमलाबाईंना मदत करू लागले. तात्यांना दूरदृष्टी होती. त्यामुळे कमलाबाई थकल्यानंतर हे काम कोण करणार असा त्यांच्यासमोरील प्रश्न होता. त्यासाठी ते काँग्रेसच्या कामासाठी परगावी गेले की बारकाईने शोध घेत. अशाच एका मुक्कामी त्यांची सत्यबाला तायल या तरुणीशी गाठ पडली. अतिशय बुद्धिमान, धडाडीची आणि समाजसेवेसाठी अविवाहित राहण्याचे ठरविलेली ही तरुणी होती. त्यांनी तिला नागपूरला येण्याविषयी विचारले आणि ती आलीही. याच सत्यबाला तायल यांनी पुढे समाजकार्य महाविद्यालयाची स्थापना केली व १९८५ ते ९६ पर्यंत मातृसेवा संघाच्या अध्यक्षा म्हणूनही काम केले.

सरकार दरबारी होऊ शकणाऱ्या अनेक कामांसाठी कमलाबाईंना जसे मुंबईला जावे लागे तसेच दिल्लीलाही जावे लागे. दिल्लीला त्या त्यांची भाची चंपा वऱ्हाडपांडे (नानासाहेबांची मुलगी व प्रख्यात लेखक आणि तत्त्वचिंतक नि. र. वऱ्हाडपांडे यांची पत्नी) हिच्याकडे उतरत. दिल्ली स्टेशनवर पोचल्यावर त्या चंपाताईंना फोन करीत की मला घ्यायला तुझा नोकर बहाद्दुर याला सायकलवरुन पाठव. वास्तविक चंपाताई स्वतः कार घेऊन यायला तयार असायच्या. पण निष्कारण पेट्रोल खर्च करायला कमलाबाईंचा विरोध असायचा. जुन्या कपड्यांचा हातानी शिवलेला होल्डॉल हातात

धरुन व एक शबनम पिशवी खांद्याला अडकवून त्या बहाद्दुरच्या सायकलवर बसून जायच्या. पण कधीकधी दोनचार वृद्ध स्त्रियांना दिल्ली दाखवायला म्हणून घेऊन जायच्या. अशा वेळी त्यांना दिल्ली दाखवायची जबाबदारी बहाद्दूरची असे आणि त्याच्या कामाचा चार्ज कमलाबाई घेत. दिल्लीतील सचिवालयात कागदपत्रे सोपवण्याचे काम कलमाबाई करीत. पण पुढे ते काम पूर्ण व्हावे म्हणून पाठपुरावा करण्याची जबाबदारी चंपाताईंची असे. ह्याच चंपाताईंनी नंतरच्या काळात मातृसेवा संघाच्या सचिवपदाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली.

कमलाबाईंची दुसरी भाची प्रा. इंदुमती देशमुख हीसुद्धा मातृसेवा संघाची सक्रिय कार्यकर्ती होती. 'मातृसेवा' हे संघाचे मुखपत्र काढण्यात आणि चालविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. कार्यकारिणीतील सदस्यापासून सचिवापर्यंत अनेक महत्त्वाच्या पदांचा पदभार त्यांनी सांभाळला.

तत्पूर्वी नानासाहेबांची पत्नी सुशीलाबाई यांनी मातृसेवा संघाचे अध्यक्षपद भूषविले होते. अर्थात केवळ शोभेसाठी त्यांना अध्यक्षपद बहाल केलेले नव्हते. अनेक महत्त्वाच्या योजना कार्यान्वित करणे व संस्थेसाठी निधी संकलन करणे ही कामे त्यांनी अत्यंत उत्साहाने पार पाडली.

संस्थेसाठी लागणाऱ्या साहित्याचे मुद्रण व छपाई ही कामे त्यांचे धाकटे बंधू पुरूषोत्तमराव करीत. त्यांचे चिरंजीव दिवाकरराव तर पडेल ते काम करायला तयार असत.

कलमाबाईंची मोठी बहीण थेरगांवकरांकडे दिली होती. त्यांचे व त्यांच्या पतीचे साथीच्या रोगात अकाली निधन झाले होते. त्यानंतर त्यांची चारही मुले मामाकडे म्हणजे मोहनी कुटुंबात राहायला आली. या भाचेमंडळीचे शिक्षण नानासाहेबांनी केले. त्यांचे एक भाजे इंजिनिअर झाले व नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्टमध्ये जबाबदारीच्या अधिकारपदावर होते. मातृसेवा संघाच्या इमारतींचे नकाशे काढण्यापासून ते बांधकामावर लक्ष ठेवण्यापर्यंत सर्व कामे त्यांनी केली. दुसरे भाचे दिनकरराव हे डॉक्टर होते. त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा तर संस्थेला सततच उपयोग होत होता. पण आपली एक भाचेसून पद्मावती हिला विवाहानंतर डॉक्टर होण्यास नानासाहेबांनी प्रोत्साहन दिले व ती डॉक्टर झाल्यावर सूतिकागृहाचे काम सांभाळू लागली. यांची दुसरी भाचेसून विद्यावती हीसुद्धा मातृसेवा संघाचे काम पाहत असे. त्या अनेक वर्षे पंचवटी वृद्धाश्रमाच्या सचिव होत्या.

नानासाहेबांचे एक चिरंजीव अनंत सैन्यात होते. दिल्लीला त्यांचे पोस्टींग असेल तर कमलाबाई त्यांच्या मागेही दिल्ली दरबारातील कामे लावत. लेफ्टनंट जनरल या सर्वोच्च पदावरून ते निवृत्त झाले. नानासाहेब त्यांच्याकडे गेले की त्यांच्या मित्रांना भेटून मातृसेवा संघाची माहिती देत व देणग्या मागत. अनंतराव निवृत्त झाल्यावर

पंचवटी वृद्धाश्रमाकडे जातीने लक्ष देऊ लागले. त्यांच्या प्रयत्नांमुळे मिलीटरीतील एक जीप कमी किमंतीत मातृसेवा संघाला मिळाली.

सूतिकागृह हेच कमलाबाईंचे घर होते. त्यामुळे त्यांचे सर्व नातेवाईक वेळप्रसंगी त्यांना भेटायला तिथेच येत. अशा भेटायला आलेल्या नातेवाईकांना कमलाबाई निःसंकोचपणे सूतिकागृहाची कामे सांगत. मराठीतील सुप्रसिद्ध लेखिका व बंगाली साहित्याच्या अनुवादक वीणा अलासे या कमलाबाईंची धाकटी बहीण गंगा हिची नात. आपल्या लहानपणाच्या हकीकती सांगताना त्या म्हणाल्या, *'आम्ही अनेकदा सुट्ट्यांमध्ये सूतिकागृहात राहायला जात असू. झोपायचे असेल तर जिथे जागा मिळेल तिथे झोपून जायचो. यमूताई स्वतः स्वैपाक करायची. भांडी घासायची. गरज पडली तर आम्हालाही भांडी घासायला लावायची. एकदा एक 'फसलेली' गरोदर मुलगी घेऊन एक गृहस्थ आले व तिला सूतिकागृहात ठेवून निघून गेले. मला बोलावून यमूताई म्हणाली, 'हिला घेऊन जा व तुझ्याजवळ झोपू दे.' सार्वांना सारखेपणानं वागवणं म्हणजे काय हे या प्रसंगाने कळावं.'*

मुळात कमलाबाई उत्सव प्रिय होत्या. त्यांची स्वतःची कसलीच हौसमौज झाली नव्हती. परिस्थितीच अशी होती की कसल्याही हौसेचा मौजेचा विचार त्यांच्या मनात आला नसेल. नंतरच्या काळात जेव्हा थोडे स्थैर्य आले, थोडी आर्थिक सुबत्ता आली तेव्हा आपल्या भाच्या, भाचे सुना व नातवंडे यांचे कोडकौतूक करुन त्यांनी सगळी कसर भरून काढली. त्यांच्या तिघी बहिणी अल्पायुषी ठरल्या तरी बहिणींच्या कुटुंबियांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. चार भाऊ व तीन भावजया, त्यांची मुले हे तर त्यांचेच कुटुंब होते. पुढे हे कुटुंब विस्तारत गेले.

त्यांच्या एका भाच्याची पत्नी सूतिकागृहात प्रसूतिसाठी आली. अतिरिक्त रक्तस्त्राव होऊन तिचे तिथेच निधन झाले. याचा कमलाबाईंना तीव्र धक्का बसणे सहाजिकच होते. त्यामुळे त्यानंतरची भाच्यांची किंवा भाचेसुनांची चारपाच बाळंतपणे त्यांनी घरीच केली. पण लवकरच त्या, त्या धक्क्यातून सावरल्या.

भाचे मंडळींचे विवाह ठरल्यावर केळवण, नंतर डोहळ जेवण, बाळंतपण, बारसे असे सर्व कार्यक्रम त्या हौसेने पार पाडत व तेही सूतिगृहात. या कार्यक्रमाच्या मेजवानीसाठी स्वैपाकघर वापरले जायचे ते सूतिकागृहाचे. असा एखादा कार्यक्रम असला की तिथे राहून नर्सिंगचे प्रशिक्षण घेण्याऱ्या मुलींना त्या दिवशी मेजवानी मिळायची ती पीठलं-भाताची. मुली कमलाबाईंच्या परोक्ष कुरकुरायच्या. क्वचित तेव्हाच्या अधीक्षिकेकडे किंवा डॉक्टरांकडे तक्रारही करायच्या. परंतु प्रत्यक्ष कोणी बोलत नसे. एखाद्या दिवशी जेवणात पिठलं-भात केलेला दिसला की, आज कोणाचं डोहाळ जेवण आहे असा गंमतीचा पण उपरोधिक प्रश्नही विचारायच्या. पण

कमलाबाईंना त्यांचे काहीही वाईट नसे. कारण याच मुलींना सणावारी व विशेषप्रसंगी विविध पक्वान्ने स्वतःच्या हातून बनवून खायला घालण्यातही कमलाबाईचा पुढाकार असे. कमलाबाईंचा सगळ्यात धाकटा भाचा बाळ याचा विवाह झाला तेव्हा त्या पंचवटीला राहत होत्या. बाळच्या लग्नाचा सत्यनारायण त्यांनी तिथे धडाक्यात केला. बाळची पत्नी निर्मला हिचे डोहाळजेवणही त्यांनी हौसेने केले. अशावेळी पंगत जेवायला बसली की त्या कोणालाही माहीत नसलेला एखादा अनवट पदार्थ वेळेवर वाढून सर्वांना आश्चर्य चकीत करायच्या. असे अनेक कार्यक्रम बर्डी सूतिकागृह, महाल सूतिकागृह व पंचवटीत त्यांनी केले.

उन्हाळ्यात बर्डी सूतिकागृहात मागील चिक्कूच्या बागेत त्या आईस्क्रीम पार्टी करायच्या. त्यासाठी पंचवटीहून किंवा गोरक्षणमधून दूध आणले जायचे. हाताने फिरवायच्या आईस्क्रिमपॉटमध्ये आटवलेले केशरी दूध टाकून, भोवती मिठाचे खडे व बर्फ टाकून सर्वजण पाळीपाळीने आईस्क्रीम बनवत. सर्वांना भरपूर आईस्क्रीम खायला घालणाऱ्या कमलाताई पॉटमध्ये चिकटवून राहिलेले आईस्क्रीम तेवढे खायच्या.

एकूण स्वतःचा संसार नसल्याने त्यांनी भावा-बहिणींचे संसार आपले मानले व मातृसेवा संघाचा पसारा भरपूर वाढविल्यावरही तिथेच एखाद्या संसारी स्त्री सारखे जीवनातील छोटे-छोटे आनंदही अनुभवले, असेच म्हणावे लागेल. त्यांच्या भाऊ, भावजया व भाचे मंडळींनीही या कामी त्यांना मनापासून साथ दिली. त्यामुळे मातृसेवा संघ म्हणजे मोहनी कुटुंब व मोहनी कुटुंब म्हणजे मातृसेवा संघ, असे समीकरण कायम झाले. पण असे असूनही या नात्याच्या किंवा आप्तांच्या गुंत्यात कमलाबाई कधीच गुंतून पडल्या नाहीत. सणावारी सुद्धा त्यांनी कधी खादीचीच का होईना पण झुळझुळीत वस्त्रे वापरली नाहीत. दागिन्यांचे तर नावच नकोत. खादीची, बिना काठापदराची जाडीभरडी पांढरी पातळे व पोलकी हाच त्यांचा अखेरपर्यंतचा वेश राहिला व हातसडीच्या तांदळाचा भात, जात्यावर दळलेल्या कणकीच्या पोळ्या किंवा गाकर अन् कच्च्या घाणीचे तेल हेच त्यांचे जेवण राहिले. त्यामुळेच मातृसेवा संघ म्हणजे मोहनी सेवा संघ ही टवाळीही त्यांना कधी विचलीत करू शकली नाही.

# मातृसेवा संघाचे इतर प्रकल्प

१९५६ मध्ये सत्यबाला तायल मातृसेवा संघात आल्या. हरीभाऊंनी त्यांच्यातले गुण ओळखले होते. कमलाबाई साठीला आल्या होत्या. त्यांना मदतीची गरज आहे व त्यांच्या सारखीच धडाडीची, निस्पृह व कष्टांना हार न जाणारी व्यक्ती संस्थेत हवी म्हणून हरीभाईंनी सत्यबाला तायल या पंजाबमधील हिस्सार गावातील तरुणीला निवडले. त्यावेळी त्या विनोबांच्या भूदान चळवळीत काम करीत होत्या. बड्या जमिनदाराच्या घरी त्यांचा जन्म झाला होता. पंजाब विश्वविद्यालयाची बी.ए.ची डिग्री त्यांनी सुवर्णपदकासह मिळविली होती. बी.एड्. केल्यावर त्या समाजसेवेकडे वळल्या. समाजसेवा करण्यासाठी आजन्म अविवाहीत राहायची त्यांनी प्रतिज्ञा केली होती. त्यांचा मूळ पिंड समाजसेविकेचा असला तरी माध्यम वेगळे होते. त्यामुळे सीताबर्डी सूतिकागृहात राहायला आल्यावर त्यांनी तेथे समाजसेवेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला. पुढे त्याचा विस्तार करून १९५८ मध्ये समाजकार्य महिला महाविद्यालय सुरु केले. व या अभ्यासक्रमाला नागपूर विद्यापीठाची मान्यताही मिळाली.

तत्पूर्वी मातृसेवा संघात कुटुंब नियोजन केंद्र, रक्तपेढी, पॅथोलॉजी लेबॉरेटरी आदी प्रकल्प सुरू झाले होते. पण त्यांचा संबंध सूतिकागृहाशी येत असे. हे समाजकार्य महाविद्यालय मात्र सूतिकागृहाशी जोडता येणे शक्य नव्हते. मातृसेवा संघात असे जे विविध प्रकल्प उभे राहू लागले त्यांना संघाच्या प्रवृत्ती असे म्हणत. असे प्रकल्प सुरू करण्यामागे नानासाहेबांची प्रेरणा असे. एखाद्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळू शकते कळले की नानासाहेब तो प्रकल्प सुरू करता येईल

का याचा विचार करीत व योग्य अयोग्य निर्णय घेऊन कृती करीत. कमलाबाईंचा अशा विविध प्रकल्पांना विरोध नसला तरी त्यात त्यांचे मनही नसे. त्यामुळे त्यांच्या उभारणीत त्यांनी विशेष सहभागही घेतला नाही. याच सुमारास कमलाबाईंची एक भाची उषा (ज्येष्ठ बंधू गोपाळराव यांची कन्या) हिला ऐन तारूण्यात अचानक अंधत्व आले. आपला वेळ चांगला जावा म्हणून तिने आपल्यासारख्या इतर अंध व अपंगांना एकत्र जमवून एक क्लब स्थापन केला. दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सर्वांनी एकत्र जमून गाणी म्हणणे, वाद्य वाजवणे, कविता म्हणणे, गोष्टी ऐकणे, स्वतःचे मनोरंजन करून घेणे इतकेच त्याचे मर्यादित स्वरूप होते. या क्लबला ती नंदनवन क्लब म्हणत असे. या क्लबचे कार्यक्रम मातृसेवा संघातच होत. या क्लबचे रुपांतर अंधविद्यालयात करावे असे नानासाहेबांच्या मनात आले. पण नागपूरमध्ये सरकारी अंध विद्यालय असल्याने सरकारी अनुदान मिळणे शक्य नव्हते. तुम्ही जर दुर्बल मनस्कांसाठी शाळा काढली तर सरकारी अनुदान मिळू शकेल, असे त्यांना सांगण्यात आले व त्यांनी नंदनवन दुर्बल मनस्क विद्यालय सुरू केले. उषा या शाळेत काम करू लागली. या शाळेमध्ये दुर्बल मनस्कांसाठी एक प्रकल्प चालवायला संस्थेत सात लाख रुपयांची मदत अमेरिकेकडून मिळाली. प्रकल्प अधिकारी म्हणून डॉ. कुसुमताई वांकर काम करू लागल्या. उषा शाळेत काम करीत होती. या दोघींना या शाळेमुळे अमेरिकेत जाऊन येण्याची संधी मिळाली. या शाळेत येणाऱ्या दुर्बलमनस्क मुलांबद्दल कमलाबाईंना खूप जिव्हाळा वाटत असे. पूर्वी मातृसेवा संघात त्यांनी अशी काही मुले सांभाळली होती. या प्रकल्पाच्या माध्यमातून ते क्षेत्र विस्तारले गेले व कामाला सुसूत्रता आली.

आपली संस्था दिवसेंदिवस विस्तारते आहे. यामुळे संस्थेतील कार्यकर्त्यांना व कर्मचाऱ्यांना सर्व प्रकल्पांची माहिती व्हावी, वैचारिक आदान-प्रदान व्हावे या दृष्टीने संस्थेने एक मुखपत्र काढावे असे अनेक कार्यकर्त्यांना वाटत होते. त्याकाळी किर्लोस्कर उद्योग समुहाचे ' किर्लोस्कर ' नावाचे मासिक निघत असे. त्याच धर्तीवर १५ ऑगस्ट १९६६ ला मातृसेवा संघाचा पहिला अंक निघाला. हा अंक सायक्लोस्टाईल करण्यात आला होता. परंतु १० नोव्हेंबर १९६६ ला धनत्रयोदशीचा मुहूर्त व पंचवटी वृद्धाश्रमाचा वाढदिवस यांची सांगड घालून मातृसेवा मासिक छापील स्वरुपात प्रकाशित झाले व त्याच्या नियमित प्रकाशनाला प्रारंभ झाला.

सूतिकागृह सुरू केले की त्याला सहाय्यभूत ठरणारे छोटे-मोठे प्रकल्प म्हणजे नर्सेस ट्रेनिंग कॉलेज, रक्त पेढी, कुटुंब कल्याण व सल्ला केंद्र सुरू करण्यास कमलाताई प्रोत्साहन देत. आर्थिक तूट भरून काढण्यासाठी काही ठिकाणी सूतिकागृहे गरजूंना डबे देत. मुले सांभाळत. वर्धेला नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृहही होते. वर निर्देश केलेले हे तीनच प्रकल्प होते ज्यांचा महिलांच्या आरोग्याशी संबंध नव्हता परंतु तरीही कमलाबाईंनी समाजसेवेचा जो वसा घेतला होता त्याच्या कक्षा रुंदावणारेच हे प्रकल्प होते.

कमलाबाईंनी स्वतः पुढाकार घेवुन सुरु केलेला व पाठपुरावा करुण याला बिलेल्या शेवटच्या प्रकल्प म्हणजे पंचवटी वृद्धाकाम.

**पंचवटी -**

कमलाबाईंचे वडील त्यांच्या लहानपणीच निधन पावले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या त्यांच्या आईकडेच जास्त ओढा होता. एक दिवस त्यांची आई त्यांना म्हणाली, यमे तू बाळंतिसाठी आणि लहान मुलींसाठी तर खूप करतेस. म्हाताऱ्या बायकांसाठी काही करता आले तर पहा. आपल्या घरी सगळे चांगले आहे. पण अनेक घरे अशी आहेत की जेथे म्हातारी माणसे म्हणजे अडगळ वाटते. अशा लोकांसाठी तू काहीतरी करावेस असे वाटते. आपल्या मितभाषी स्वभावाला अनुसरून कमलाबाईंनी फक्त होकार भरला. नंतर लगेचच त्यांच्या आईने कायमचे डोळे मिटले.

सिताबर्डी सूतिकागृह सुरू होऊन तीस-पस्तीस वर्षांचा काळ लोटला होता. सुरूवातीपासूनच आजन्म सेविका म्हणून केवळ अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या मोबदल्यात काम करणाऱ्या अनेकजणी वार्धक्याकडे झुकू लागल्या. एक दिवस सामानाची एक पिशवी घेऊन कुठेतरी जायचे होते. तर कमलाबाई डॉ. कुसुमताई वांकरांना म्हणाल्या, 'आणखी एक पिशवी असली तर द्या. सामान अर्धे-अर्धे करून दोन हाताने दोन पिशव्या धरते. म्हणजे तोल सांभाळता येतो.' 'कमलाबाई, आता तुम्ही इतकी दगदग करू नका. तुमचेही वय झाले आहे.' डॉ. वांकर म्हणाल्या. कमलाबाई फक्त हसल्या. पण मग त्यांनी थोडा विचार केला अन् त्यांच्या लक्षात आले- 'अरे ! आपण साठी तर कधीच ओलांडली आहे. आपली कार्यशक्ती मंदावते आहे. पण आपल्यापेक्षा अनेकजणी खूप थकलेल्या आहेत. त्यांची सोय करायला हवी.'

वृद्धापकाळामुळे कष्ट होत नाहीत, सेवा करायला कोणी नाही म्हणून काही महिला कमलाबाईंच्या आश्रयाला सतत येत असत. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. सगळ्यांची सोय सीताबर्डी किंवा महाल सूतिकागृहात होणे शक्य नव्हते. काय करावे या विचारात असतानाच परमेश्वरानेच जणू एक खिडकी उघडून दिली. महालमध्ये राहणारे श्रीमंत राजाबाळ चिटणीस यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांचे निधन झाले. त्यांनी आपल्या इतर मुलींबरोबरच कमलाबाईंना १० हजार रुपये साडी चोळीची भेट म्हणून ठेवली होती. या रकमेत वृद्धाश्रम काढावा असे कमलाताईंच्या मनाने घेतले व त्यांनी त्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या.

प्रथम प्रश्न होता जागेचा. तो प्रश्नही श्रीमंत राजाबाळ चिटणीसांनीच सोडवला. त्यांनी उमरेड रोडवरील स्वतःची तीन एकर जागा, जी रस्त्याला लागून होती ; वृद्धाश्रमासाठी देऊन टाकली. जागा गावाबाहेर शांत, निवांत होती. आवारात मोठी विहीरही होती. परंतु वृद्धाश्रमासाठी हा प्रश्नही राजाबाळ चिटणीसांनीच सोडवला. आपले शेतातील घर काही वर्षांसाठी वापरायची परवानगी त्यांनी दिली आणि लक्ष्मीस्मृती वृद्धाश्रम सुरू झाला.

६ नोव्हेंबर १९६१ पर्यंत दहाबारा कच्च्या बांधकामाच्या बराकीसारख्या खोल्या तयार झाल्या व वृद्धाश्रमाचे दणक्यात उद्‌घाटन झाले. त्यानिमित्त ६ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर असा चौदा दिवसांचा भरगच्च कार्यक्रम कमलाबाईंनी आखला होता. सकाळी काकड आरतीपासून आश्रमातील दिवस सुरू व्हायचा. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, प्रा. नारायण शास्त्री द्रवीड, प्रा. भा. श्री. परांजपे, ग्वाल्हेरच्या कमलाबाई बापट, डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे, प्रा. डॉ. श्रीधरपंत वर्णेकर, डॉ. पटेल यांची संत वांङमय, श्रीकृष्ण चरित्र, भगवद्‌गीता अशा विविध विषयांवर भाषणे, प्रवचने, भजनी मंडळांचे कार्यक्रम अशी विविध कार्यक्रमांची रेलचेल होती. या उद्‌घाटनाच्या समारंभासाठी नागपूरचेच नव्हे तर बाहेरगावचेही अनेक कार्यकर्ते व मान्यवर लोक आले होते. ६ नाव्हेंबरला धनत्रयोदशी होती. यावर्षी कमलाबाईंच्या यजमानांचा मृत्यू होऊन ५० वर्षे पूर्ण झाली होती. दरवर्षी धनत्रयोदशीला त्या मोरावळ्याचा प्रसाद सर्वांना वाटीत. या वर्षी त्यांनी आपला वैधव्यदिन ५० मेहुणे जेवायला घालून व वस्त्रे आणि श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून साजरा केला. सूतिकागृहात राहणाऱ्या दहा वृद्धांना प्रवेश देऊन कमलाबाई स्वतःच तेथे राहायला गेल्या.

कुटुंब नसलेल्या किंवा कुटुंबापासून बाहेर टाकल्या गेलेल्या वृद्धांची महत्त्वाची मानसिक गरज असते ती नातवंडांच्या प्रेमाची. ही बाब लक्षात घेऊन कमलाबाईंनी मातृसेवा संघातली सांभाळायला आणलेली अनाथ मुले किंवा कर्मचाऱ्यांच्या शिक्षणासाठी राहिलेली मुले हळूहळू पंचवटीत स्थानांतरीत झाली. आपल्या कनवाळू स्वभावाला अनुसरून कमलाबाई अधूनमधून इतर अनाथ मुलेही घेवून येत. आई वडिलांना नकोशी झालेली अपंग व दुर्बल मनस्क मुलेही तेथे होती. त्या मुलांना आजी आजोबांचे प्रेम मिळू लागले व आजी आजोबांचीही वेळ चांगला जाऊ लागला.

वरवर हे सगळे आदर्श आणि चांगले वाटले तरी घरादाराला नकोशी झालेली वृद्ध मंडळी अतिशय चिडचिडी, भांडकुदळ असायची. त्यांच्या तक्रारी ऐकायच्या आणि भांडणे सोडवायचे काम कमलाबाई शांतपणे करायच्या. एवढी मोठी व्यवस्था सांभाळायची तर मुलांकडून काम करवून घेणे आवश्यक असे. मुलेही कधीकधी वांडपणा करायची. त्यातली काही तारुण्याच्या उंबरठ्यावर होती. त्यांच्यात आपापसात प्रेमप्रकरणे व्हायची. कमलाबाई यातील प्रत्येक समस्या अतिशय शांतपणे हाताळायच्या. तसाही त्यांचा करारी व्यक्तिमत्त्वाचा धाक होताच. त्यामुळे त्यांच्यासमोर तरी सर्व काही आलबेल असे. त्याही कुठेही गेल्या तरी वासरांच्या ओढीने घराकडे धाव घेणाऱ्या गाईसारख्या वृद्धाश्रमाकडे परत यायच्या. वृद्धाश्रम स्वावलंबी बनणे ही गरज असली तरी ते शक्य नव्हते. वेळप्रसंगी तेथे वृद्ध व मुले मिळून पंच्याऐंशीच्यावर माणसे राहत होती. कितीही काटकसर करायची ठरविली तरी जेवणखाण, कपडालत्ता, वृद्धांचा औषधोपचार, मुलांचे शिक्षण व येणारे पाहुणे ह्या सगळ्यांसाठी महिन्याला आठ ते दहा हजार रुपये खर्च यायचा. काही नियमित देणगीदार मिळाले होते. नानासाहेबांच्या प्रयत्नांनी प्रत्येक वृद्ध व्यक्तीमागे सरकारी अनुदानही मिळू लागले होते. त्यांच्या खटपटीने अनाथ मुलांची संस्था म्हणजे 'फिट पर्सन्स इन्स्टिट्यूट' म्हणूनही संस्थेला मान्यता मिळाली व मुलांसाठीही अनुदान मिळू लागले.

जी तीन एकर जागा वृद्धाश्रमासाठी मिळाली होती तिच्या आश्रमाची इमारत सोडून इतर जागेवर शेती केली जायची. भाजीपाला लावला जायचा. दूधदुभत्यांच्या सोयीसाठी गाई गुरं पाळली जायची. इतवारीतीला धान्य व्यापाऱ्यांना कमलाबाईंनी विनंती केली की, 'धान्य मोजताना खाली सांडलेले धान्य आम्हाला देत जा.' त्याप्रमाणे ते धान्य पाठवीत. ते धान्य व्यवस्थित निवडून स्वच्छ करून वापरले जायचे.

इतके करूनही मातृसेवा संघावर सालिना तीस ते चाळीस हजार रुपयांचा बोजा पडत होता. त्यामुळे सूतिकागृहातील कर्मचाऱ्यांना पगारवाढ देता येईना. कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरू लागली. वृद्धाश्रम बंद करावा असा कार्यसमितीतल्या काहींनी आग्रह धरला. परंतु कमलाबाई आपल्या निर्णयावर ठाम होत्या. ज्या वृद्धांनी आतापर्यंत संस्थेसाठी किंवा समाजासाठी इतकी झीज सोसली, त्यांना वाऱ्यावर सोडणे योग्य नाही, तोटा सोसूनही संस्थेने इतके केलेच पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या मते समाजऋण फेडायचाच हा एक मार्ग होता.

आपल्या मागे वृद्धाश्रमाचे काय होणार हा प्रश्न कमलाबाईंना सतत भेडसावत असे. त्यामुळे त्यांनी एकदा बाबा आमटे यांना बोलावून घेतले. 'वृद्धाश्रम बंद झाला तर इथल्या वृद्धांची तुम्ही काळजी घ्या.' त्या बाबांना म्हणाल्या. बाबा हे कमलाबाईंचे मानसपुत्र. त्यांनी लगेच आपल्या मातेला आश्वासन दिले की, 'वृद्धाश्रम बंद झाला तर चोवीस तासांच्या आत मी सर्व वृद्धांना वरोड्याच्या आनंदवनात घेऊन जाईन.' ही वेळ आली नाही हे सर्वांचे सुदैव.

पंचवटीतील तीनही विहिरी उन्हाळ्यात आटून जात. पाण्याची दुसरी कुठलीच सोय नसल्याने सर्व वृद्धांना महाल व बर्डी सूतिकागृहात हलविण्यात येई. मुलांचे काय करायचे हा प्रश्न जेव्हा निर्माण झाला, तेव्हा मुलांना त्यांच्या आई-वडिलांकडे पाठवून द्या, असे काहींनी सुचविले. त्यावर कमलाबाई एकदम संतापल्या. त्या मुलांना येथे आणताना त्यांना आई-वडील नाहीत असे सांगून आपण मदत मिळविली. आता त्यांना कोणत्या आई-वडिलांकडे पाठवणार ? असा संतप्त सवाल त्यांनी केला. पुढे कार्पोरेशनने पाण्याची सोय करून दिली आणि वृद्धाश्रमाचे दरवर्षीचे तात्पुरते स्थलांतर बंद झाले.

कमलाबाईंना माणसांच्या अडचणीला धावून जाणे हे प्रत्येक वेळी आपले कर्तव्य वाटे. ज्यांना कोणी आपले म्हणणार नाही, राहायला डोक्यावर छप्पर नाही, दोन वेळा जेवायला मिळत नाही अशा अनेकींना त्या संस्थेत घेऊन यायच्या. त्यांच्या राहायची व जेवायची सोय केल्यावर त्यांच्याकडून त्यांच्या लायकीप्रमाणे कामेही करून घ्यायच्या. ज्यांच्या दोन जेवणांची भ्रांत होती अशा व्यक्ती सुरुवातीला मनःपूर्वक कमलाबाईंना साथ देत. परंतु कायद्याच्या भाषेत असे काम करवून घ्यायच्या पद्धतीला वेठबिगारी म्हणतात. शिवाय अशा लोकांचे कान भरणारी

माणसेही आजूबाजूला असत. तुम्ही तुमच्या कामाचे इतके इतके पैसे मागा. अशी फूसही त्यांना लावली जाई. मग अशी माणसे काम तर टाळतच पण पैशांसाठी अडूनही बसत. कमलाबाई त्यांना सरळ निघून जायला सांगत. असे कोणी कोणी निघूनही जाई व बाहेरील जगाचे चटके बसले की मातृसेवा संघात परत येई. कमलाबाई कामाला वाघ होत्या. त्यामुळे कोणी काम सोडून गेले तर त्याची कामे त्या स्वतः करीत.

अनाथ निराश्रित लोकांना त्यांनी कधी फुकटात पोसले नाही. प्रत्येकाच्या शारीरिक क्षमतेनुसार त्यांच्याकडून त्या काम करवून घ्यायच्या. त्या स्वतःसुद्धा झाडण्या-पुसण्यापासून भांडी घासण्यापर्यंत आणि देणग्या गोळा करण्यापासून स्वैपाकापर्यंत सर्व कामे करायच्या. त्यामुळे आश्रितांना कामे सांगण्यात त्यांना संकोच वाटत नसे. अगदी अपंगांनासुद्धा त्या त्यांच्या योग्य काम शोधून द्यायच्या.

वृद्धाश्रमातील इमारतीला जरी लक्ष्मीस्मृती वृद्धाश्रम असे नाव दिले असले तरी त्या त्या परिसराला पंचवटी असे म्हणत. वृद्धापकाळातील एक महत्त्वाची गरज म्हणजे परमेश्वराचे नामसंकीर्तन ! भजन पूजन व देवळात जाणे. प्रभू रामचंद्र हे कमलाबाईंचे आराध्य दैवत होते आणि रामाचे मंदिर पंचवटीत हवे अशी त्यांची जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे त्या स्वतः जयपूरला गेल्या व स्वतःच्या पसंतीने राम-लक्ष्मण-सीता व हनुमान यांच्या सुबक संगमरवरी मूर्ती घेऊन आल्या.

या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करावी म्हणून त्यांनी म. म. बाळशास्त्री हरदास यांना विनंती केली. म. म. बाळशास्त्री हरदास म्हणाले की, मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केली तर दररोज पूजा व नैवेद्य न चुकता करावा लागेल. वास्तविक कमलाबाईंचा कुठल्याही कर्मकांडावर विशेष विश्वास नव्हता. परंतु ‘ मी जिवंत आहे तोवर पूजा व नैवेद्याची सोय बघीन. ’ असे आश्वासन कमलाबाईंनी दिले व म. म. बाळशास्त्री हरदासांनी मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करायच्या समारंभाचे यजमानपद स्वीकारले. या प्रसंगीही कमलाबाईंच्या बंडखोर स्वभावाची चुणुक सगळ्यांना दिसून आली.

झाले असे की, १९६३ च्या गुढीपाडव्याला मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेसाठी होमहवन सुरू झाले. तीन दिवस ते चालणार होते. परंतु बाळशास्त्री हरदासांच्या पत्नी वीणाताई यांची अडचण आली. अशावेळी यजमानाने एकट्याने होमहवन न करता

कार्यक्रम पुढे ढकलावा असा संकेत आहे. परंतु अनेक मोठी मंडळी जमली असताना कार्यक्रम पुढे ढकलणे कमलाबाईंना योग्य वाटले नाही. तुम्ही एकट्याने सर्व करा, अशी त्यांनी म. म. बाळशास्त्री हरदास यांना विनंती केली व कार्यक्रम ठरल्याप्रमाणे पार पडला.

पंचवटी हे कमलाबाईंचे शेंडे फळ होते. त्यामुळे त्यांचे सर्व लक्ष तिथेच केंद्रीत झाले होते. महालात, बर्डीवर किंवा धरमपेठेतल्या मोहनी बंगल्यावर जरी त्या गेल्या तरी रात्रीच्या मुक्कामाला पंचवटीत पोहोचायच्या. खरेतर पंचवटी वृद्धाश्रम नागपूरच्या बाहेर दिघोरी नावाच्या गावाला होता. जायला पक्का रस्ता नव्हता. रस्त्यावर दिवे नव्हते. रात्रीच्या वेळी रिक्षावाले तिकडे यायला तयार नसत. परंतु प्रसंगी चार-पाच मैलांची पायपीट करूनही कमलाताई तेथे पोहचत.

वृद्धाश्रमात वृद्धांसाठी गाद्या, पलंग अशा सोयी असल्यातरी कमलाबाईंना साधी खोलीही नव्हती. व्हरांड्यात ठेवलेल्या बाकावर हाताची उशी करून किंवा स्वैपाक घराच्या जमिनीवर उशाला पाट घेऊन त्या आडव्या व्हायच्या व क्षणात घोरायला लागायच्या. खाण्यापिण्याच्या बाबतीतही त्या स्वतःच्या संबंधात अतिशय निष्काळजी होत्या. हातावर थोडेसे काही घेऊन खाल्ले की झाले जेवण. वृद्धांसाठी आश्रमात डॉक्टर येत. कमलाबाईंनाही अनेकदा छोटी मोठी दुखणी होत. परंतु आश्रमातील वैद्यकीय सेवेचा उपयोग स्वतःसाठी न करून घेता त्या महालातील डॉ. भोयर यांचे होमीओपॅथी किंवा आयुर्वेदाचे औषध घेणे पसंत करत.

वृद्धाश्रमाचे काम मनापासून करीत असल्या तरी एखाद्या घारीसारखे त्यांचे लक्ष सर्वच सूतिकागृहांकडे असे. प्रत्येक सूतिकागृहाच्या बैठकींना त्या आवर्जून हजर राहात. त्यांच्या कामाची चौकशी करत. योग्य सल्ला देत. कर्मचाऱ्यांच्या बदल्या करत. गावातील योग्य व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना कार्यकारिणीवर घेत. व संस्थेच्या कामात त्यांचा सहयोग मिळवत. वयाची पासष्टी उलटून गेल्यावरही सत्तरी गाठल्यानंतरही ही कामे पंचवीशीतल्या तरुणीला लाजवेल अशा उत्साहाने त्या करत होत्या.

**माहेर संमेलन-**

पंचवटी आश्रमात रामरायाच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा मंगल सोहळा होमहवन इत्यादींसह विधीपूर्वक करण्यात आला होता. त्या निमित्ताने श्री. बाळासाहेब पळशीकर व बाळशास्त्री हरदास यांच्यासह अनेकांची रामरायावर प्रवचने, कीर्तने वगैरे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे खंजिरी भजनही त्या निमित्ताने प्रथमच पंचवटीत आयोजित करण्यात आले होते. या निमित्ताने कोकणातल्या देवरुखपासून करेलीपर्यंतच्या सर्वच शाखांमधील सेविका व व्यवस्थापिका आल्या होत्या. इतर क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्या भगिनींनाही कमलाबाईंनी आवर्जून बोलावले होते. कार्यक्रम धार्मिक असला तरी त्यातून समाजसेवेचे धडे सर्वांनी घ्यावेत, त्या करीत असलेल्या समाजसेवेच्या कार्याला अधिक गती यावी, अधिकाधिक आयाम लाभावेत असे कमलाबाईंना वाटत होते. त्यामुळे त्यांनी तेथे जमलेल्या सर्वांनी परस्परांचा परिचय करून घ्यावा व आपल्या कामाची माहिती सर्वांना करून द्यावी, अशी कल्पना मांडली.

सुरुवात करायला कोणीच येईना. तेव्हा कधीही भाषणे न देणाऱ्या कमलाबाईंनीच सुरुवात केली. ‘माझ्या विवाहाने मला काय दिले ? माझे हे नाव व वैधव्य,’ त्या शांतपणे म्हणाल्या, ‘मी विधवा झाले नसते तर चारचौघींसारखा संसार केला असता. माझे बंधू नानासाहेब यांनी वैधव्यानंतर मला सासरच्या घरातून बाहेर काढले नसते तर मी तिथेच घरातील कामे करीत शेवटचा श्वास घेतला असता. तेव्हा मी जे काही करू शकले त्याचं सारं श्रेय माझ्या वैधव्याला आहे.’

त्या दिवशी प्रथमच कमलाबाई स्वतःबद्दल मोकळेपणाने बोलल्या. त्यांचे ऐकून मग अनेक जणी बोलायला पुढे सरसावल्या व आपण कमलाबाईंच्या संपर्कात कशा आलो व एकदा त्यांच्याजवळ आल्यावर कशा त्यांच्या होऊन बसलो हे हिरिरीने सांगू लागल्या. त्यापैकी अनेकींनी तेथे येणे हे माहेरी येण्यासारखे वाटले असा आवर्जून उल्लेख केला व ज्याला सामाजिक कार्यकर्त्यांचे संमेलन असे कमलाबाई म्हणत होत्या त्याचे ‘माहेर संमेलन’ असे नामकरण झाले.

माहेर म्हटले की प्रत्येक स्त्रीच्या मनात एक प्रेमळ विश्वासू जग आकारू लागते. संसाराच्या रोजच्या धकाधकीतून दोन दिवस निश्चिंतपणे विश्रांती देणारी

हक्काची जागा, जिथे मनात येईल ते बोलता येईल अशी निर्वेध जागा म्हणजे माहेर. हा माहेराविषयी वाटणारा भाव कमलाबाईंच्या सहवासात असताना अनेकजणी अनुभवत होत्याच. त्यामुळे माहेर संमेलन हा अनेकांच्या आनंदाचा ठेवा ठरला. परंतु निश्चिंत मनाने येथे या, खा, प्या, गप्पा मारा, हवी तेव्हा विश्रांती घ्या, स्वतःच्या मनातले सल इतरांना सांगून त्यांच्या वेदना कमी करा, इतकी मर्यादित अपेक्षा कमलाबाईंची मात्र या संमेलनाकडून सुरुवातीपासूनच नव्हती. चौथ्या संमेलनात त्या म्हणाल्या, 'दरवर्षी संमेलन होते. आपण वर्षभर काय केले याचा अहवाल देता येईल असे कार्य झाले पाहिजे. करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. सगळी स्वच्छता नोकरांवर का अवलंबून असावी, मुलांच्या तंत्राने वागून त्यांच्याच बाबतीत गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण करून ठेवणे ह्या व इतर समस्या आहेत यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.' त्यानंतरच्या पाचव्या संमेलनात त्या म्हणाल्या, 'दरवर्षी मी तेच ते सांगते कारण मला तेच ते वाटते म्हणून. संमेलनामुळे माझे मनोगत अनेक भगिनींपर्यंत पोहचते. ही संस्था स्त्रियांची आहे व त्यांनी ती जबाबदारी आपली आहे असे मानावे. मला एकदा विचारण्यात आले, तुमच्या मागे किती जणी आहेत. माझ्या मागे साखळीप्रमाणे भगिनी उभ्या आहेत असे मला उत्तर देता आले नाही. संस्थेचे स्वरूप बाजारी होऊ नये ही माझी विवंचना आहे. संस्थेचा कारखाना होऊन त्याचे घरपण नाहीसे होते आहे. कोणतेही काम तळमळीने, जिव्हाळ्याने करावं असं शिक्षण आम्हास दिल जाई. त्याची आजही आवश्यकता आहे.'

कुमारी मातांच्या समस्या सर्वांसमोर मांडल्या. 'मी स्वतः आता म्हातारी झाले आहे. त्यामुळे या समस्येकडे संपूर्ण लक्ष द्यावे असे ठरविले आहे.' असे त्या म्हणाल्या, 'दरवर्षी निदान बारा तरी कुमारी माता माझ्याकडे 'सुटका' करून घेण्यासाठी येतात. व या मातांच्या मुलांचे पालनपोषण करावे असे मला जरी वाटत असले तरी इतरांना ते एक 'ओझे' वाटते.' ही आपली व्यथाही त्यांनी बोलून दाखविली.

दहाव्या संमेलनात वृद्धांच्या समस्यांचा त्यांनी पुनरुच्चार केला. 'दहा वर्षात आपण काय केलं ? बसलो, बोललो. सुखदुःख मोकळेपणानी सांगितली का ? परिचय वाढविला का ? आपल्यापुढे अनेक समस्या आहेत. आपण कामाची आखणी करावी. मनाशी आढावा घ्यावा. आईबापांना मुलं बाहेर काढतात. लोक म्हणतात, तुम्ही पंचवटी आश्रम काढला म्हणूनच मुले आईबापांना बाहेर काढतात. पंचवटीने

जबाबदारी शून्यता वाढत असेल तर आश्रमाला कुलूप लावावे लागेल.' ह्याच प्रसंगी त्यांनी आपल्या जवळ वाढविलेल्या दोन मुलींची जबाबदारी स्वीकारण्याचे लोकांना आवाहनही केले आणि त्याला प्रतिसाद देत दोघींनी त्या मुलींचे पालकत्वही स्वीकारले.

ह्या माहेर संमेलनाचे फलित काय ? असा प्रश्न विचारला तर त्याची अनेक उत्तरे समोर येतात. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने कमलाबाईंना 'बोलते' केले. कमलाबाईंचा भर सुरूवातीपासूनच बोलण्यापेक्षा कामावर होता. कोणाला एखादे काम सांगायचे झाल्यास त्या स्वतः ते काम करायला घेत. आपल्याला काम करताना पाहून इतरांनी ते आपणहून करावे, अशी त्यांची अपेक्षा असे. परंतु वाढत्या वयाबरोबर व बदललेल्या परिस्थितीत या अपेक्षेमागील फोलपणा त्यांना जाणवू लागला असावा. शिवाय सहकारी भगिनींचा व कार्यकर्त्यांचा आग्रहही मोडता येत नसावा. व त्यामुळे कमलाबाई या संमेलनात स्वतःचे मत मांडू लागल्या. तत्पूर्वी त्यांना 'नलवा मेडल' मिळाले होते. नंतर 'पद्मश्री'सुद्धा मिळाली. प्रत्येक प्रसंगी अनेक संस्थांनी त्यांना सत्कार स्वीकारण्याची विनंती केली होती. परंतु त्यांनी कधी सत्कार स्वीकारले नाहीत व त्यामुळे त्यानिमित्ताने कधी भाषणबाजीही केली नाही. त्यामुळे माहेर संमेलनाने त्यांना बोलते केलं असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरू नये.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ज्या काळात युरोप-अमेरिकेत 'स्त्री वादाचे' वारे वाहू लागले, त्या काळात कुठल्याही तत्त्वज्ञानाचा उदो उदो न करता, स्वतः कोणतीही तात्त्विक भूमिका न स्वीकारता, स्वतःच्या मनाला जे वाटले व जे पटले ते कमलाबाई निर्भयपणे करीत गेल्या. ज्या काळात ब्राम्हण विधवेने नर्सिंग शिकणेच मुळात मान्य होत नव्हते, त्याकाळात त्यांनी स्वतः ट्रेनिंग घेतले. जातीभेदाला त्यांच्या सूतिकागृहात स्थान नव्हते. त्यांच्याकडे कपडे धुण्याचे काम करणाऱ्या धोब्याच्या मुलीलाही त्यांनी नर्सिंगचे प्रशिक्षण देऊन कामावर ठेवले होते. सूतिकागृहात त्यांनी अनेक अनाथ बालकांना व कुमारी मातांना आश्रय दिला. पण तो देताना कधी जात विचारली नाही, हे जसे खरे आहे, तसेच या गोष्टींचा त्यांनी कधी जाहीर गवगवाही केला नाही. त्यांच्या मनात मनात स्त्री मुक्तीच फक्त नव्हती तर 'मानव मुक्ती' होती. पण तिची प्रकट वाच्यता 'माहेर संमेलने' सुरू होईपर्यंत कधी त्यांनी केली नाही. विविध माहेर संमेलनात मात्र निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत प्रसिद्ध भगिनींना बोलावून त्यांची मते मांडण्यासाठी एक चांगले व्यासपीठ त्यांनी उपलब्ध करून दिले. महिलांच्या

जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी या निमित्ताने त्यांनी अनुताई लिमये, वं. मावशी केळकर, अनसुयाबाई बजाज, यमुनाबाई जाजू, मालतीबाई थत्ते, चंद्राताई किर्लोस्कर, साधनाताई आमटे, इंदिराबाई पाटणकर, विद्या बाळ, आभाबेन देशपांडे, प्रा. ताराबाई शास्त्री, प्रमिलाताई दाणी, विमलाताई बेहेरे, लीलाताई चितळे, ताराताई सावंगीकर, अनुताई भागवत, मीरा खडक्कार, दमयंती पांढरीपांडे यांच्यासारख्या अनेक भगिनींना बोलावले.

दरवर्षी दोन विषयांवर वाद विवाद व परिसंवाद होत असत. वाद विवाद व परिसंवादाच्या विषयांमध्ये तत्कालीन जिव्हाळ्याच्या प्रश्नांबरोबरच सार्वकालिन प्रश्न चर्चेला घेतले जात. 'पुरुषांच्या औदर्यामुळेच स्त्रियांची उन्नती झाली आहे.' 'सध्याच्या परिस्थितीत वृद्धाश्रमाची आवश्यकता', 'सुशिक्षितांचे विस्कटलेले संसार', 'माझ्या जीवनातून मी घेतलेला शोध व बोध', शिक्षणानेच माता सुमाता होते काय ? 'लग्नसमारंभ, उत्सव इत्यादिंना लागलेले अनिष्ट वळण', संसारात स्त्रीला घ्यावी लागणारी माघार हे यश की अपयश ?, 'आजच्या युवतींच्या मनातील शल्य', 'स्त्री संस्था आणि समाजकार्याची नवी दिशा' यासारख्या विषयांवर संमेलनात परिसंवाद, वादविवाद झालेले आढळतात.

या संमेलनाचे स्वरूप उत्सवी असले तरी फक्त तसे राहू नये यावर कमलाबाईंचा कटाक्ष असे. संमेलनाला बोलावताना त्या महिला कोणत्या पक्षाशी, संस्थेशी किंवा संघटनेशी बांधील आहेत हे कमलाबाई पाहात नसत. फक्त त्यांच्या कर्तृत्वाचा विचार करूनच त्यांना संमेलनात बोलावले जाई. त्यामुळेच स्वतः गांधीवादी असूनही राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका वं. मावशी केळकर व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनाही कमलाबाई बावर्जून बोलावित.

बहुतेक सर्व कार्यकर्त्या या प्रत्यक्ष फील्ड वर्कर्स असत. त्यामुळे त्यांना दोन दिवस शारीरिक विश्रांती मिळावी, साधे पण सुग्रास भोजन मिळावे यावर कमलाबाईंचा कटाक्ष असे. निरोप द्यायच्या वेळी त्या प्रत्येकीला मुरड करंजी स्वतःच्या हाताने द्यायच्या. सासरी निघालेली कन्या मुरडून मुरडून माहेराकडे पाहत पुढे पावले टाकते. पण हातातली मुरड करंजी हे पुढीलवर्षी परत यायचं आमंत्रणच असते. माहेर संमेलन हे समाजसेवेच्या सासरी रमणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोलाचे विश्रांती स्थळ ठरले ते कमलाबाईंच्या सर्वसमावेशक विशाल मातृत्वामुळे.

*

# कमलाबाईंचे व्यक्तिमत्त्व

कमलाबाईंचा जन्म झाला तो एका फौजदाराच्या म्हणजे पोलीस खात्यात अधिकारपदी असलेल्या व्यक्तीच्या घरी. त्यांचे वडील फौजदार होते म्हणजे त्या पदाला अनुसरून काही गुण त्यांच्यात होते, उदा. कडक शिस्त, रुक्ष स्वभाव इ. त्याच गुणांचा वारसा कमलाबाईंनाही मिळाला असावा. कुठल्याही आनंदाच्या प्रसंगाने त्या कधी हुरळून जात नसत, तर दुःखाच्या प्रसंगाने खचूनही जात नसत. खूप बोलणे त्यांना आवडत नसे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा अनेक सहृदांनी त्यांच्या आठवणी लिहून दिल्या. मातृसेवा मासिकाने 'कमलाताई होस्पेट' विशेषांक काढून त्यात या आठवणींचा समावेश केला आहे. त्या व्यतिरिक्त त्यांच्या भाच्या, भाचे, भावांची व बहिणींची नातवंडे, मातृसेवा संघातील डॉक्टर्स, कर्मचारी यांनीही त्यांचा स्वभाव विशेष प्रकट करणाऱ्या आठवणी सांगितल्या. त्यातल्या निवडक आठवणींद्वारे कमलाबाईंच्या स्वभावावर व व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न येथे केला. या सर्वच आठवणी आहेत. त्यात कालाच्या नोंदीही नाहीत किंवा क्रम ठरवून लिहिलेल्या नाहीत. एकच आठवण दोघा-तिघांनी सांगितल्यावर तपशीलात फरक आहे; हेही जाणवत होते. त्यामुळे तपशीलापेक्षा त्यातून प्रकट होणाऱ्या व्यक्तिमत्त्वाकडे व गुणविशेषांकडे येथे जास्त लक्ष दिले आहे.

## लौकिक व्यक्तिमत्त्व :

कमलाबाईंची उंची जेमतेम चार फुट दहा इंच होती. मधोमध भांग पाडून त्या केसांचा आंबाडा घालीत. केसही फारसे लांब नसावेत. प्रथमपासूनच त्या पांढरी पातळे वापरीत होत्या. खादी-ग्रामोद्योगाचे व्रत घेतल्यावर खादीची बिना काठापदराची जाडीभरडी पांढरी पातळे व खादीचे पोलके हाच त्यांचा वेष झाला. दागिनेही त्यांनी कधी वापरले नाहीत. सावित्रीबाई मटंग्याच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाला जेव्हा त्या

दिल्लीला गेल्या तेव्हा त्यांचासमोर सावित्रीबाईंच्या सुनेने त्यांना सोन्याच्या बांगड्या व गोफ दिला 'आतापर्यंत तुम्हाला काहीच द्यायला जमले नाही. जन्मभर तुम्ही फक्त कष्ट केलेत'. इत्यादी गौरवपर उद्‌गार त्यांच्या सुनेने काढले. त्यावर ' घाला, सावित्रीबाई आता हे दागिने घाला, ' असे कमलाबाई उपरोधाने म्हणाल्या, अशी आठवण इंदुमती देशमुख यांनी कमलगंध या पुस्तकात नोंदवून ठेवली आहे. एकूण काय दागिनेच काय, चांगल्या कपड्यांचेही त्यांना कधी आकर्षण वाटले नाही. अगदी राष्ट्रपती भवनात पद्मश्री स्वीकारायला जातानाही त्या त्यांच्या नेहमीच्या पांढऱ्या, जाड्याभरड्या, बिनकाठपदराच्या पातळात गेल्या. त्या जिथे राहायच्या, त्या बर्डी किंवा महाल सूतिकागृहात व नंतर पंचवटीलाही अनेकदा त्यांना स्वतःची खोली नसायची. इतकेच काय गादी, अंथरूण, पांघरूणही असेलच याची खात्री नसायची. शेवटी त्यांच्या नातेवाईकांनी व परिचितांनी पैसे जमवले व पंचवटीत त्यांच्यासाठी छोटीशी कुटी बांधली व कमलाबाईंच्या आई-वडिलांची स्मृती म्हणून तिचे ' राधाकृष्ण कुटी ' असे नामकरण केले. पण ' हे विश्वचि माझे घर ' हा ज्ञानेश्वरातल्या एका ओवीचा चरण ज्यांनी अंगी बाणवला होता, त्यांना या कुटीचे काय विशेष वाटणार ?

## मोठेपणाचे दडपण नाही :

सूतिकागृहाला मोठमोठ्या व्यक्तींनी भेटी द्याव्यात असे कमलाबाईंना नेहमीच वाटे. त्यांचे बंधू नानासाहेब मोहनी हे उच्चपदस्थ सरकारी अधिकारी असल्याने अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना सूतिकागृह दाखवायला घेऊन येत. दुसरे बंधू हरीभाऊ मोहनी तर स्वातंत्र्य सैनिक. त्यामुळे अनेक मोठमोठे नेतेही सूतिकागृहात येऊन जात. कस्तुरबा गांधी, पिलु मोदी, यदुनाथ थत्ते, विनोबा भावे, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, रविशंकर शुक्ला, मंगलदासजी पक्वासा यासारखे अनेक आदरणीय नेते सूतिकागृहात येऊन कमलाबाईंच्या हातचा पाहुणचार घेऊन गेले.

एकदा नागपूरला सानेगुरूजी आले होते. पण कार्यबाहुल्यामुळे त्यांना सूतिकागृहासाठी वेळ काढता येणे शक्य झाले नाही. शेवटी रात्री दहा वाजता कमलाबाई त्यांना घेऊन सूतिकागृहात आल्या. ' आता इथे जेवून झोपा ', कमलाबाईंनी त्यांना विनंती केली. कमलाबाईंचा आग्रह डावलणे गुरुजींना शक्य झाले नाही व एका आजन्म ब्रह्मचाऱ्याला सूतिकागृहात मुक्काम करावा लागला.

दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता कमलाबाईंनी नर्सेस ट्रेनिंग कोर्सच्या सर्व मुलींना उठवले व पहाटे त्यांच्या प्रार्थनेच्यावेळी गुरुजींचे त्यांच्यासमोर व्याख्यान झाले.

नागपूरला काँग्रेसच्या बैठकीसाठी आलेल्या जवाहरलाल नेहरूंसकट अनेक नेत्यांना त्यांनी स्वतः स्वयंपाक करून वाढले आहे. अशा मोठ्या माणसांच्या मोठेपणाचे त्यांच्यावर कधीही दडपण येत नसे.

## दिवसाचे महत्त्व :

आर्वीच्या सूतिकागृहात डॉ. अण्णासाहेब देशपांडे हे डॉक्टर म्हणून कार्यरत होते. २५ नोव्हेंबर १९७४ ला त्यांचे दुःखद निधन झाले. त्यावेळी डॉक्टरांच्या पत्नी व इतरांचे सांत्वन करायला कमलाबाई स्वतः येऊन गेल्या. त्यानंतर आर्वी शाखेच्या सचिव, श्रीमती अभ्यंकर यांना कमलाबाईंनी सांगितले की, डॉक्टरांच्या छायाचित्राचे अनावरण त्यांचा वर्षश्राद्धाच्या दिवशी, त्यांचे स्नेही व वर्ध्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांतसंघचालक श्री. अप्पाजी जोशी यांचे हस्ते करा.

अप्पाजी जोशी यांनीही ते मान्य केले. परंतु नंतर मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे ते त्या दिवशी हजर राहू शकणार नाहीत असे कळले. तेव्हा पुढे जेव्हा अप्पाजींचे जमेल तेव्हा अनावरण समारंभ करू असे सर्वांनी ठरविले. परंतु डॉ. अण्णाजी देशपांडे यांच्या वर्षश्राद्धाच्या आदल्या दिवशीच कमलाबाई आर्वीत पोचल्या. सर्वांना वाटले त्या श्राद्धालाच आल्या आहेत. परंतु सकाळी त्या अभ्यंकरांच्या घरी गेल्या आणि विचारले, ‘ आज डॉक्टरांच्या छायाचित्राचा अनावरण समारंभ करावयाचा आहे ना ? ’ त्यावर श्रीमती अभ्यंकर म्हणाल्या., ‘ आज अप्पाजी जोशी येऊ शकणार नाहीत, म्हणून कार्यक्रम पुढे त्यांच्या सोयीने घ्यावे असे वाटते.’

‘ नाही. कार्यक्रम आजच झाला पाहिजे.’ कमलाबाई म्हणाल्या.

‘ पण फोटो नागपूरला मोठा करायला दिला होता तो तयार आहे. पण अजून आला नाही. शिवाय इतर तयारीही काहीच नाही.’

‘ सर्व तयारी होऊ शकते.’ कमलाबाई म्हणाल्या आणि त्यांनी सर्वांना कामाला लावले. नागपूरला फोन करून कृष्णाताई भावे यांना फोटो घेऊन यायला सांगितले. आर्वीतील प्रसिद्ध डॉक्टर, रिटायर्ड सिव्हिल सर्जन, डॉ. भातकर यांना प्रमुख पाहुणे

म्हणून बोलावले. सर्व निमंत्रणे पाठविली. कृष्णाताई भावे तीन वाजता नागपूरहून फोटो घेऊन आल्या व चार वाजता फोटोचा अनावरण समारंभ डॉक्टर भातकरांच्या हस्ते पार पडला.

कोणत्याही समारंभाचे महत्त्व, त्या विशिष्ट दिवशीच असते व एकदा एखादी गोष्ट करायची ठरविली की, ती वेळेतच केली पाहिजे, यावर कमलाबाईंचा कटाक्ष होता आणि ती पार पाडण्यासाठी लागणारे दृढनिश्चयाचे भांडवलही त्यांच्याजवळ भरपूर होते.

## मुलींची योग्यता :

एक दिवस भर दुपारी कमलाबाई महाल शाखेतून बाहेर पडल्या व रिक्षात बसल्या. इतक्यात एक वृद्धा तिथे आली व त्यांना नमस्कार करून म्हणाली, ‘ ताई सूनबाईला तिसरीही मुलगीच झाली.’ तिची व्यथा तिच्या शब्दांतून तीव्रतेने प्रकट झाली होती. परंतु कमलाबाई तिला करारी आवाजात म्हणाल्या, ‘ मग त्यात काय बिघडलं ? अहो, माझ्या आईला मी मुलगी झाले म्हणून बरं नाही का झाले. तुम्हीसुद्धा तुमच्या आईला मुलगी म्हणून झालात. त्यामुळे दुसऱ्याच्या घराला घरपणा आला. मुलगी होणे काय कमीपणाचे आहे ? अहो, मुलीच जास्त समजदार अन् प्रेमळ असतात. पंडित नेहरूंना नाही का एकटी इंदिरा ?’ ती बाई अगदी अवाक् झाली. तिच्या मनातील शंका, कुशंका, किल्मिषे, जळमटे सगळे कमलाबाईंनी अगदी धुवून काढले व मोजक्या शब्दात तिला मातेची महती पटवून दिली.

तत्पूर्वी या घटनेला समांतर अशी घटना कमलाबाईंची भाची कुसुम हिच्या बाबतीत घडली होती. कुसुम ही कमलाबाईंची बहीण गंगाबाई हिची मुलगी. गंगाताईच्या अकाली निधनानंतर कमलाबाईंनीच लहानाची मोठी केलेली. कुसुमला लागोपाठ दोन मुली झाल्या. त्याही कमलाबाईंच्या सूतिकागृहात ! त्यामुळे तिसऱ्या बाळंतपणासाठी त्यांनीच कुसुमला वर्धेच्या सूतिकागृहात पाठवले. पण तिसरीही मुलगीच झाली. कुसुमचे चौथे बाळंतपण मात्र त्यांनी केले नाही. माझ्या हातून मुलगीच होईल- म्हणून नको असा काहीसा विचार असावा. पण चौथी मुलगीच झाली. या चौथ्या मुलीचे बारसे मात्र कमलाबाईंनी स्वतःच केले आणि तेही खूप धडाक्यात. मुलीचे नाव माणिक ठेवले. आज हिच माणिक आपल्या वृद्ध आईची देखभाल करून कमलाबाईंना मुलींबद्दल जो विश्वास वाटत होता, तो सार्थ ठरवित आहे.

मुलींचे महत्त्व जाणत असलेल्या कमलाबाईंच्या या ‘वागण्याचे’ समर्थन कसे करायचे ? शेवटी कितीही बुद्धिनिष्ठ व्यक्ती असली तरी अगदी जवळच्या व्यक्तीच्या संदर्भात ही बुद्धिनिष्ठा गळून पडते असेच म्हणावे लागेल.

## टी.सी.शीही मैत्रीपूर्ण संबंध :

कमलाबाई पंचवटीत राहायला आल्या तेव्हा मातृसेवा संघाची शेवटची शाखा राजस्थानातील करेली गावी सुरू होऊन तीन वर्षे झाली होती. काही शाखा चांगल्या चालत होत्या तर, काही खूपच तोट्यात. कुठे कुठे बाळंतिणींची संख्या भरपूर असायची तर कुठे कुठे सूतिकागृह रिकामे असायचे. कुठे कुठे जागा कमी भाड्यात आणि चांगली असायची तर कुठे कुठे जागेचाही प्रश्न असायचा.

शाखा सुरू करताना कमलाबाई गावातील प्रतिष्ठित व श्रीमंत लोकांना भेटलेल्या असायच्या. स्थानिक कार्यकारीणीत गावातील प्रतिष्ठित व सुशिक्षित महिलांना आवर्जून घ्यायच्या. परंतु तरीही प्रत्येकाच्या समस्या असायच्याच व त्या सोडविण्यासाठी कमलाबाईंना तिथे प्रत्यक्ष धाव घ्यावी लागायचीच. त्यातून कधी कधी खूप गमतीदार प्रसंग घडायचे. त्याचे व्यक्तिमत्त्व निस्वार्थी, त्यागमय व सेवाभावी होते. त्यामुळे बोलण्या-वागण्यात एक प्रकारचे तेज समोरच्याला आपोआपच जाणवे. व ती व्यक्ती आवाक् होऊन शांतपणे त्यांचे ऐकून घेई व वेळोवेळी मदतीचा हातही पुढे करी. शरयू धोत्रे यांनी लिहिलेला असाच एक प्रसंग त्यांच्या शब्दात.

*“एकदा हिंगणघाटात सूतिकागृहाचा काही कार्यक्रम होता. मलाही घेऊन जावं म्हणून वर्ध्याला बजाजवाडीत त्या आल्या. तोवर पॅसेंजरची वेळ होऊन गेली होती. फक्त जी.टी.च होती. मी म्हटले, ‘मग कसं पोचणार आपण.’ तर म्हणाल्या, ‘तू तयार हो. मी तुझ्या पोळ्या करते तोवर. स्टेशनवर जाऊन बघू कुठली गाडी मिळते ती.’ त्यांच्याशी वाद घालण्याची सोयच नसे. मी बापडी तयार होऊन त्यांच्याबरोबर स्टेशनला आले. पॅसेंजर निघालेली. आता जी.टी.ची वेळ होत आलेली. प्लॅटफार्मवर पोचेतो जी.टी.ने शिट्टी दिली. ‘हं बायकांच्या डब्यात चढ लवकर.’ मी चढले. त्याही चढल्या. टी.सी.ला सांगयचे तर तोही दिसेना. गाडी सुरू होताच त्या आपल्या चक्क झोपल्या. मी आपली जीव मुठीत धरून आता पुढे काय होणार या विवंचनेत बसून राहिले. थोड्या वेळात टी.सी. आला. मला तिकीट विचारले. मी यमुनाताईकडे बोट दाखविले. मुलगेलासाच होता. त्याने यमूनाताईंना उठवून तिकीट*

*विचारले. यमूनाताई म्हणाल्या, 'तुम्ही जी.टी.ला हिंगणघाटची तिकीट देता का तो नाही म्हणाला, तर या म्हणतात, 'मग मी कोठून तिकीट देणार ?' मला हिंगणघाटला जाणं तर जरूर आहे.' तो हे ऐकून सर्दच झाला. यमूनाताई निश्चिंपणे झोपून गेल्या. हिंगणघाटला तो टी.सी. दुसऱ्या टी.सी.ला घेऊन आला. त्यांनी आल्याबरोबर यमुनाताईंना नमस्कार केला व म्हणाला, 'काय कमलाबाई, हिंगणघाटला तर सूतिकागृह काढलेत, मग आमच्या गावी कधी काढणार ? 'हा संवाद चालू राहिला. त्या पहिल्या टी.सी. चा चेहरा गमतीदार झाला होता."*

## माणसे जोडणेच फक्त मी जाणते :

आर्वी शाखेत डॉ. टी. एन. देशपांडे हे काम करायचे. १९७४ मध्ये त्यांना हृदयविकाराचा झटका आला व दोन महिने नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये रहावे लागले. त्यानंतरही त्यांना फारसे काम करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी कमलाबाईंना दुसरा डॉक्टर नेमण्याची विनंती केली. त्यावर कमलाबाई म्हणाल्या, 'जेवढे होईल तेवढे तुम्ही करा. माणसे जोडणेच फक्त मी जाणते. तोडणे नाही.'

शेषराव भुरे नावाचे एक ड्रायव्हर मातृसेवा संघात काम करीत होते. काही कुरबूर झाली म्हणा किंवा त्यांना जास्त पगार हवा होता म्हणून म्हणा, ते कमलाबाईंना सोडून मेडिकल कॉलेजचे डीन बर्वे यांच्याकडे नोकरी करू लागले. मातृसेवा संघात परत यायला त्यांनी नकार दिला. नंतर डॉ. बर्व्यांची नागपूरहून बदली झाल्याचे कळल्यावर कमलाबाई पुन्हा शेषरावांना भेटल्या व त्यांना मातृसेवा संघात परत घेऊन आल्या. प्रसंगी त्या कर्मचाऱ्यांना रागवत असत परंतु एकदा ज्याला आपला म्हणत, त्याला अंतर देणे त्यांना मंजूर नसे. अशा प्रसंगी त्या स्वतःकडे कमीपणा घेऊनही माणसांना सांभाळत.

अकोल्याच्या सुधाताई डोंगरे यांनी कमलाबाईंची सांगितलेली आठवणही अतिशय हृद्य आहे. कमलाबाईंचा व सुधाताईंचा प्रत्यक्ष परिचय नव्हता. सुधाताई १९३९ पासून अकोल्यातल्या शारदा समाजाच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. १९७१ मध्ये त्यांच्यावर पुत्र निधनाची कुऱ्हाड कोसळली. सर्व संवेदना बधीर झाल्या. कुठल्याच कामात रस वाटेना. त्यांनी शारदा समाजाचे काम तर सोडलेच. पण घरातही त्यांना काही करावयासे वाटत नव्हते. अशावेळी कमलाबाई त्यांच्याकडे पोचल्या. पूर्वपरिचय नसतानाही एकदम स्वयंपाकघरात गेल्या व स्वतःच पाट घेऊन खाली बसल्या. सुधाताई ताक घुसळत होत्या, त्यांच्या हातातले ताकाचे भांडे घेवून म्हणाल्या, 'मी करते

ताक. तुम्ही भाजी चिरा किंवा दुसरे कुठले काम असेल तर करा.' ताक करून झाल्यावर त्यांचे लक्ष स्वैपाक घरात वरती ठेवलेल्या पितळेच्या फुलपात्रांकडे गेले.

'तुम्ही आता वापरत नसाल?' त्या म्हणाल्या.

'घालू पुढे कधी तरी मोडीत.' सुधाताई चटकन म्हणाल्या.

'द्या इकडे आमच्या नंदनवनाकरता,' त्या म्हणाल्या.

सुधाताई लिहितात, "त्यांच्या शब्दाला इतकी प्रतिष्ठा होती. मला अण्णासाहेब कर्वे, रमाबाई रानडे यांच्या चरित्रातील उदाहरणे मनात येऊन गेली. त्या कोण, नंदनवन काय मला काही माहित नसता मी ती बारा भांडी दिली बाई त्यांना. चहा घेणार का विचारले, तर चहा नको, ताक द्या म्हणाल्या. मी ताक दिले. मला वाटले, उठतील त्या आता. पण नाही. त्या विचारू लागल्या, 'काय उद्योग करता हल्ली?' माझ्या डोळ्यात पाणी. मी ते हळूच पुसले व सांगू लागले, '१९३९ सालापासून मी आमच्या शारदा समाजात जे काय करता येईल ते केले. समाजाची मोठी थोरली इमारत सर्वांनी मिळून उभी केली व आता वाटू लागले, नव्या पिढीने आता काम करावे. आपले काम संपले.'

त्या एकदम म्हणाल्या, 'काम कधी संपत नसतं. इथं आमची मातृसेवा संघ नावाची संस्था आहे. तेथे खूप काम आहे. मला सौ. लीलाताईने सर्व सांगितले व म्हणून मी तुम्हाला बाहेर काढायला आले. घर सुटले आहे का? जेवणखाणं करावंच लागतं ना? तसच समाजाचं ऋण आपण असेतो फेडतच राहिलं पाहिजे.'

शेवटी सुधाताईंना दुपारी मातृसेवा संघात यायला सांगून त्या गेल्या. सुधाताई दुपारी गेल्यावर कमलाबाईंनी त्यांना कार्यकारणीच्या सदस्य तर करून घेतलेच पण त्यांच्यावर अकोला शाखेच्या हिशोबाची पूर्ण जबाबदारीही सोपविली. माणसांच्या बाबतीत कमलाबाई रत्नपारखी होत्या. आणि अवतीभोवतीच्या समाजातून अशी रत्ने उचलून त्यांना संस्थेच्या कोंदणात बसविणाऱ्या कुशल कारागीरही होत्याच होत्या!

## खिलवण्याचा षौक :

एकदा हिंगणघाट शाखेला भेट द्यायला गेल्या होत्या. काम आटोपल्यावर त्या शाखेच्या कार्यकर्त्या विमलाताई घरोटे यांच्याबरोबर रेल्वे स्टेशनवर आल्या. स्टेशनवर आल्यानंतर कळले की गाडी चार तास लेट आहे. स्टेशनमास्तरांनी त्यांना घरी चलून

विश्रांती घेण्याचा सल्ला दिला, पण त्या त्यांच्या घरी गेल्या नाहीत. उलट त्यांनाच त्यांचा स्टोव्ह आणि पातेली आणून द्या म्हणून सांगितले. विमलाताईंना सूतिकागृहात शेवया व साखर आणावयास पाठविले. एका परिचारिकेला दूध आणायला पाठवले. सगळे साहित्य गोळा करून त्यांनी प्लॅटफॉर्मवरच शेवयाची खीर तयार केली. एव्हाना काय चालले आहे हे पाहायला आणखी काही माणसे कुतूहलाने जमा झाली. कमलाबाईंनी स्टेशनमास्तरांच्या घरातूनच वाट्या मागवल्या व जमलेल्या लोकांसह सगळ्यांना खीर दिली. स्वतः फक्त अर्धा वाटी खीर खाल्ली. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर मात्र असीम तृप्ती पसरली होती.

## आजी आणि नातू :

सर्व दीन दुःखितांचा कमलाबाईंनीच जणू काही पत्कर घेतला होता. धंतोलीत शांता नावाची एक तरुण विधवा राहत होती. कोणीतरी भरीला घातले आणि तिचा पुनर्विवाह अमरावतीच्या एक गृहस्थांशी झाला. लग्नानंतर लक्षात आले की त्यांची पहिली पत्नी जीवंत होती व त्यांना टी. बी. झाला होता. मुळात वैधव्याच्या आगीत होरपळलेल्या शांतावर हा जबरदस्त आघात होता. तशात तिला एक मुलगाही झाला. या शांताबाईंना कमलाबाईंनी आश्रय तर दिलाच, नर्सिंगच्या कोर्सला प्रवेशही दिला आणि छोट्या रमेशला हॉस्टेलमध्ये राहायची परवानगी नसतानाही तशी परवानगी दिली. तिचे क्लासेस असत तेव्हा कमलाबाई रमेशला सांभाळत. प्रसंगी स्वतः बाहेर घेऊन जात. या शांताबाई सब्जीवाले नंतर मातृसेवा संघाशी कायम जोडल्या गेल्या. कमलाबाईंनी जिथे जिथे नोकरीला पाठविले तिथे तिथे त्या गेल्या. पण या सगळ्या फिरस्तीत रमेश हाताबाहेर जाऊ लागला. ना त्याचे अभ्यासात लक्ष होते ना शाळेत नियमित जाता होता. कमलाबाईंचे अशा गोष्टीकडेही बारीक लक्ष असे. त्यांनी शांताबाईंना रमेशला बर्डी सूतिकागृहात पाठवायला सांगितले. त्याप्रमाणे रमेश बर्डीला आला. डॉ. वसंतराव वांकर त्यावेळी ऑफिसमध्ये होते. राहायला जागा व दोन वेळचे जेवण यावर रमेश मातृसेवा संघात पडेल ते काम करू लागला. कमलाबाई त्याला अनेकदा आपल्याबरोबर दौऱ्यावर नेऊ लागल्या. हे रमेश सब्जीवाले आजही पंचवटीच्या वृद्धाश्रमात राहतात. त्यांनी कमलाबाईंच्या अनेक हृद्य आठवणीं सांगितल्या. ते म्हणाले, "मी नागपूरला आलो, ते अर्धी चड्डी व शर्ट अशा वेषात. आजी (कमलाबाई) मला दौऱ्यावर न्यायची. बरोबर कपडे वगैरे घ्यायचा प्रश्नच नसायचा. गाडी एखाद्या नदीकाठी थांबली (त्या काळात वाफेवर चालणारी इंजिन्स होती. त्यात पाणी भरण्यासाठी

गाड्या नदीच्या पुलावर थांबत) की आजी स्वतः पटकन् आंघोळ करून यायची. स्वतःच पातळ धुवायची व गाडीच्या खिडक्यांना बांधून वाळवायची. ती माझ्या मागे लागायची. जा पटकन आंघोळ करून ये म्हणून ! मला खूप भीती वाटायची की आपण उतरलो आणि गाडी सुटली तर. मग मी तिला सांगत असे माझ्याजवळ कपडे नाहीत, आंघोळ कशी करू. तरी ती तिचं पातळ देऊन म्हणायची, "हे गुंडाळ. कपडे धुवून टाक. वाळले की घाल." हिवाळ्याच्या दिवसात ती इंजिनमधून गरम पाणी मागून आणायची व आंघोळ करायची. इंजिन ड्रायव्हरला कधी तिळगूळ तर कधी लाडू तर कधी करंजी असा खाऊ देऊन ती दोन बादल्या पाणी मिळवायची. ते डब्यात आणायचे काम मात्र मी करत असे.

आजीला रेल्वेचा पाच जणांचा पास मिळाला होता. एकदा ती चार म्हाताऱ्या बायकांना दिल्ली दाखवायला म्हणून घेऊन गेली. दिल्लीला सावित्रीबाई मटंग्याकडे उतरली. लगेच स्वैपाकघराचा चार्ज स्वतःकडे घेऊन मला भाजी आणायला पाठवले. आजी अशी कामे सांगी. पण त्यासाठी पैसे देत नसे. पैसे मागितले की तिला खूप राग यायचा."

या रमेश सब्जीवालेंचा विवाह कमलाबाईंनीच पंचवटी वृद्धाश्रमात राहत असलेल्या सरस्वती नावाच्या अनाथ मुलीशी करून दिला. लग्न झाल्यावर दोघांना संसारपुरती भांडीकुंडी, सामान शिधा सगळं देऊन वृद्धाश्रमातच एक खोली देऊन त्यांचा संसार थाटून दिला. दुर्दैवाने पहिल्याच दिवशी त्यांचे सगळे सामान चोरीला गेले. पुढे सरस्वतीनेही नर्सिंगचे ट्रेनिंग घेतले व तीसुद्धा मातृसेवा संघात काम करू लागली.

'आजीला आम्ही कायम लहानच वाटत होतो शेवटी डॉ. वसंतराव वांकरांनी मध्यस्थी केली व आम्हाला पायजमे मिळाले.' रमेश सब्जीवाले सांगत होते.

'वृद्धाश्रमात भांडणे फार होत असत, घरदाराला नकोशी झालेली वृद्ध मंडळी एकत्र आल्यावर भांडणे होणारच होती. ती सोडवायला आजीचा उपाय गांधीवादी होता. त्या स्वतःच भांडण झाले की उपासाला बसायच्या. साहजिकच त्यांचे ते उपोषण पाहून भांडणारे वरमून जात व भांडणे बंद होत.

वृद्धाश्रमात आजीला भेटायला अनेक मोठमोठी माणसे येत. आजी स्वैपाक घरात काम करायची. आलेल्या पाहुण्यांना तिथेच पाट टाकून बसायला सांगायची. आणि भाजलेली वांगी किंवा उकडलेले बटाटे सोलायला त्यांच्या पुढे सरकवयाची.

आजीची शिस्तही कडक होती. चार ड्रम पाणी भरल्याशिवाय नास्ता मिळत नसे. जर पाणी भरले नाही तर आमच्याबरोबर आजीही उपाशी राहायची. आमची जेवायची पंगत जमिनीवरच बसायची. वाट्याही नसायच्या. मोठ्या आकाराच्या पोळ्या, भाजी, सोजी आणि वरण येवढेच जेवण असायचे. सणावारी भात, गोडधोड व्हायचे. आम्हाला इतके सगळे देणारी आजी मात्र ताट घेऊन व्यवस्थित जेवत नसे. हातात एक पोळी घेऊन त्यावर थोडी भाजी टाकून खाऊन घ्यायची. कधी नुसतीच भाजी, कधी नुसतीच चटणी, कधी ताक असा तिचा आहार असायचा. मात्र बाहेरून आलेल्या प्रत्येकाला खायला काही ना काही मिळतच असे. पसाभर मुरमुरे किंवा कच्चा चिवडा (पोहे, चुरमुरे, फुटाणे यांच्यावर कच्चं तेल, तिखट, मीठ, कांदा, कोथिंबीर टाकली की झाला कच्चा चिवडा).

पण आजीच्या अशा खाण्यामुळे खुपदा ती आजारी पडायची, अतिसार, आव असा त्रास व्हायचा. पण आश्रमात येणाऱ्या डॉक्टरांचं औषध घ्यायची नाही. महालातल्या डॉ. भोयर यांचे होमिओपॅथीचं किंवा मग आयुर्वेदाचं औषध घ्यायची.' रमेश सब्जीवाले सांगत होते. डोळे मिटलेले होते. पण मन भुतकाळात फिरत होते. त्यांची पत्नी निवर्तल्यानंतर त्यांनी मुलाकडे राहण्यापेक्षा वृद्धाश्रमातच राहणे पसंत केले. तेथे अजूनही पडेल ते काम करून कमलाबाईंच्या सेवाभावाचा वसा चालवत आहेत.

## प्रवासातली सोबत :

एकदा हिंगणघाटहून कमलाबाई नागपूरला यायला निघाल्या तेव्हा त्यांना पोचवायला तेथील सूतिकागृहाच्या व्यवस्थापिका ताराबाई व विमलाबाई दोघी स्टेशनवर गेल्या होत्या. गाडी आल्यावर कमलाबाई ताराबाईंना म्हणाल्या, 'मी विमलाताईंना नागपूरला घेऊन जाते.' कमलाताईंच्या कुठल्याही प्रस्तावाला नाही म्हणायचा प्रश्नच नसे. त्यामुळे ताराबाई विमलाबाईंना म्हणाल्या, 'चढा आता गाडीत.' विमलाबाईंजवळ कपडे-पैसे काहीच नव्हते. तरी त्या आज्ञाधारकाप्रमाणे गाडीत चढल्या. कमलाबाईंना दोनजणांचा प्रथम श्रेणीचा पास होता. त्यावर त्या विमलाबाईंना नागपूरला घेऊन गेल्या. पोहोचायला रात्रीचे दहा वाजले. गेल्या गेल्या त्यांनी स्वयंपाकीणबाईंना बोलावून सांगितले, 'विमलाबाईंना तिखटमिठाचा सांजा फार आवडतो. त्यांच्यासाठी सांजा करा.' सांजा खाऊन झोपेपर्यंत रात्रीचे अकरा वाजले. पहाटे चार वाजता कमलाबाईंनी विमलाबाईंना

उठवले व गाडीत बसवून दिले. आपल्याला कमलाबाईंनी नागपूरला का आणले हे काही विमलाबाईंना कळले नाही. कदाचित प्रथम श्रेणीचा फुकट पास हे कारण असेल. कदाचित विमलाबाईंकडून गप्पांच्या ओघात काही जाणून घ्यायचे असेल.

एकदा पुण्याला सर्व मोहनी कुटुंबीय कुठल्या तरी कार्याच्या निमित्ताने एकत्र जमले होते. तिथे कमलाबाई त्यांच्या सगळ्यात धाकट्या वहिनी सरस्वतीबाई यांना म्हणाल्या, 'चला माझ्याबरोबर.' त्यांनी चला म्हटल्यावर नाही म्हणायची कोणाचीच प्राज्ञा नसे. कोकणातल्या देवरुख नावाच्या गावाला मातृसेवा संघाची शाखा होती. तिथे भेट द्यायला त्या सरस्वतीबाईंना घेऊन गेल्या. सरस्वतीबाईंना अनायसे कोकणचा प्रवास घडला. अनेकांना त्यांनी असे अचानक प्रवासाला नेले. पण ज्यांना आपण बरोबर चला म्हणतो, त्यांच्या काही अडचणी आहेत का, त्यांच्या घरच्यांना विचारायला हवे, असा कोणताही विचार त्या करीत नसत. कपडे, पैसे अशा व्यक्तिगत अडचणींचे निराकरण त्या करू शकत व त्यांचा दरारा इतका होता की त्या कोणाला बरोबर घेऊन गेल्या तरी घरचे कुरकुरसुद्धा करीत नसत.

## ज्यासी अपंगिता नाही :

नागपूरजवळ टाकळी नावाच्या गावाला श्री. भन्साळीजींचा आश्रम आहे. तिथे काही कार्यक्रम असला तर कमलाबाईंना आमंत्रण असे व त्या आवर्जून जातही असत. एकदा त्या आपल्याबरोबर अंध असलेल्या गोरे नावाच्या आजींना घेवून गेल्या. गेल्या गेल्या त्यांनी गोरे आजींना जेवायला दिले. बाथरूमला नेवून आणले व मग अंथरूण टाकून तिथे झोपवून दिले. नंतर नेहमीप्रमाणे त्या स्वैपाकघरात काम करायला गेल्या. थोड्या वेळाने जाहीर कार्यक्रम सुरू झाला. कमलाबाई स्टेजवर होत्या आणि गोरे आजींनी आरडाओरडा सुरू केला. त्यांनी बरोबर आणलेली चांदीची ताटली व पेला दिसत नव्हता. कार्यक्रम संपल्यावर आपण शोधू असे सांगूनही त्या ऐकेनात. 'आधी कमलाबाईंना बोलवा', त्यांनी एकच धोशा लावला. शेवटी एका कार्यकर्तीने कमलाबाईंना स्टेजवर जाऊन काय घडलेय ते सांगितले. कमलाबाईंनी, सेक्रेटरीचे भाषण सुरू होते; त्यांना मध्येच थांबवून लाऊडस्पीकरवरून सांगितले, गोरे आजींचा ताटली-पेला हरवलाय. ज्याला सापडला असेल त्यांनी आणून द्यावा. सेक्रेटरी चक्रावल्या. ताटली-पेला त्यांनीच उचलून ठेवला होता. तसे त्यांनी कमलाबाईंना सांगितले व कार्यक्रम संपल्यावर मिळेल हेही बजावले.

हा सगळा प्रसंग अनेकांना विचित्र वाटला. काहींनी यावर टीकाही केली. परंतु कमलाबाई शांत होत्या. 'तुम्ही त्यांना नेलंतच कशाला ?' असे इतरांनी म्हटल्यावर त्या इतक्याच म्हणाल्या, 'अहो अंध झाल्या म्हणून काय झालं ? एका जागी राहून त्यांनाही कंटाळा येतो.' या संपूर्ण प्रसंगात आपण काही चुकीचे वागलो आहोत असे कमलाबाईंना अजिबात वाटले नाही. त्यांच्या वागण्यात एक प्रकारची हुकूमशाही होती असे अनेक म्हणत. त्यांच्या आडचा करूणेचा झरा इतरांना दिसत नसे असेच म्हणायला हवे.

**मला नको संस्थेसाठी द्या :**

माणसे जोडायची कला कमलाबाईंना चांगलीच अवगत होती. कधी कधी त्या अचानक कोणाच्या घरी जायच्या. आपुलकीने घरातल्यांची विचारपूस करायच्या. त्यांच्या मनाच्या स्मृतिपटलावर आपली प्रतिमा उमटवूनच जायच्या.

एकदा धरमपेठेतील नाफड्यांच्या घरी गेल्या असताना गृहस्वामिनी सुप्रिया म्हणाली, 'थांबा, घरच्या लिंबाच्या झाडाचे लिंबू आणते ताजं ताजं आणि सरबत करते.' त्यावर कमलाबाई सहजपणे म्हणाल्या, 'ताज्या लिंबाचं सरबत देण्यापेक्षा असतील तेवढी लिंबच द्या. वृद्धाश्रमातल्या सर्वांनाच सरबत होईल.'

मेयो हॉस्पिटलमधील क्वार्टर्समध्ये डॉ. बी. जी. ओक राहायचे. त्यांच्याकडे एकदा गेल्या तेव्हा सर्वजण अंगणात खुर्च्या टाकून बसले होते. 'काय घेणार ?' डॉक्टरांनी विचारले. कमलाबाईंचे लक्ष अंगणात ठेवलेल्या डांबराच्या दोन पिंपाकडे गेले. 'हे पिंप देऊन टाका मला. वृद्धाश्रमात पाणी भरायच्या कामी येतील.' त्या म्हणाल्या.

महालातील एका परिचितांकडे गेल्या असता आतल्या खोलीत एक पलंग दिसला. कमलाबाईंनी लगेच चौकशी केली, 'या पलंगावर कोण झोपंत ?'

'आमची मुलगी झोपते कधीमधी.'

'तिला पलंग कशाला हवा ? पाठवून द्या सुतिकागृहामध्ये.' त्यांनी सांगितले व दुसऱ्याच दिवशी तो पलंग सुतिकागृहात आला.

सूतिकागृहासाठी दर महिन्याला ठराविक रक्कम देणारे देणगीदार (त्यांना त्या वर्गणीदार म्हणायच्या) मिळवण्यावर त्यांचा भर होता. तसेच इतर अनुषंगिक मदत कोण करू शकेल याकडेही त्यांचे बारकाईने लक्ष असे. एकदा एका शिवणक्लासच्या वर्गावर त्या गेल्या आणि तिथे शिवण शिकवायला येणाऱ्या मुलींना म्हणाल्या, 'दर महिन्याला एक झबलं-टोपडं आणि जमलं तर एक दुपटंही आणून देत जा सुतिकागृहात!'

नंतरच्या काळात मातृसेवा संघाच्या अध्यक्षा झालेल्या प्रमिलाताई दाणी याच शिवणक्लासमध्ये जात होत्या. त्यांच्यासह अनेकींनी ही मागणी वर्षानुवर्षे पुरवलीच व नंतर मातृसेवा संघाच्या सक्रीय कार्यकर्त्या बनून समाजसेवाही केली.

कोणाकडेही गेल्यावर त्या लोकांच्या उपयोगाची नसलेली व मातृसेवा संघात उपयोगी पडणारी वस्तू त्या निःसंकोचपणे मागत. कारण त्यातले त्यांना स्वतःसाठी काहीच नको असे. स्वतःसाठी त्या अंथरूण-पांघरूणही विकत घेत नसतं. हे कळल्यावर शरयू धोत्रे त्यांना म्हणाल्या. 'मी जुन्या पातळाच्या गोधड्या शिवून दिल्या तर त्या वापराल का ?' कमलाबाईंनी होकार दिला. त्यानंतर शरयू धोत्रे नियमितपणे गोधड्या शिवून देऊ लागल्या. परंतु नवी गोधडी आली की जुनी गोधडी त्या कोणालातरी देऊन टाकायच्या. असंग्रही वृत्तीचे असे उदाहरण क्वचितच सापडेल.

वृद्धाश्रमातील वृद्धांवर व अनाथ अपंग मुलांवर कमलाबाईंचे मनापासून प्रेम होते. त्या प्रेमापोटीही कधीकधी खूप मजेदार प्रसंग उद्भवायचे.

संस्थेच्या कामासाठी त्यांना अनेकदा दिल्लीला जावे लागे. एकदा त्या आपल्याबरोबर सत्तरीच्या पुढच्या चार वृद्ध स्त्रियांना घेऊन गेल्या. त्यांना हरीद्वार, हृषिकेश, बद्रीनाथची यात्रा त्यांनी घडवून आणली. 'कमलाबाई कशाला त्यांना बरोबर आणलंत? काही कमी जास्त झालं म्हणजे?' कोणी हितचिंतक म्हणाले, 'अगदी वाईटात वाईट काय होईल? तीर्थक्षेत्री मृत्यू आला तर जन्माचे कल्याण होईल. करून टाकू तिथेच अंत्यसंस्कार. पण तीर्थक्षेत्री गेल्यांच समाधान तर मिळेल न त्यांना.' कमलाबाई शांतपणे म्हणाल्या.

दिल्लीला सिमला मटर व लाल रंगाची गाजरे मिळत. तशी ती तेव्हा नागपूरला मिळत नसत. एकदा त्या त्यांची भाची चंपा वऱ्हाडपांडे हिला म्हणाल्या, 'मला नागपूरला जाताना एक पोतभर मटारच्या शेंगा व एक पोतभर लाल गाजर घेऊन दे. मी इथे आली की नेहमीच खाते. वृद्धाश्रमातल्या लोकांना कसं मिळणार ?' खाण्याची आणि त्याहीपेक्षा खाऊ घालण्याची हौस असणाऱ्या कमलाबाईंची ही मागणी सहज समजू शकते, पण चहा पिण्यासाठी पोतभर कुल्हडी नागपूरला घेऊन जायचे ठरविणे याला काय म्हणणार ?

एकदा दिल्ली स्टेशनवर त्यांनी मातीच्या छोट्या कपांमधून दिला जाणारा चहा पाहिला. त्या कपांना कुल्हड म्हणतात. लगेच त्यांनी पोतंभर कुल्हडींची ऑर्डर दिली. 'वृद्धाश्रमातील लोकांना यातून चहा पितांना गंमत वाटेल.' त्या म्हणाल्या.

'अग, पण मातीची भांडी ती, नागपूरला जाईपर्यंत फुटून जातील.' चंपाताई म्हणाल्या.

‘मी ठेवीन नं लक्ष.’ कमलाबाई म्हणाल्या.

दिल्ली स्टेशनवर हमालाच्या हातून अलगद पोते डब्यात चढले. पण नागपूरला पोहोचल्यावर तिथल्या हमालाने दण्णकन् पोते प्लॅटफार्मवर आदळले आणि सगळ्या कुल्हडी फुटून गेल्या.

कपाळावर हात ठेवून कमलाबाई मोठ्याने हसल्या फक्त.

मोहनी कुटुंबाचे एक स्नेही होते. जगन्नाथराव गोखले. जगन्नाथरावांनी स्वतःला पूर्णपणे देश कार्यासाठी वाहून घेतले होते. १९४० मध्ये नागपूरला मोहनींकडे आल्यानंतर त्यांचे निधन झाले. त्यांची पत्नी शांताबाई हिला इतर कोणतेही बांधून ठेवणारे पाश नव्हते. त्यामुळे शांताबाई नागपूरलाच राहिल्या व मातृसेवा संघाचे हिशोबाचे काम पाहू लागल्या. कमलाबाईंनी त्यांच्यावर महाल शाखेच्या हिशोबाची व्यवस्था सोपविली. पंचवटीला वृद्धाश्रम सुरू झाल्यावर तिथला हिशोबही शांताबाई पाहू लागल्या. त्यांचे काम इतके चोख होते की एक पैशाचीही अफरातफर कोणाला शक्य नसे. पुढे त्यांनी आपली सगळी संपत्ती संस्थेला दान दिली. त्या दोघांच्या स्मरणार्थ पंचवटीत ‘शांता जगन्नाथ कुटी’ नावाने एक दुमजली इमारत बांधण्यात आली.

या शांताबाईंची एकसष्टी कमलाबाईंनी त्यांच्या स्वभावाला अनुसरून धुमधडाक्यात साजरी केली. ब्राह्मणाला बोलावून मंत्रजागर केला. आप्तेष्टांना जेवायला बोलावले व शांताबाईना तलम खादीचे पातळ घेतले. सर्व समारंभ आटोपल्यावर कमलाबाई, त्यांचे भाऊ-भावजय शांता वहिनींबरोबर गप्पा मारीत बसले होते. बाकी सर्वजण झोपायला निघून गेले होते. इतक्यात फोनची घंटी वाजली. जुन्या स्मृतिंमध्ये गुरफटलेल्या कोणालाच फोन घ्यावासा वाटेना. शेवटी एका विद्यार्थीनीने फोन उचलला.

‘कमलाबाईंना पाठवा लवकर फोनवर.’ पलिकडून आवाज आला.

‘काही महत्त्वाचं काम आहे का? आपण निरोप दिलात तर.......’

‘नाही. नाही. त्यांच्याशीच महत्त्वाचं काम आहे.’

‘काही संकट तर नसेल?’ विद्यार्थीनीने घाबरत घाबरत कमलाबाईंना निरोप दिला. अन् कमलाबाई फोनवर आल्या.

‘हं बोला, काय झालं येवढं मला सांगण्यासारखं?’

'कमलाबाई, तुम्हाला पद्मश्री मिळालीय. मी सर्वात आधी सांगतोय तुम्हाला ही बातमी म्हणजे तुम्हाला बातमी कळवायचा मान माझा हं! अभिनंदन! उद्या सकाळी येतो मी भेटायला.' फोनवर फक्त आपणच बोलतोय आणि कमलाबाई फक्त ऐकताहेत याची जाणीव होऊन ते गृहस्थ थोडे वरमले. पण कमलाबाईंना ही बातमी सर्वात प्रथम आपण सांगतोय याचा आनंदही त्यांच्या शब्दाशब्दातून व्यक्त होत होता.

'अरे, मीच काय बोलतोय सारखा. कमलाबाई काय वाटलं ही बातमी ऐकून ? बोला नं ?'

'काय बोलू ? तुम्ही या सकाळी. रात्र बरीच झालीय तेव्हा झोपा आता.' कमलाबाई म्हणाल्या. संभाषण फोनवर सुरू असल्याने कोणालाच काही कळले नाही व कमलाबाईंही कोणाला काही न सांगता झोपायला गेल्या. एवढा आनंदाचा क्षण. परंतु कमलाबाईंच्या कुठल्याही उक्ती-कृतीतून आपणहून त्याचा उच्चार झाला नाही. आपल्या मुलीचे हे कर्तृत्व पाहायला आज आई असायला हवी होती, असे मात्र त्यांना राहून राहून वाटत होते. दोन वर्षांपूर्वी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचा सर्वोत्तम परिचारिकेचा पुरस्कार त्यांना नलवा मेडलच्या रुपाने मिळाला होता. व्यवसायात मान्यता मिळाल्यानंतर आता राष्ट्रीय पातळीवर त्यांना हा पुरस्कार मिळाला होता. भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते २६ जानेवारी १९६१ ला कलमाबाईंना पद्मश्री मिळाली.

या समारंभासाठी आणखी एकाला सरकारी खर्चाने नेता येणार होते. कमलाबाईंचे नातेवाईकही भरपूर आणि सहकारीही जवळचे. शेवटी जिला प्रत्यक्ष डोळ्यांनी हा समारंभ पाहता येणार नाही अशा भाचीची-उषाची कमलाताईंनी निवड केली.

१९८० मध्ये जमनालाल बजाज प्रतिष्ठानातर्फे त्यांना जानकी देवी अवार्ड मिळाले. हा समारंभही दिल्लीला होता. कमलाबाईंनी दिल्लीला चलावे असा आग्रह जमनालालजींची कन्या मदालबेनने धरला. तेव्हा माझ्याबरोबर माझ्या सहकाऱ्यांनाही घेऊन चला असा आग्रह कमलाबाईंनी धरला. कमलाबाईंचे पायाचे हाड फ्रॅक्चर झाल्याने तेव्हा त्या चालू शकत नव्हत्या. स्वतः मदालबेन त्यांना दिल्लीला घेऊन जाणार होत्या. बरोबर मातृसेवा संघाच्या अध्यक्षा व सचिवही राहणार होत्या. परंतु आणखी दोघींना बरोबर घ्यायचे मदालबेनने मान्य केले तेव्हाच कमलाबाई जायला तयार झाल्या.

पारितोषिक वितरण समारंभात उपराष्ट्रपती हिदायतउल्ला यांनी नेहमीचा परिपाठ मोडून त्यांच्या जागेजवळ जाऊन पारितोषिक दिले. कमलाबाईंचे बंधू नानासाहेब तेव्हा त्यांचा मुलगा लेफ्टनंट जनरल अनंत मोहनी यांच्याकडे होते. त्यांच्याही पायाचे हाड मोडले होते आणि ते अंथरुणावर होते. कमलाबाई काही दिवस त्यांच्याकडे राहिल्या व या मुक्कामातच पंतप्रधान इंदिरा गांधी यांचीही त्यांनी भेट घेतली व त्या नागपूरला परत आल्या.

राष्ट्रीय स्तरावरचे हे तीन मोठे पुरस्कार कमलाबाईंना मिळाले. परंतु कधी त्याचा साधा उल्लेखही त्यांच्या बोलण्यात आला नाही असे त्यांना ओळखणारे सगळेच सांगतात. निष्काम कर्मयोगी यापेक्षा वेगळा तो काय असणार ?

***

# अखेरचा श्वास

नोव्हेंबर १९६३ मध्ये धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर कमलाबाई स्वतः पंचवटीतल्या वृद्धाश्रमात राहायला आल्या. तत्पूर्वीच, वृद्धत्वामुळे शारीरिकदृष्ट्या अक्षम झालेल्या संस्थेच्या आजीव सेविका तिथे मुक्कामाला होत्या. कमलाबाईंनी सांभाळलेली सात-आठ मुले व दोन अगदी तान्ही बालकेही तिथे वस्तीला होती. कमलाबाई एकदा बद्रीनाथ-केदारनाथच्या यात्रेला गेल्या असता, त्यांचे सामान उचलण्यासाठी जगतराम नावाचा गढवाली तरुण मुलगा यायचा. तीन-चार दिवसांच्या सहवासात कमलाबाईच्या व्यक्तिमत्त्वाने अशी काही जादू केली की, त्याने सर्वांबरोबर नागपूरला चलण्याचा आग्रह धरला. मी तुमची सर्व कामे करीन. तुम्ही सांगाल ते ऐकीन. शिकीन. पण मला आता येथे राहायचे नाही, अशी त्याने विनवणी केली व कमलाबाई त्याला घेऊन नागपूरला आल्या. ह्या जगतरामलाही वृद्धाश्रमातील कामांची जबाबदारी सोपवून कमलाबाईंनी पंचवटीत पाठविले होते. आपण स्वतः तिथे राहिल्याशिवाय वृद्धांची व अनाथ बायकांची सोय नीट लागणार नाही हे कमलाबाईंनी ओळखले. बर्डी किंवा महाल सुतिकागृहातील अधिकारी वर्ग ती सूतिकागृहे व मातृसेवा संघाच्या इतर प्रवृत्ती (प्रकल्प) चालवायला सक्षम होते व म्हणून कमलाबाईंनी यापुढे पंचवटीतच राहावे असे ठरविले. या घटनेकडे कमलाबाईंचा वानप्रस्थाश्रम म्हणून पाहता येईल. पण आयुष्याच्या संध्याकाळी केलेले हे स्थलांतर निवृत्तीसाठी नव्हते तर वृद्धाश्रम व अनाथालय यांचे नीट बस्तान बसविण्यासाठी होते.

येथेही सकाळी उठल्याबरोबर अंगण झाडणे, सडा टाकणे, मोऱ्या धुणे, अशी पारोषी कामे त्या उरकत व मगच स्नान करत. रामरायाला हात जोडून संपूर्ण आश्रमात एक फेरी मारत. प्रत्येक गोष्टीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे.

एखाद्या बाईचे पातळ फाटलेले दिसे. मग त्या विचारत, ‘ तुमचे पातळ फाटलेले दिसते. दुसरे काही नाही का ? ’

'आहेत. पुष्कळ पातळं आहेत. आता बदलते.' असे म्हणत ती बाई लगबगीने पातळ बदलायला जाई.

एखादी पाच-सहा वर्षाची चिमुरडी कधी विचारी, 'आजी मी झाडू ? कुठून सुरुवात करु ?' मग कमलाबाई तिला झेपेल अशी झाडायची जागा दाखवत.

समोरुन येणाऱ्या एखाद्या मुलाचे मळके कपडे पाहून त्या विचारत, 'प्रकाश तुझे कपडे धुतलेस का ?'

'हो आजी.'

'साबण लावून ?'

'नाही आजी.' साबण न लावण्याचे कारण त्या ओळखत.

'अरे जगतराम......' त्या हाका मारत.

कुठेतरी कामात असलेला जगतराम धावत-पळत येई.

'जी माजी'

'इसको साबून नहीं दिया ?'

'अभी देता हूँ माजी.' कोठीघराकडे जाणाऱ्या जगतरामच्या मागून प्रकाशही निघून जाई.

पाळण्यातले तान्हे बाळ कधी भुकेने कळवळून रडू लागे. त्याच्याकडे लक्ष द्यायला कोणालाच सवड नसे. मग कमलाबाई स्वैपाकीणबाईला हाक मारुन त्याला घ्यायला सांगत. स्वैपाकाची घाई असलेल्या बाई थोडं दुर्लक्ष करुन जायला बघत. 'आधी त्याला घे.' तीव्र स्वरात कमलाबाई फर्मान सोडत. स्वैपाकीणबाई नाईलाजने मुलाला घेऊन जात. 'जबरदस्तीने आई होता येत नाही. आई व्हायला आईच असायला हवे नाही ?' त्या उपरोधानं म्हणत व जोराने हसत. ही स्वतःशीच मोठ्याने हसायची सवय त्यांना इतक्यात लागली होती. या हसण्यामागे उपरोधाबरोबरच स्वतःच स्वतःवर केलेली उपहासात्मक टीकाही असे. ज्या ठिकाणी राहून स्वतःकडे गमतीने पाहता येईल अशा ठिकाणी त्या आता पोहचल्या होत्या.

स्वैपाकीणबाईना मुलांना सांभाळायला सांगितल्यावर त्या स्वतः उठून स्वैपाकघरात जात. चुलीवरच्या पातेल्यातलं वरण पळीने ढवळीत व पोळ्या करायला जात.

'आजी पान घेऊ ? कोणी विचारी.

'अरे, अजून तर स्वैपाक झालाच नाही. वेळ आहे पानं घ्यायला.'

'आजी, आज मुलांना चौकोनी ताटं देऊ ?'

‘ नको. ती नीट घासता येत नाही ’

पोळ्या झाल्या की कमलाबाई उठत. हात धुवायला ड्रममध्ये तपेली बुडवत. कधी कधी पाणी संपलेल असे. त्या रमेशला सांगत, ‘आधी पाणी भर. त्याशिवाय जेवायला मिळणार नाही.’ रमेश टिवल्याबावल्या करीत खोड्या काढत बसलेला असे. तो दणदण हातपाय आपटत पाणी भरत असे.

त्याचे पाणी भरणे आटोपताच कमलाबाई त्याला एका ताटलीत चिवडा देत. ‘हा खा आणि बर्डीवर जाऊन साखर घेऊन ये. संपलीय सगळी.’ वृद्धाश्रमातील वस्तू संपल्या की कमलाबाई बर्डी नाहीतर महाल सूतिकागृहातून मागून घेत.

‘मला चिवडा नको.’ गाल फुगवून रमेश म्हणे.

‘ठीक आहे. मग तसाच जा. आणि हा चिवडा संपल्याशिवाय तुला दुसरे काहीही मिळणार नाही हे लक्षात ठेव.’ कमलाबाई बजावतात.

कधी काही लोक भेटायला येत.

‘एक जुनाट मंदिराची जागा आहे आई. तुम्हाले द्यायची आहे. आमचा ट्रस्ट करायचा विचार होता. पण आम्ही म्हटले, तुमच्या हाती पडली तं चांगलं होईन म्हणून आलो.’

‘सध्या कोण राहतय तिथं?’

‘साधू डोये महाराज. नुसता फलाहार करतात.’

‘तुम्ही असं करा, तुम्हाला जे करायचंय ते लिहून द्या आणि मोहनींना भेटा. धरमपेठेतले नानासाहेब मोहनी. तेच सगळे व्यवहार बघतात. जागा आपण पाहून घेऊ.’

शहरामध्ये फूटा-फूटाने जागेचे भाव मोजले जातात. आणि इंच इंच जागेसाठी लोक आपसात भांडतात. तिथे ही माणसे कमलाबाईंना आपली मोक्याची जागा द्यायला आली असतात. तेही चार-पाच मैलाचे अंतर पायी तुडवत. परंतु या देणगीने कमलाबाई हुरळून जात नाहीत. त्यांच्या शांत चर्येवर प्रसन्नतेचा हलकासा तरंगही उमटत नाही. त्या आलेल्या माणसांसाठी फराळाचे आणायला सांगतात. कोणी आपल्या घरी आले तर त्यांचा पाहूणचार करण्याची गृहस्थधर्माची रीत इथेही पाळली जाते. चांगले वागणाऱ्या माणसांचे कौतुक करायचे म्हणजे त्यांना चांगले खाऊ घालायचे हा कमलाबाईंचा परिपाठ असायचा.

‘आईची अशीच सेवा घडू दे देवा.’ निघता निघता ती माणसे म्हणतात.

‘काय म्हणालात? कसली सेवा?’

‘आपली सेवा.’

'अस्स अस्सं, म्हणजे तुम्ही आमची सेवा करता.' आणि कमलाबाई हा.....हा. करून मोठ्याने हसल्या. त्यांचे डोळे लख्खकन् चमकले आणि ब्रेक लावल्यासारख्या त्या हसायच्या थांबल्या. स्वतःतच मिटून गेल्या.

शहरातून टेम्पोने मुलांना शाळेत पोहचवणे व घेऊन येणे हे काम मारोती नावाचा ड्रायव्हर करायचा. एखाद्या दिवशी कमलाबाई त्याला विचारीत,

'मारोती, तू घरी गेला होतास?'

'नाही.'

'मग थांब जरा.' त्या म्हणत, 'अरे जवाहर, ते चुरमुरे आण जरा.' त्या सांगत. जवाहरने आणलेल्या चुरमुऱ्यातले पसाभर चुरमुरे त्या मारोतीला देत. मारोती न बोलता त्यांच्याकडे पाहत जायचा व टेम्पोतल्या आपल्या सीटवर बसून चूरमुरे खायचा. या जगात एक तरी माणूस असे आहे, ज्याला आपल्या भुकेची चिंता आहे, या विचारानेच त्याचे पोट तुडुंब भरत असे.

कधी पाच-सहा वर्षाचा संजय त्यांच्याजवळ येई. डोके सफाचट केलेले. नाकातून अविरत शेंबूड वाहत असलेला.

'आजी, मी काय काम करु?' तो निरागसपणे विचारी. या आजीला खुष करायचे असेल तर काम करायलाच हवे, याची जाणीव त्याला इतक्या लहान वयात असे.

'आधी आपला शेंबूड काढ?'

संजय एक दीर्घ श्वास घेऊन, बाहेर जाणारा 'माल' फुर्र फुर्र करीत आत ओढायचा प्रयत्न करी. कमलाबाई उठत आणि बोटांच्या चिमटीत त्याचे नाक धरुन स्वच्छ करत व मग त्याच्या हातात झाडणी देत.

'शेंबुड आवडतो वाटतो तुला! चांगला लागतो खारट खारट होनं? रोज खातोस वाटंत?' त्या म्हणत आणि मोठ्यांनं हसत.

कधी पंचवटीतील वृद्धांची देखभाल करणारे होमिओपॅथीचे शहरात राहणारे एक डॉक्टर येत. शहरात त्यांचा लहानसा दवाखाना होता. तो फारसा चालत नसे. पण ते गृहस्थ मोठ मोठी स्वप्नं पाहत.

'ताई, पुष्कळ दिवसापासून एक गोष्ट करायची मनात आहे. तुम्हाला विचारून करायचे ठरविले आहे. विचारू?'

कमलाबाई हसत चुलीवरचे पातेले उचलून खाली ठेवत. पाण्याचा हबका मारून जाळ कमी करत व त्यांना बसायला पाट देत.

'विचारा.' त्या निर्विकारपणे म्हणत.

'गांधी व कस्तुरबा यांच्या नावाने एक वेगळ्या तऱ्हेचे विद्यालय काढावं.'

'कशासाठी?'

'आज आम्ही सामान्य लोक जिवंत आहोत याचं कारण गांधीजी. अहो, मोठे म्हणणारे लोक इतके स्वार्थी झाले आहेत की काही विचारू नका. अशावेळी मुला-मुलींच्या मनावर त्या महात्म्याची छाप पडावी.......'

'गांधी आणि कस्तुरबा असताना किती छाप पडली?'

कमलाबाईच्या प्रश्नाला बगल देत गृहस्थ बोलू लागत, 'या विद्यालयात कॉटेज इंडस्ट्री, खादी ग्रामोद्योग चालवू. सानेगुरुजी, गांधीजी यांचं वाड्मय कंपल्सरी राहील. नाव बापू विद्यालय.'

त्या गृहस्थांच्या अंगावर मिलचे कपडे असत.

'जनाबाई, ती खाट उचलून ठेवा.' त्यांच्या कपड्यांकडे पाहात कमलाबाई म्हणत, 'दवाखान्यात येतात कुणी ?' कमलाबाईंच्या प्रश्नांने डॉक्टरकी न चालणाऱ्या गृहस्थांच्या ध्येयवादाची गाडी पंक्चर होई. हा मानहानी करणारा नकोसा वाटणारा प्रश्न कमलाबाई का विचारतात असे त्यांना वाटे. काहीतरी गुळमुळीत बोलून ते मुद्यावर येत.

'मग करू का सुरुवात या कामाला ?'

'करा. मी काय करायचं यात ?' कमलाबाई हसत हसत विचारत.

'ती राजेसाहेबांची बिल्डींग-विद्यालयाला पुरेल. चांगली आहे. तेवढी मागून घ्या.' त्यांच्या अंतरीचा हेतू कमलाबाईंच्या लक्षात येई.

'तुम्ही असं करा, एक संस्कार छात्रालय काढा. आणि हो, अजून किती मुली उजवायच्या आहेत तुमच्या?'

'तीन.'

'मग जोडीला एक विवाहमंडळही काढा.'

'ते काढतोच. पण विद्यालयाचा विचार करू का?' कमलाबाईंच्या स्वरातील उपरोध लक्षात न घेता ते डॉक्टर म्हणत.

'तुम्ही काहीही विचार करा. मला विचारता म्हणून सांगते,' कमलाबाई क्षणभर थांबत. विनोद करायची असलेली सुरुसुरी आवरून क्षणभर थांबत व म्हणत, 'जे एक काम घेतलंय तेच पूर्ण करावं. नवीन सतरा भानगडी चिकटवून घेऊ नयेत.' डॉक्टर समजायचे ते समजत व इतर घरगुती बाबी बोलू लागत. नुकतेच कमलाबाईंनी सुचविलेल्या मुलीशी त्यांच्या मुलाचे लग्न झाले होते. नव्या सुनेवर ते बेहद खुष होते.

'तुमची मीरा फार चांगली आहे बरं का. तिच्या सासूबाईंची काहीच तक्रार नाही.' ते म्हणत.

'अहो, थोडी वाट पहा. महिनाच झालाय. नवीन आहे अजून. काही दिवसांनी यांच्या उलट सांगायची वेळ न येवो.' कमलाबाई शांतपणे म्हणत. डॉक्टर फराळ आटोपून त्यांचा निरोप घेत.

एक दिवस मुलांचा आरडा ओरडा ऐकू आला. 'जिजी आल्या. जिजी आल्या.' वृद्धाश्रमात राहणाऱ्या आत्रेबाई काही दिवस मुलाकडे राहून परत आल्या होत्या. याच बाईंनी काही दिवसांपूर्वी संतापाच्या भरात कमलाबाईंच्या थोबाडीत मारली होती. लगबगीने पुढे जाऊन कमलाबाई म्हणाल्या, 'या या, अरे त्यांना देवळातल्या निरांजनाने ओवाळा. आज यांचा वाढदिवस आहे.' नुकत्याच घडून गेलेल्या थोबाडमार प्रकरणाचा मागमूसही कमलाबाईंच्या चेहऱ्यावर किंवा वागण्यात नव्हता.

एक दिवस नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये परिचारिका सप्ताहाच्या समारोपाचा कार्यक्रम होता. कमलाबाईंना निमंत्रण आल्याने त्या टेम्पोतून कार्यक्रमाला गेल्या. सरकारी पारिचारिका प्रशिक्षण केंद्राचा सुवर्ण महोत्सव असल्याने सर्व झगमगाट होता. वातावरण उत्साह पूर्ण होते. कुठल्याही समारंभात स्टेजवर बसणे कमलाबाई टाळत. प्रेक्षकांमध्ये त्या शांतपणे बसून होत्या. कार्यक्रम थाटात पार पडला. संपूर्ण कार्यक्रमात पद्मश्री मिळालेल्या या एकमेव पारिचारिकेचा साधा उल्लेखही कुणी केला नाही. त्यांच्याबरोबर त्यांचे बंधू नानासाहेब होते. त्यांना ही बाब खूपच खटकली. पण कमलाबाईंनी त्याचे काहीच विशेष वाटले नाही.

नानासाहेबांच्या कारमधून त्या सीताबर्डी सूतिकागृहात गेल्या. उभ्याउभ्या तेथील काम आटोपून टेम्पोने महाल सूतिकागृहात गेल्या. महाल सूतिकागृह उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे त्यांना सूतिकागृहाबद्दल जास्त जिव्हाळा वाटे. तेथील कामाचा त्यांनी आढावा घेतला. कडक पोषाखातील नर्सेस चटपटीतपणे पेशंट्सची देखभाल करीत होत्या. कमलाबाईंन पेशंट्ची विचारपूस केली. स्वैपाक घरात एक चक्कर मारली. योग्य त्या सूचना दिल्या आणि तेथून बाहेर पडल्या. बाहेर 'बुधवार बाजार' भरला होता. पंचवटीसाठी त्यांनी तेथून भाजी खरेदी कली. बाजार उठायच्या वेळी भाजी स्वस्त मिळते. वडिलांच्या अकाली निधनामुळे लहानपणी लागलेली काटकसरीची सवय आता वृद्धाश्रमाच्या कामी यायची.

कमलाबाई परतल्या तेव्हा रात्र झाली होती. जेवण आटोपली होती. अंगणात एक बाक होता. आल्या आल्या कमलाबाई बाकावर बसल्या. तिथूनच रामरायाला हात जोडले. आणि बाकावर आडव्या झाल्या. हाताची उशी डोक्याखाली घेतली आणि

क्षणार्धात गाढ निद्रेच्या आधीन झाल्या. संपूर्ण दिवसभर संस्थेच्या कामाच्या धामधुमीत घालवल्या नंतर त्या रात्री निवांत झोपत तेव्हा सगळ्या काळज्या तेवढ्यापुरत्या दूर झालेल्या असत. आयुष्यात त्यांना मिळालेलं हे फार मोठे वरदान होते. नेणिवेच्या मिठीत सहज मिटून जाण्याचे !

१९७४ ची घटना. कुन्हा येथील मातृसेवा संघाच्या इमारतीतील एक खोली संजीवनी रुग्णालयास काही दिवसांकरीता वापरायला दिली होती. ती खोली रिकामी करण्याविषयी कमलाबाईंनी कळवूनही मुदत संपल्यावर ती खोली संजीवनी रुग्णालयाने रिकामी केली नाही. शेवटी कमलाबाई स्वतः तिथे गेल्या व खोली रिकामी करून घेतली. यावेळी कमलाबाईंचे वय ८२ वर्षे होते. १९७१ मध्ये पाय फ्रॅक्चर झाल्यापासून त्या कुबडीच्या किंवा काठीच्या आधाराने चालत होत्या. हे लक्षात घेतले तर त्यांचे कुन्ह्यासारख्या आडगावी सार्वजनिक वाहनाने जाणे, त्यांची कामाची तळमळ व धडाडीच दाखवून देते. खोली तर रिकामी करवून घेतली, पण त्याप्रसंगी जी काही शाब्दिक चकमक झडली त्यांनं कमलाबाई अतिशय संतापल्या व संतापाच्या भरात तोल जाऊन पडल्या. त्यात त्यांचे कॅव्हिकल बोन फ्रॅक्चर झाले. कुन्हा शाखेचे तेव्हाचे अध्यक्ष विठ्ठलकुमारजी मुंधडा व डॉक्टर सुरेश त्यांना खाजगी मोटारने घेऊन लगेच चांदूरला गेले.

चांदूरहून कमलाबाईंना नागपूरच्या डॉ. सतीश काळे यांच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्यावेळी कमलाबाईचे वय व प्रकृतीमान लक्षात घेऊन डॉक्टरांनी सल्ला दिला की, ऑपरेशन करण्यापेक्षा यांना नुसते पडून राहू द्या. हळूहळू हाड आपोआप जुळून येईल.

डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांना काही दिवस सीताबर्डी सूतिकागृहात ठेवण्यात आले. काही दिवस मोहनी बंगल्यातही त्या होत्या व नंतर पंचवटीला परत गेल्या.

परंतु आता त्यांचे चालणे बंद झाले होते. त्यामुळे कुठेही जायचे असल्यास व्हीलचेअरवरून न्यावे लागे. त्यामुळे सहाजिकच संस्थेच्या कामातील त्यांचे लक्ष हळूहळू कमी होऊ लागले. काही दिवसांनी त्या दिल्लीला बजाज पारितोषिक घेण्यासाठी जाऊन आल्या. त्यानंतर मात्र त्यांचा मुक्काम पंचवटीतच राहू लागला. कधी कधी महाल किंवा बर्डी शाखेत जात. कधी कधी मोहनी बंगल्यावर इतकेच.

याच काळात नानासाहेबांचेही पायाचे हाड फ्रॅक्चर झाले होते व ते अंथरूणाला खिळून होते. त्यांना भेटायला म्हणून कमलाबाई धरमपेठेत गेल्या. तिथेच त्यांना ताप येऊ लागला व त्यांना सीताबर्डी सूतिकागृहात हलविण्यात आले.

त्यांची दृष्टी आता अधू होत होती. नीट ऐकूही येत नव्हते. १५ ऑगस्ट १९८२ च्या नागपूरच्या सर्व वृत्तपत्रात कमलाबाई अत्यवस्थ असल्याची बातमी झळकली. भेटायला येणाऱ्यांची रीघ लागली. पत्रे आणि तारांमधून शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला. हे आपले शेवटचे दुखणे हे कमलाबाईंनी ओळखले होते. जन्मभर त्यांनी ॲलोपॅथीचे उपचार टाळले होते. त्या सगळ्यांची कसर आता भरून निघत होती.

डॉ. थेरगावकर, डॉ. आसोलकर, डॉ. कमलाताई जोशी, डॉ. कुसुमताई वांकर सगळेच त्यांची काळजी घेत होते. कृष्णाताई भावे तर सतत त्यांच्या जवळच होत्या. सतत अंथरूणावर पडून पडून जखमा झाल्या. त्या खोल चरत जाऊ लागल्या. त्यांचे ड्रेसिंग करताना कमलाबाई चुकूनही कधी कण्हत नसत. 'फार दुखतंय का?' या प्रश्नाला त्या नकारार्थी मान हलवत. मुळात बोलणे कमीच होते. आता हळूहळू थांबले. तशातच दिवाळी आली आणि गेली. धनत्रयोदशीला पंचवटीचा वाढदिवस त्या साजरा करायच्या. तोच त्यांचा वैधव्याचा वाढदिवस होता. त्यादिवशी त्या मोरावळा वाटायच्या. वैधव्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. तो प्रसंग पंचवटीत पन्नास मेहूणे जेवायला घालून त्यांनी साजरा केला होता. यावेळी मात्र हा दिवस साजरा करायचे भान कोणालाच नव्हते.

'पंचवटीला जायचे आहे काय?' डॉ. प्रमिला आसोलकरांनी विचारले. कमलाबाईंनी मानेनीच नकार दिला.

१४ नोव्हेंबरच्या संध्याकाळपासूनच कमलाबाईंना श्वास लागला.

'घरी, नाना मोहनींकडे जायचे आहे का?' या मेट्रन कमल पांडे यांच्या प्रश्नालाही त्यांनी नकार दिला होता. नंतरच्या काळातील त्यांच्या सहकारी डॉ. आसोलकर, डॉ. वांकर, डॉ. जोशी सततच त्यांच्याकडे लक्ष देत होत्या. १५ तारखेला डॉ. आसोलकर आयआयएममध्ये एका परिसंवादासाठी जायचे होते. पण त्या मधूनच लवकर परत आल्या. अकरा-साडे अकराच्या सुमारास त्यांनी कमलाबाईंची नाडी पाहिली. 'आपल्या हातून काम होतंय तोपर्यंत पंचवटीत रामाच्या मुर्तीकडे पाहता पाहता मृत्यू यावा.' असे त्या नेहमी म्हणत. गेले तीन महिने त्या अंथरुणावर खिळून होत्या. पण जीव अजून अडकला होता. डॉ. आसोलकरांनी त्यांचा हात हातात घेतला. 'आजी, इथली काळजी करू नका. पंचवटीकडे मी लक्ष देईन.' त्या म्हणाल्या. कमलाबाई क्षीणपणे पण प्रसन्नतेने हसल्या. थोड्याच वेळात त्यांनी या जगातला शेवटचा श्वास घेतला. मातृसेवा संघ पोरका झाला.

**महायात्रा :**

कमलाबाईंच्या निधनाची वार्ता रेडिओवरून दुपारच्या बातम्यांमधून सर्व जगाला कळली आणि सीताबर्डी सूतिकागृहात अक्षरशः त्यांच्या अंत्यदर्शनासाठी रीघ लागली. परगावच्या अनेक कार्यकर्त्यांनी आम्ही येईपर्यंत अंत्यसंस्कार करू नका अशी फोनवरुन विनंती केली. त्यामुळे अंत्यसंस्कार दुसऱ्या दिवशी करावयचे ठरविले.

कमलाबाईंचे पार्थीव सूतिकागृहाच्या दर्शनी भागातील एका खोलीत बर्फाच्छादीत पलंगावर ठेवण्यात आले. कमलाबाईंनी आयुष्यात कधी कुणाकडून पुष्पहार स्वीकारला नव्हता. हार घालून घेणारांची नंतर हार होते, असे त्या म्हणत. माझ्या मृत्यूनंतरही मला कोणी हार घालू नका, असे त्यांनी त्यांच्या भाच्यांना बजावून ठेवले होते. जन्मभर त्यांच्या धाकाने सर्वजन त्यांचे ऐकत होते. आता मात्र सर्वांना फुलं वाहून त्यांना श्रद्धांजली अर्पण करायची होती व त्यासाठी कोणी विरोधही केला नाही. कमलाबाईंचे पार्थीव फुलांनी, पुष्पमालांनी आणि पुष्पचक्रांनी भरून गेले. शासनाच्या प्रतिनिधींनी पुष्पचक्र वाहून त्यांना मानवंदना दिली.

अंत्ययात्रा दुसऱ्या दिवशी सकाळी काढायचे ठरले होते. कमलाबाईंचे भाचे डॉ. दि. मो. थेरगावकर यांनी अंत्यसंस्कार पंचवटीत करण्यासाठी कलेक्टर व पोलीस कमिशनर यांची परवानगी काढून आणली.

दुसऱ्या दिवशी फुलांनी सजविलेल्या ट्रकवर कमलाबाईंचा देह ठेवण्यात आला. ' कमलाबाई अमर रहे ' च्या घोषणात अंत्ययात्रा सुरू झाली. अंत्ययात्रा दिघोरीच्या दिशेने अग्रेसर झाली व सीताबर्डी सूतिकागृहाची इमारत पोरकी होऊन गेली. हजारो अनाथ अपंगांचे अश्रू पुसणारी माय त्यांना दुःखसागरात लोटून महायात्रेला निघून गेली. एरवी यात्रेला जाताना कमलाबाई आपल्याबरोबर कमीत कमी दोघी-चौघींना नेत असत. कधी कधी पंधरा-वीसजणांना बरोबर घेऊन त्या यात्रेला जात. ही यात्रा मात्र अशी होती जिथे त्या एकट्याच निघाल्या होत्या आणि साश्रूनयनांनी सर्वजण त्यांना निरोप देत होते.

अंत्ययात्रा दिघोरीला पोहचली. तेथील वृद्धही शोक कल्लोळात बुडाले होते. गेल्या तीन महिन्यांपासून कमलाबाई सीताबर्डीला होत्या. पण त्या कधीना कधी बऱ्या होऊन येतील अशी आशा सर्वांना होती. त्या आशेवर पाणी फेरले गेले.

पंचवटीत श्रीरामाच्या मंदिरासमोर राधाकृष्ण कुटीच्या बाजूला चिता रचण्यात आली. ज्या रामाच्या मूर्तीकडे पाहत आपल्याला मृत्यू यावा असे कमलाबाईंना वाटत होते त्या रामाच्या साक्षीने त्या अनंतात विलीन झाल्या. सदैव प्रफुल्लीत राहणारे कमल कायमचे मिटले.

काही दिवसांनी त्या जागेवर समाधीचे बांधकाम झाले. तुळसवृंदावनात तुळशीचे तुरे येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीने डोलू लागले. कमलाबाईंच्या पूर्ण आकारातील पुतळ्याची स्थापना सीताबर्डीवरील मातृसेवा संघाच्या इमारतीवरील दर्शनी भागात करण्यात आली.

कमलाबाईंचा जन्म १८९६ चा. त्यावेळी महाराष्ट्रात प्रबोधनाची सुरुवात नुकतीच झाली होती. समाज सुधारणेचे वारे वाहू लागले होते. स्त्री शिक्षण सुरू झाले होते. सतीप्रथा व केशवपन यासारख्या जाचक रूढींपासून स्त्रियांची मुक्तता करण्याचे प्रयत्न सुरू होते. तरीही अनेक सामान्य मुली या जाचक रूढी परंपरांच्या बळी ठरत होत्या. कमलाबाईंचा विवाह हा बालविवाहच होता. शाळेत जाऊन शिकायची संधीही त्यांना मिळाली नव्हती. परंतु वैधव्य आल्यावर त्यांचे भाऊ त्यांच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहिले. आणि वैधव्याच्या दुर्दैवी अपघाताचे संधीत रुपांतर करून नवीन सुधारलेल्या-पुढारलेल्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले.

स्त्री-आरोग्य हा विषय आजही अनेक घरांमध्ये दुर्लक्षिल जातो. परंतु १०० वर्षापूर्वी स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी. बाळंतपण म्हणजे पुनर्जन्म ठरत असे अशा काळात; सोवळ्या ओवळ्यांच्या कडक बंधनामुळे सुतिकांचे जे हाल होत त्यांची तीव्रता कमी व्हावी म्हणून कमलाबाईंनी एक-दोन नव्हे तब्बल २० सूतिकागृहे काढली. अनेक विधवा, परित्यक्ता स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी नर्सेसचे प्रशिक्षण वर्ग चालविले व आपल्या सूतिकागृहांमध्ये त्यांना नोकऱ्या दिल्या. अनेक फसलेल्या, फसविल्या गेलेल्या किंवा बलात्कार झालेल्या मुलींची बाळंतपणे बिनबोभाट पार पाडून त्यांचे व त्यांच्या अपत्यांचे पुनर्वसन केले. रूढी-परंपराच्या विळख्यातून समाजमानसाची मुक्तता करणे हे काम जसे त्यांनी केले तसेच नवीन समाज जातीभेदाच्या पार असलेला नवीन समाज घडविण्याच्या कामी त्यांनी आपले संपूर्ण जीवन वेचले. आजच्या प्रगत प्रबुद्ध महाराष्ट्राच्या घडणीत त्यांचे जे महत्तवपूर्ण योगदान आहे, त्याकडे एक नजर टाकली तरी आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांमधले त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात येते. आजही नागपूरच्या सीताबर्डीवरील मातृसेवा संघाच्या दर्शनी भागातील त्यांचे पूर्णाकृती शिल्प त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देण्यासाठी अखंड उभे आहे. त्यांच्या सहकाऱ्यांनी या आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकाराला दिलेली ती मानवंदनाच आहे.

***

# संदर्भ ग्रंथ सूची

**कमल गंध-** ले. इंदूमती देशमुख
*प्रकाशक* : स्पार्टन प्रकाशन, नागपूर - १९७२.

**कमलाताई होस्पेट-** एका परिचारिकेची जगन्माता झाली त्याची गोष्ट.
ले. इंदूमती देशमुख
*प्रकाशक* : कमलाताई हॉस्पेट स्त्रीसहाय्यक मंडळ, नागपूर - २००१.

**कमलाताई होस्पेट-** *(दोन अंकी नाटक)*
ले. सुनिता कावळे
*प्रकाशक* : कमलाताई हॉस्पेट स्त्रीसहाय्यक मंडळ, नागपूर - २००९.

**मातृसेवा संघ-** ले. विना खडपेकर,
*प्रकाशक* : राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, मार्च, २०००.

**असे आमचे नाना** - सं. रमेश गुप्ता खाजगी वितरणासाठी.

**एक वानप्रस्थाची कथा-** ले. रमेश गुप्ता, साधना प्रकाशन, पुणे.

**चरित्र चिंतन** - ले. द. ना. गोखले, *प्रकाशक* : मौज प्रकाशन गृह, जानेवारी २०००.

**हिन्दुस्थानी लालसेना-** (Indian Red Army) ले. डॉ. सत्यनारायण शर्मा.
प्र. आ. १५ ऑगस्ट १९९८.

**नागपूर जिल्हा काँग्रेसचा इतिहास**
सं. शंकर गेडाम, *प्रकाशक* : बाळासाहेब भारदे

**मातृसेवा मासिक कमलाताई हॉस्पेट विशेषांक** - नागपूर, १९८२.

**सीताबर्डी सुतिकागृह रजत महोत्सव स्मरणिका** -
सं. पुरूषोत्तम कृष्ण मोहनी व इतर, नागपूर, मार्च, १९४८.

**नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा, रजत जयंती स्मरणिका** -
सं. शरयू घाटे व इतर, नागपूर, १९८५.

**मातृसेवा मासिक पंचवटी वृद्धाश्रम रौप्य महोत्सव तथा नवीन इमारत उद्घाटन समारंभ विशेषांक -**

सं. प्रमिला दाणी व इतर, नागपूर, १९८७.

**मातृसेवा संघ सुवर्ण महोत्सव स्मरणिका** (वर्धा) -
सं. कुमुद पाठक, वर्धा, १९८८.

**अशोक प्रसूती मंदिर सुवर्ण जयंती महोत्सव स्मरणिका –**
सं. वसुंधरा गुप्ता, बिलासपूर, म.प्र. १९९५.

**मातृसेवा मासिक १९७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५ सर्व अंक**
सं. प्रमिला दाणी, प्रा. इंदूमती देशमुख, नागपूर.

शामुना—वाय-६१२—समरासासंमंमु—१-२०१४—१११० प्रती—पीए५*



**डॉ. छाया विजय नाईक**

व्यवसायः सेवानिवृत्त अध्यापक (२४ वर्षे गणित व मराठीचे अध्यापन)

साहित्य संपदाः एकांताचा अंतर्नाद (समीक्षा) कालीली कण (कथा संग्रह)

विविध मासिकांतून कथा लेखन. अनेक कथांना पारितोषिके

अनेक चर्चासत्रात शोध निबंध सादरकर्ती किंवा चर्चक म्हणून सहभाग

अनेक कार्यशाळामध्ये मार्गदर्शक म्हणून सहभाग (पर्यावरण, स्त्री शिक्षण, स्त्रीवाद, सार्वजनिक संस्थांच्या कार्य पद्धती इ. विषय)

उपाध्यक्ष, महिला कला निकेतन (शैक्षणिक प्रतिष्ठान)

गत १० वर्षांपासून नेत्रदानाचा प्रचार व प्रसार